# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि. ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

| | |
|---|---|
| विषय | मा. महासभा |
| | दि: १८/०४/२०१३ रोजी स: ११:००वा |
| | प्रकरण क्र- ०१ ते ०८ |

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | |

(१)

१३/१४

## अभिलेखाचे वर्गीकरण

पृष्ठ क्रमांक १ ते

परिक्षणाचे वर्ष

वर्ग

(अ / ब / क / त-१/ड)

बाब क्रमांक

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०६/०४/२०१३.

## मा. महासभा

**मा. महासभा सूचना क्र. :- ०१, दिनांक ०६/०४/२०१३.**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ------------------------------------

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेव्दारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा गुरुवार दि. १८/०४/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०१, दि. ०६/०४/२०१३ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. महासभा सुचना क्रमांक ०१, दि. ०६/०४/२०१३ सोबतची विषय पत्रिका**
**सभा गुरुवार दि. १८/०४/२०१३**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे** – |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – |
| ०१ | दि. २०/०२/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** – |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – |
| ०२ | महिला व बालकल्याण समितीच्या योजना राबविण्यासाठी महिला व बालकल्याण समितीच्या कामकाजाबाबत अधिकार व कर्तव्य समितीला देणेबाबत. (दि. २१/०१/२०१३ रोजीच्या मा. महिला व बालकल्याण समितीने शिफारस केलेला ठराव क्र. ५) |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** – |
| ०३ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण क्रमांक २, नियम ५ (२) (ब) अन्वये तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेवर पाच नामनिर्देशित पालिका सदस्यांची नियुक्ती करणे. |
| ०४ | महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी कच्चे पक्के नाले सफाई / खोदाईच्या अंतर्गत येणाऱ्या कामाच्या प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ०५ | मिरारोड येथील मौजे पेणकरपाडा येथील विकास आराखड्यातील आरक्षण क्र. १८७, १८८, १८९, १९० संचलन व देखभाल दुरुस्ती करीता करारनाम्याचे नुतनीकरण करणेस मान्यता देणे. |
| ०६ | विकास कामांना आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| ०७ | भाईंदर (पूर्व) इंद्रलोक भागातील बगीचा आरक्षण क्र. २२१ चे " हिन्दु हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे उद्यान" असे नामकरण करण्याबाबतच्या विनंतीवर निर्णय होणेबाबत. |
| ०८ | श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, उप-मुख्य अग्निशमन अधिकारी, यांच्या स्वेच्छा निवृत्तीबाबत. |
| ०९ | श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर (सध्या निलंबित) यांना सेवेत पुर्नस्थापित करणेबाबत |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०६ एप्रिल २०१३

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. १८/०४/२०१३ रोजी आयोजित केली आहे.**
**सदर सभेकरिता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न |
|---|
| **०४ श्री. नरेंद्र एल. मेहता मा. सदस्य यांनी दि. ०५/०१/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मौजे नवघर सर्व्हे क्र. ४३५,४३६,४३७,४३८ या जागेत आरक्षण आहेत का? व कोणती आहेत? |
| अ) सदर जागेत असलेली आरक्षणे फेरबदल करुन स्थलांतरीत केली आहेत का? |
| ब) सदर जागेतील डी.पी. प्रमाणे असलेली आरक्षणे सी.आर.झेडने बाधित होत आहेत का? |
| क) बदलून दुसरीकडे स्थलांतरीत केलेली आरक्षणे सी.आर.झेडने बाधित आहेत का? |
| ड) सी.आर.झेडने बाधित असलेले आरक्षण नॉन सी.आर.झेड. असलेल्या जागेत स्थलांतरीत केले आहे ते कोणत्या नियमानुसार? |
| इ) एखाद्या वेळी एकाच मालकांची सलग्न जागा असल्याने तेथिल रहिवास भाग सी.आर.झेडने बाधित व आरक्षण नॉन सी.आर.झेडने बाधित असल्यास आपण सदर रहिवास भाग आरक्षणामध्ये व आरक्षण रहिवास भागामध्ये बदल करुन देणार का? जर नाही तर का? व हो तर कोणत्या नियमानुसार? |
| ई) सदर बदल केलेल्या आरक्षणांची शासनाकडून परवानगी घेतली आहे का? |
| **०५ श्री. नरेंद्र एल. मेहता मा. सदस्य यांनी दि. ०५/०१/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) नगररचना विभागाने प्रभाग क्र. ३१ मध्ये विकासक रवि डेव्हलपर्स यांना ज्या परवानग्या दिल्या आहेत त्या संदर्भातील प्रश्न. |
| अ) परवानगी नुसार इमारती बांधल्या आहेत का? |
| ब) परवानगीनुसार इमारती न बांधता वाढीव बांधकाम केलेले असलेल्या इमारतीवर कारवाई करण्यात आली आहे का? |
| क) वाढीव बांधकाम केलेल्या इमारतींवर कारवाई करण्यास विलंब का लागत आहे? |
| ड) वाढीव बांधकाम केलेल्या इमारतींवर कधी कारवाई करणार? |
| इ) अशाप्रकारे वाढीव बांधकाम करणारे विकासक रवि डेव्हलोपर्स यांच्यावर एम.आर.टी.पी. अंतर्गत कारवाई का करण्यात आली नाही? |
| ई) सुधारीत परवानगी देताना सदर विकासकाकडून ओपन लॅन्ड टॅक्स घेण्यात आला आहे का? |
| **०६ श्री. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. ११/०१/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| 1) Details of Fire Safety measure suggested by fire department in building used/ owned by MBMC state and Central government in MBMC Juridiction area with details of their implication status. |
| A) Details of Notice & Penalty against contractor/ institution who are responsible for maintenance of electrical polls in last 9 years. |
| B) List of defaulters in paying taxes on open land with principle and penalty details why this taxes are not recovered so far. |
| **०७ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) महानगरपालिकेने सन २००४ ते २०१२ ह्या कालावधीत मे. टंडन असोसिएट ह्या तांत्रिक सल्लागारास देण्यात आलेल्या कामाची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे देण्यात यावी. (अ) कामांची नावे (ब) कामाची अंदाजपत्रक रक्कम (क) कार्यादेश तारीख (ड) काम पूर्ण करण्याची मुदत (तारीखसह) |
| अ) कामाची मुदत पूर्ण होऊनही बरीच कामे पूर्ण झाली नाहीत हे खरे आहे काय? |
| ब) असल्यास अपूर्ण असलेल्या कामाचा तपशिल द्यावा? |
| क) कामे मुदतीत पूर्ण न केल्याने त्याचे विरुध्द कोणती कारवाई केली? |
| ड) कामे मुदतीत न केल्याने महानगरपालिकेचे किती नुकसान झाले? |
| **०८ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भूमिगत गटार योजना कामाची एस्टीमेंट रक्कम किती आहे? |
| अ) कामाचा कार्यादेश दिनांक कोणता आहे? |
| ब) कामाची मुदत काय आहे? |
| क) महानगरपालिकने ठरविलेल्या वेळापत्रकानुसार (Bar Chart) काम झाले नाही हे खरे आहे काय? |

| |
|---|
| ड) असल्यास, काम वेळापत्रकानुसार किती होणे आवश्यक आहे? प्रत्यक्षात आजपर्यंतच्या कामाची स्थिती काय आहे? |
| इ) काम वेळेवर न झाल्याने ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली आहे? |
| **०९ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) महानगरपालिकेची कामे मिळविण्यासाठी महानगरपालिका लोकप्रतिनिधीना लांच देताना मे. टंडन असोसिएट्स हया तांत्रिक सल्लागाराच्या प्रतिनिधीस लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले होते हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, लांचलुचपत प्रतिबंधक कायदाखाली ज्याप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यां विरुध्द कारवाई होते त्या प्रमाणे संबंधित ठेकेदार विरुध्द कोणती कारवाई केली आहे? |
| ब) संबंधित ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकण्याबाबत प्रशासनाची भुमिका काय आहे? |
| **१० श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) शहराच्या भुमिगत गटार योजनेच्या देखरेखीसाठी नेमण्यात आलेल्या तांत्रिक सल्लागारावर आजपर्यंत किती खर्च करण्यात आलेला आहे? |
| अ) देखरेखीसाठी खाजगी तांत्रिक सल्लागार नेमूनही त्या व्यतिरिक्त महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांचे अभियंते प्रतिनियुक्तीवर नेमण्यात आले आहेत हे खरे आहे काय? |
| ब) असल्यास, किती अभियंते केव्हापासून प्रतिनियुक्तीवर आहेत? त्यासाठी महानगरपालिकेला किती खर्च झाला आहे? |
| क) तांत्रिक सल्लागाराची नेमणूक कोणी अशताही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ह्याच्या अभियंत्याची आवश्यकता आहे काय? |
| **११) श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर शहर भूमिगत गटार योजना कामाचे एस्टीमेट रक्कम किती आहे? |
| अ) महानगरपालिकेने मंजूर केलेल्या निविदा दराप्रमाणे किती खर्च होणार आहे? |
| ब) योजनेसाठी राज्य व केंद्रशासनाकडून किती अनुदान मिळणार आहे व प्रत्यक्षात किती अनुदान प्राप्त झाले आहे काय? |
| क) उर्वरीत रक्कम महानगरपालिका कर्ज रुपाने किती उपलब्ध केली आहे? किती रक्कम कर्जरुपाने अद्याप मिळणार आहे? |
| ड) काम पूर्ण करण्याची मुदत काय आहे? |
| इ) आजपर्यंत झालेल्या एकूण खर्च किती आहे? |
| **१२ श्री. नरेंद्र एल. मेहता मा. सदस्य यांनी दि. ०८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर शहरासाठी किती पाणी पुरवठा उपलब्ध होत आहे? |
| अ) सध्याचा वाढत्या लोकसंख्येला शासनाच्या भायदंडाप्रमाणे (भामकाप्रमाणे) दरडोई किती पाणी पुरवठा आवश्यक आहे? |
| ब) प्रत्यक्षात होणारा पाणी पुरवठा लोकसंख्येला पुरेसा आहे का? |
| क) नसल्यास वाढत्या लोकसंख्येला वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध करण्याच्या महानगरपालिकेकडे काही योजना आहेत का? |
| **१३ श्री. नरेंद्र एल. मेहता मा. सदस्य यांनी दि. ०८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ठाणे जिल्ह्यातील सूर्य धरणातून उपलब्ध होणाऱ्या पाणी साठ्यावत मिरा भाईंदर व वसई विरार ह्या महानगरपालिका क्षेत्रासाठी पाणी पुरवठा करणारी प्रस्तावित योजना एम.एम.आर.डी.ए. ने तयार केली आहे. त्यास महानगरपालिकेची सहमती मागणी करणारा प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए. ने महानगरपालिकेकडे सादर केला आहे हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, सदर प्रस्तावावर काय कार्यवाही झाली आहे? |
| ब) नसल्यास, केव्हा कारवाई करण्यात येईल? |
| **१४ श्रीम. प्रतिभा तांगडे-पाटील मा. सदस्या यांनी दि. ०८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ठाणे जिल्ह्यातील सूर्य धरणातून उपलब्ध होणाऱ्या पाणी साठ्यावत मिरा भाईंदर व वसई विरार ह्या महानगरपालिका क्षेत्रासाठी पाणी पुरवठा करणारी प्रस्तावित योजना एम.एम.आर.डी.ए. ने तयार केली आहे. त्यास महानगरपालिकेची सहमती मागणी करणारा प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए. ने महानगरपालिकेकडे सादर केला आहे हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, सदर प्रस्तावावर काय कार्यवाही झाली आहे? |
| ब) नसल्यास, केव्हा कारवाई करण्यात येईल? |

| |
|---|
| **१५ श्रीम. प्रतिभा तांगडे-पाटील मा. सदस्या यांनी दि. ०८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर शहरासाठी किती पाणी पुरवठा उपलब्ध होत आहे? |
| अ) सध्याचा वाढत्या लोकसंख्येला शासनाच्या भायदंडाप्रमाणे (भामकाप्रमाणे) दरडोई किती पाणी पुरवठा आवश्यक आहे? |
| ब) प्रत्यक्षात होणारा पाणी पुरवठा लोकसंख्येला पुरेसा आहे का? |
| क) नसल्यास वाढत्या लोकसंख्येला वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध करण्याच्या महानगरपालिकेकडे काही योजना आहेत का? |
| **१६ श्री. लियाकत गफ्फार शेख मा. सदस्या यांनी दि. ०४/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) स्थानिक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात राहती घरे बांधलेली आहेत. परंतु तेथे रस्ता अस्तित्वात नाही. किंबहूना विकास आराखड्यात रस्ताही दाखवलेला नाही. अशा परिस्थितीत स्थानिक रहिवाश्यांच्या मागणीनूसार लोकहितार्थ मुंबई प्रादेशिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (३४) नुसार नवीन रस्ता तयार करता येईल का? सदर कलमानूसार महानगरपालिकेस तातडीने भूसंपादन करण्याची तरतुद असताना तातडीने कारवाई करील काय? या प्रक्रियेसाठी किती कालावधी अपेक्षित आहे. जर उत्तर नाही असेल तर कुठल्या कायद्या अंतर्गत कारवाई करता येणार नाही याबाबत सुस्पष्ट खुलासा करण्यात यावा. |
| अ) उत्तन येथे दाट लोकवस्ती असलेल्या ठिकाणी लोकांनी राहत्या घराला लागून सेप्टीक टँक बांधलेली आहेत. परंतु त्याचा आऊटलेट (मलनिःसारण विर्सजन) महानगरपालिकेच्या गटारापर्यंत पोहचणे शक्य नाही. कारण तिथंपर्यंत पोहचण्यासाठी इतरांची मालकी जमिनी, घरे वगैरे येतात. सेप्टीक टँक भरल्यानंतर त्यांच्याकडे मलनिःसारण वाहिनीमार्फत खाली करणे हा ऐकमेव पर्याय असतो. परंतु, दुदैर्वाने अशा ठिकाणी गाडीही पोहचू शकत नसल्यामुळे मलमुत्र आजुबाजूच्या परिसरात वाहून जाते अथवा जमिनीत मुरते त्यामुळे दुर्गंधी पसरुन रोगराई वाढत आहे. वास्तविक पाहता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १६२ व १६३ नुसार लगत जमीन मालकांच्या जागेतून महानगरपालिकेच्या मुख्य गटारापर्यंत नाला घेऊन जाण्याची तरतुद आहे. मात्र लगत जमीन मालकांच्या हरकतीमुळे महानगरपालिका या गोष्टींकडे बारकाईने लक्ष देत नाही. अशा परिस्थितीत उपरोक्त कलमांचा महानगरपालिका सक्तीने वापर करील काय? त्याकामी विशेष अधिकाऱ्याची नेमणूक करुन पोलिस संरक्षणामार्फत अशी कामे पार पाडण्यात येतील का? |
| **१७ श्री. लियाकत गफ्फार शेख मा. सदस्या यांनी दि. ०४/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मालकी किंवा सरकारी जागेतून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने बांधलेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक रस्त्यांवर अतिक्रमण किंवा जाणूनबुजून अडथळा निर्माण करीत असल्यास महानगरपालिकेकडून काय कारवाई अपेक्षित आहे? फक्त अतिक्रमण दुर करणार किंवा अशा लोकांवर एम.आर.टी.पी. ॲक्ट व इंडियन पिनल कोडचे ४३१ नुसार गुन्हा दाखल करणार का? या अगोदर अशी काही कारवाई झाली आहे का? असल्यास तपशिल द्यावा? किंवा याबाबतीत काही लोकप्रतिनिधींचे प्रलंबित प्रकरणे असल्यास माहिती द्यावी? |
| **१८ श्री. मदन उदितनारायण सिंह मा. सदस्या यांनी दि. १८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर विकास नियंत्रण नियमावली दि. १५/१०/२००० रोजी मंजूर झाले असून दि. २८/०२/२००२ ला नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेत झाले असून सदर नियमावलीत किती आरक्षणे आहेत? त्याची तपशिलवार माहिती. |
| अ) महानगरपालिकेद्वारा विकसीत करावयाचे ३५६ आरक्षण पैकी यादीतुन छाननी केली असता प्रायमरी शाळा ८२, प्ले ग्राऊंड २०, गार्डन ९१, हायस्कुल प्ले ग्राऊंड २५, बोटनीकल प्ले ग्राऊंड १, चिल्ड्रेन ग्राऊंड १, बोट क्लब १, पार्क १, सोसीयल फारेस्ट्री १, टेक्नीकल स्कुल प्ले ग्राऊंड १, स्विमींग पुल १ वरील प्रकारे आहेत. सदर आरक्षणापैकी महानगरपालिकेने कोणकोणती व किती आरक्षणे ताब्यात घेतलेली आहेत? |
| ब) प्रत्येक आरक्षणाचे एकूण क्षेत्रफळ किती? व ताब्यात घेतलेले क्षेत्रफळ किती?<br>१) ताब्यात घेताना टी.डी.आर. द्वारे किती आरक्षणे ताब्यात घेतली?<br>२) समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून किती आरक्षण ताब्यात घेतले आहे?<br>३) रेडी रेकनर रेट प्रमाणे मोबदला देऊन किती आरक्षण ताब्यात घेतले आहे? |
| क) महानगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या आरक्षणाचे मालकांचे नाव व प्रत्येक आरक्षणामध्ये दिलेल्या टी.डी.आर. चे क्षेत्रफळ ची माहिती देण्यांत यावी. |
| ड) ताब्यात न घेतलेल्या आरक्षणाचे क्र. मालकाचे नांव व कारण. |
| इ) महानगरपालिकेने टी.डी.आर. माध्यमाने मोबदला न देता आरक्षण ताब्यात घेतले पाहिजे होते. सदर आरक्षण ताब्यात न आल्यामुळे होत असलेल्या गैरसोयीसाठी जबाबदार कोण? |

| |
|---|
| ई) वरील ३५६ आरक्षण महानगरपालिकेने विकसित करण्यांपैकी अनेक आरक्षण ते ताब्यात घेतले नाही. सदर आरक्षण खाजगी मालकांकडून कुठलेही कर न भरता व्यक्तीशः / व्यावसायीक वापराकरीता वापरली जात आहे. नियमानुसार ते वापरु शकतात काय? |
| **१९ श्री. अनिल भोसले मा. सदस्य यांनी दि. २९/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (पश्चिम) सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये श्रीम. रिटा मॉटारो ह्यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामामुळे त्या लगत असलेल्या इमारतीतील रहिवाश्यांना त्रास व व्यत्यय होत असल्याने सदर अनधिकृत बांधकामं तोडण्यात यावे अशी मागणी करणारे निवेदक विनय कॉ.हौ.सो.लि. व इतर रहिवाश्यांनी दि. ०८/०२/२०१३, दि. ११/०२/२०१३ व दि. २८/०२/२०१३ रोजी मा. आयुक्त व मा. उपायुक्त (मु.) ह्यांना भेटून दिली आहेत हे खरे आहे काय? |
| अ) खरे असल्यास सदर निवेदनानुसार अद्याप पर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) सदर इमारत अनधिकृत असल्याने ती तोडण्याची कारवाई केव्हा करण्यात येईल? |
| **२० श्री. अनिल भोसले मा. सदस्य यांनी दि. ३०/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (पश्चिम) सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या बांधलेल्या इमारती संदर्भात महानगरपालिके विरुध्द दाखल केलेले सर्व दावे मा. न्यायालयाने फेटाळल्यानंतर मनपाच्या विधी अधिकारी यांनी सदर अनधिकृत इमारत तोडण्यात यावे असे निर्देश प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.१ ह्यांना मनपा/विधी/२३६/२०१२-१३, दि. ०६/०३/२०१२ रोजी दिले आहेत हे खरे आहे काय? |
| अ) खरे असल्यास मनपाच्या विधी अधिकाऱ्यांच्या निर्देशनानुसार कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) निर्देशानुसार केव्हा कारवाई करण्यात येईल? |
| **२१ श्री. अनिल भोसले मा. सदस्य यांनी दि. ३०/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (पश्चिम) सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या बांधलेल्या इमारत झुकल्याने त्यापासून लगतच्या इमारतींना व त्यातील रहिवाश्यांना धोका निर्माण झाल्याने सदर झुकलेल्या इमारती व विकासका विरुध्द कारवाई करण्याची मागणी करणाऱ्या निवेदक विनय कॉ.हौ.सो.लि., भाईंदर ह्या गृहनिर्माण संस्थेने दि. ०७/१२/२०१२, दि. ०२/०१/२०१३ व लोकशाही दिन दि. ०४/०२/२०१३ व दि. ०७/०२/२०१३ मध्ये ठेवून ही अद्याप कारवाई झाली नाही हे खरे आहे काय? |
| अ) कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) त्या भागातील रहिवाश्यांना होणारा धोका दूर करण्या संदर्भात केव्हा कारवाई करणार? |
| **२२ सौ. तारा विनायक घरत मा. सदस्या यांनी दि. ०१/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| सद्याच्या प्रभाग क्र. १३ मध्ये असलेल्या विकास आराखड्यातील आरक्षणाबाबत.<br>१) मिरा भाईंदर शहराच्या विकास आराखड्यात सद्या अस्तित्वात असलेल्या पालिका प्रभाग क्र. १३ च्या हद्दीत किती व कोणकोणती आरक्षणे आहेत? त्याचे क्षेत्रफळ, सर्व्हे क्रमांक काय आहे? |
| अ) किती व कुठली आरक्षणे विकसीत झालेली आहेत? |
| ब) किती व कुठल्या आरक्षणांवर अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम झाले आहे? |
| क) आरक्षणातील कुठल्या अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम व बांधकाम करणाऱ्यांवर कोणती कारवाई आजतागायत झाली आहे? |
| ड) किती व कोणती आरक्षणे किती टीडीआर देऊन घेतली आहेत? |
| इ) टीडीआर देऊन मिळालेली आरक्षणाची जागा पालिकेच्या ताब्यात आहे काय? का त्यावर अतिक्रमण झालेली आहेत? |
| **२३ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. ०१/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (प.) भागात सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या दोन मजली इमारत बांधली आहे. ती पाडणेसंदर्भात महापालिकेने केलेल्या कारवाईच्या विरोधात संबंधित मालकाने मा. न्यायालयात दावा क्र. स्पे.सीसुट १४/२०१२ व अपिल क्र.६१/२०१२ दाखल केले होते. ते दावा-अपिल फेटाळण्याने सदर अनधिकृत इमारत तोडण्यात यावी असे निर्देश महापालिका विधी अधिकारी ह्यांनी त्यांचेकडील पत्र क्र. मनपा/विधी/२३६/२०१२-१३, दि. ०६/०६/२०१२ ने प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.१ ह्यांना दिले होते, हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास ९ महिने कालावधी होऊनही अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) अनधिकृत इमारत पाडण्याची कारवाई केव्हा करण्यात येईल? |
| **२४ सौ. प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील मा. सदस्या यांनी दि. ०२/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (प.) भागात सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या दोन माळ्यांची इमारत बांधल्याने त्या लगतच्या विनय कॉ.हौ.सो.लि., भाईंदर गृहनिर्माण संस्था व इतर इमारतीतील फ्लॅट धारकांची हवा व |

| |
|---|
| उजेड बंद झाल्याने त्या त्रस्त झालेल्या फ्लॅटधारकांनी सदर अनधिकृत बांधलेली इमारत पाडण्यात यावी, अशी मागणी करणारी दि. १४/१२/२०१२, दि. ०२/०२/२०१३, दि. ११/०२/२०१३, दि. २०/०२/२०१३, दि. २८/०२/२०१३ व २४/०३/२०१३ ची निवेदने मा. आयुक्त ह्यांना प्रत्यक्ष भेटून दिली आहेत, हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, त्रस्त झालेल्या नागरीकांच्या निवेदनांवर अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) कारवाई केव्हा करण्यात येईल? |
| **२५ डॉ. रमेश धरमचंद जैन मा. सदस्य यांनी दि. ०२/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मोकळ्या जागेवरील कराची परिणामकारक वसुली होण्याच्या दृष्टीने कोणत्याही जमिन मालक / विकासकाकडून मोकळ्या जागेवरील कराचा भरणा केल्याशिवाय सुधारीत बांधकाम मंजूरी, जोत्याचा दाखला, भोवगटा दाखला देण्यात येवू नये असे निर्देश देणारे आदेश मा. आयुक्त सो. ह्यांनी त्यांचेकडील आदेश क्र. मनपा/१४३/२००८-०९, दि. २२/१२/२००८ व आदेश क्र. मनपा/आयुक्त/२९४/२००९-१०, दि. २३/१२/२००९ ने नगररचना विभागास दिले होते हे खरे आहे का? |
| अ) असल्यास, दि. ०१/०४/२००८ ते दि. ३१/०३/२०१३ पर्यंत ह्या कालावधीमध्ये नगररचना विभागाने दिलेल्या सुधारीत बांधकाम परवानगी, ज्योत्याचा दाखला, भोगवटा दाखल ह्यांची तपशिलवार माहिती (मौजे, सर्व्हे क्र., विकासकाचे नाव, मंजुर बांधकाम क्षेत्र, मंजुरी आदेश / दिनांक व भरणा केलेल्या मोकळ्या जागेवरील कराची पावती क्र. व दिनांक) प्रत्येक वर्षवार मिळावी. |
| ब) मा. आयुक्त सो. ह्यांचे आदेश असताना मोकळ्या जागेवरील कराची पावती वसुली न केल्याने मनपाचे कोट्यावधी रुपयाचे आलेल्या नुकसानीस जबाबदार कोण आहे? |

# मा. महासभा

# दि. २०/०२/२०१३

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह**

**मा महासभा दि. २०/०२/२०१३**

आज बुधवार दि. २०/०२/२०१३ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ६ दि. ०६/०२/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | महापौर |
| २) | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | उपमहापौर |
| ३) | भोईर राजू यशवंत | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ५) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ६) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ८) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ९) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| १०) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| ११) | मयेकर सरस्वती रजनीकांत | सदस्या |
| १२) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १४) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १५) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १६) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १७) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १८) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १९) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २०) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| २१) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २२) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २३) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २४) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २५) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २६) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २७) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २८) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २९) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| ३०) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३१) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ३२) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| ३३) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३४) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३५) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३६) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३७) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३८) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३९) | जैन गिता भरत | सदस्या |
| ४०) | जैन रमेश धरमचंद | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४१) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ४२) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४३) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ४४) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४५) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४६) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४७) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४८) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४९) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ५०) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ५१) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ५२) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ५३) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५४) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५५) | झिनत रऊफ कुरेशी | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५६) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५७) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५८) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५९) | सुजाता रविकांत शिंदे | सदस्या |
| ६०) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ६१) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ६२) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६३) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ६४) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६५) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६६) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६७) | जैन सिमा महेंद्र | सदस्या |
| ६८) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६९) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ७०) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७१) | भट्ट दिप्ती शेखर | सदस्या |
| ७२) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ७३) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७४) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७५) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ७६) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७७) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७८) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७९) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ८०) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ८१) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८२) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८३) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ८४) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ८५) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| २) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ३) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ५) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ६) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |

७) प्रभाकर पद्‌माकर म्हात्रे सदस्य

**रजेचा अर्ज –**

१) शरद केशव पाटील गटनेता, भारतीय जनता पार्टी

२) सामंत प्रमोद जयराम सदस्य

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरीता उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आयुक्त पदी नव्याने नियुक्त झालेले श्री. सुरेश काकाणी साहेब ह्यांचे स्वागत करीत आहे. सदरची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी अशी माझी विनंती आहे. साहेबांनी आपला परिचय करायचा आहे.

**मा. आयुक्त :-**

नमस्कार. मी सुरेश काकाणी. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी असून मी २८ जानेवारीला मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आयुक्त पदाचा कार्यभार हाती घेतला आहे. आणि ह्या शहराच्या, महानगराच्या किंवा मुंबईला लागून असलेल्या ह्या उपनगरांचा विकास आपल्या सगळ्यांच्या सहकार्याने आणि योग्य मार्गाने होईल अशी मी आशा बाळगतो. आपल्या सहकार्यामुळे आणि शासन स्तरावर किंवा इतर संस्थाकडून जी काही मदत किंवा अनुदान प्राप्त करुन घ्यायचे आहे जे नविन प्रकल्प राबवायचे आहेत त्यासाठी आपल्या सगळ्यांनी प्रयत्न केल्यास निश्चितच मिरा भाईंदर हे उपनगर मुंबई नजिक जरी असले तरी मुंबईच्या दर्जाच्या सोयीसुविधा इथे पुरवण्याचा आपण सगळ्यांनी प्रयत्न करु या. धन्यवाद.

**नरेंद्र मेहता :-**

भारतीय जनता पक्षातर्फे आम्ही सन्मा. आयुक्त ह्यांचे मिरा-भाईंदर महानगरपालिकेत स्वागत करतो आणि आमच्या तर्फे त्यांना शुभेच्छा देतो.

**वंदना चक्रे :-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे नवनित आयुक्त साहेबांचे मी स्वागत करते.

**प्रशांत दळवी :-**

नवनिर्वाचित आयुक्त साहेबांचे शिवसेना पक्षातर्फे आम्ही सहर्ष स्वागत करतो.

**जुबेर इनामदार :-**

सुरेश काकाणी साहेब नविन आयुक्त म्हणून त्यांनी आपला कार्यभार सांभाळलेला आहे. काँग्रेस पक्षातर्फे त्यांचे मी ह्या शहरामध्ये स्वागत करतो.

**राजू भोईर :-**

बहुजन विकास आघाडीतर्फे आम्ही नविन आयुक्तांचे हार्दिक स्वागत करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. काकाणी साहेब, सगळ्यांनी आपले स्वागत केले. ह्या महासभेच्या सर्व सदस्यांच्या तर्फे मी आपले स्वागत करतो. मागचे आयुक्त विक्रम कुमार साहेबांनी जे चांगले डिसीजन घेतले आहेत ते तुम्ही पुढे कन्टीन्यू करा. ह्या शहराला आदर्श शहर बनवण्याचे जे आमचे ध्येय आहे त्याच्यामध्ये तुमचा हातभार लागावा अशी अपेक्षा ठेवतो.

**प्र. नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा बुधवार दि. २०/०२/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६, दि. ०६/०२/२०१३ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर शहराकरिता मागील तीन महिन्यापासून लागू केलेली १४ टक्के पाणी कपातीमुळे शहरातील नागरिकांना ७२ तासांवर पाणीपुरवठा होत होता यामुळे शहरातील नागरिक अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे त्रस्त होते. ह्या विषयाचे गांभिर्य लक्षात घेता मा. महापौर श्रीम. कॅटलीन परेरा, मा. खासदार श्री. संजीवजी नाईक व मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेंन्डान्सा ह्यांनी मा. ना. श्री. सुनिल तटकरे, जलसंपदा मंत्री ह्यांना सदर पाणी कपात रद्द करणेबाबत पत्रव्यवहार करुन पाठपुरावा केला त्या अनुषंगाने मा. जलसंपदा मंत्री ह्यांनी दि.०५/०२/२०१३ रोजी मंत्रालयातील आपल्या दालनात स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व जलसंपदा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलावून मिरा भाईंदर शहरातील लागू केलेली पाणी कपात रद्द करण्याचे आदेश दिले. सदर बैठकीत मा. महापौर श्रीम. कॅटलीन परेरा, मा. खासदार श्री. संजीवजी नाईक, मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेन्डोंसा, मा. उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहाँ नझर हुसैन, मा. आयुक्त श्री. सुरेश काकाणी, सभागृहनेते श्री. ध्रुवकिशोर पाटील, माजी नगरसेवक श्री. भगवती शर्मा व स्टेम प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व जलसंपदा विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मा. ना. श्री. सुनिल तटकरे, जलसंपदा मंत्री ह्यांनी मिरा भाईंदर शहराकरिता लागू केलेली १४ टक्के पाणी कपात रद्द केल्यामुळे शहरातील नागरिकांना दिलासा मिळालेला आहे. मिरा भाईंदर शहराकरिता लागू केलेली पाणी कपात रद्द केल्यामुळे मा. जलसंपदा मंत्री मा. ना. श्री. सुनिल तटकरे ह्यांचे हार्दिक अभिनंदन करुन त्यांच्या अभिनंदनाचा मी ठराव मांडत आहे. मिरा भाईंदर शहरातील नागरिक श्री. ब्रम्हदेव राम पंडीत ह्यांना आपल्या केंद्र सरकार तर्फे पद्मश्री पुरस्कार देण्यात आला त्याबद्दल त्यांच्यासुद्धा अभिनंदनाचा ठराव मांडतो. मिरा भाईंदर शहरामधील हिशोब चार्टर्ड अकाऊन्टतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या क्रिकेट टूर्नामेंटमध्ये मिरा भाईंदर शहरातील डॉक्टर, वकिल, चार्टर्ड अकाऊन्टंट आणि नगरसेवक ह्या सर्वांच्या क्रिकेट मॅच होतात त्या मॅचमध्ये सतत तीन वर्षे आपल्या नगरसेवक संघाने फायनल मारल्यामुळे त्या नगरसेवक संघाच्या अभिनंदनाचा मी ठराव मांडत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**अभिनदन ठराव क्र. ५१ :-**

मिरा भाईंदर शहराकरिता मागील तीन महिन्यापासून लागू केलेली १४ टक्के पाणी कपातीमुळे शहरातील नागरिकांना ७२ तासांवर पाणीपुरवठा होत होता यामुळे शहरातील नागरिक अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे त्रस्त होते. ह्या विषयाचे गांभिर्य लक्षात घेता मा. महापौर श्रीम. कॅटलीन परेरा, मा. खासदार श्री. संजीवजी नाईक व मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेंन्डान्सा ह्यांनी मा. ना. श्री. सुनिल तटकरे, जलसंपदा मंत्री ह्यांना सदर पाणी कपात रद्द करणेबाबत पत्रव्यवहार करुन पाठपुरावा केला त्या अनुषंगाने मा. जलसंपदा मंत्री ह्यांनी दि.०५/०२/२०१३ रोजी मंत्रालयातील आपल्या दालनात स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व जलसंपदा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलावून मिरा भाईंदर शहरातील लागू केलेली पाणी कपात रद्द करण्याचे आदेश दिले. सदर बैठकीत मा. महापौर श्रीम. कॅटलीन परेरा, मा. खासदार श्री. संजीवजी नाईक, मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेन्डोंसा, मा. उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहाँ नझर हुसैन, मा. आयुक्त श्री. सुरेश काकाणी, सभागृहनेते श्री. ध्रुवकिशोर पाटील, माजी नगरसेवक श्री. भगवती शर्मा व स्टेम प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व जलसंपदा विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मा. ना. श्री. सुनिल तटकरे, जलसंपदा मंत्री ह्यांनी मिरा भाईंदर शहराकरिता लागू केलेली १४ टक्के पाणी कपात रद्द केल्यामुळे शहरातील नागरिकांना दिलासा मिळालेला आहे. मिरा भाईंदर शहराकरिता लागू केलेली पाणी कपात रद्द केल्यामुळे मा. जलसंपदा मंत्री मा. ना. श्री. सुनिल तटकरे ह्यांचे हार्दिक अभिनंदन करुन त्यांच्या अभिनंदनाचा मी ठराव मांडत आहे. मिरा भाईंदर शहरातील नागरिक श्री. ब्रम्हदेव राम पंडीत ह्यांना आपल्या केंद्र सरकार तर्फे पद्मश्री पुरस्कार देण्यात आला त्याबद्दल त्यांच्यासुद्धा अभिनंदनाचा ठराव मांडतो. मिरा भाईंदर शहरामधील हिशोब चार्टर्ड अकाऊन्टतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या क्रिकेट टूर्नामेंटमध्ये मिरा भाईंदर शहरातील डॉक्टर, वकिल, चार्टर्ड अकाऊन्टंट आणि नगरसेवक ह्या सर्वांच्या क्रिकेट मॅच होतात त्या मॅचमध्ये सतत तीन वर्षे आपल्या नगरसेवक संघाने फायनल मारल्यामुळे त्या नगरसेवक संघाच्या अभिनंदनाचा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील          अनुमोदक :- श्री. प्रेमनाथ पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**राजेश वेतोसकर :-**

अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा मा. श्रीम. सोनियाजी गांधी, उपाध्यक्ष मा. श्री. राहुलजी गांधी, प्रदेशाध्यक्ष मा. श्री. माणिकरावजी ठाकरे तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. पृथ्वीराजजी चव्हाण यांच्या आशिर्वादाने तसेच राज्याचे सर्व पक्षाचे जेष्ठ नेते, विधान सभेच्या सर्व पक्षीय आमदारांच्या सहकार्याने ह्या शहराचे माजी उपमहापौर मा. श्री. मुझफ्फर हुसैन साहेब यांना पुर्नःश्च विधान परिषदेचे सदस्य (आमदार) म्हणून बिनविरोध निवडून दिले. संपूर्ण शहराच्या व सभागृहाच्या वतीने मिरा भाईंदर शहराच्या विकासाच्या चळवळीला वेग देणारे मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसैन साहेब यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**अभिनदन ठराव क्र. ५२ :-**

अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा मा. श्रीम. सोनियाजी गांधी, उपाध्यक्ष मा. श्री. राहुलजी गांधी, प्रदेशाध्यक्ष मा. श्री. माणिकरावजी ठाकरे तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. पृथ्वीराजजी चव्हाण यांच्या आशिर्वादाने तसेच राज्याचे सर्व पक्षाचे जेष्ठ नेते, विधान सभेच्या सर्व पक्षीय आमदारांच्या

सहकार्याने ह्या शहराचे माजी उपमहापौर मा. श्री. मुझफ्फर हुसैन साहेब यांना पुर्नःश्च विधान परिषदेचे सदस्य (आमदार) म्हणून बिनविरोध निवडून दिले. संपूर्ण शहराच्या व सभागृहाच्या वतीने मिरा भाईंदर शहराच्या विकासाच्या चळवळीला वेग देणारे मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसैन साहेब यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राजेश वेतोसकर** **अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**संदिप पाटील :-**

राई, मुर्धा, मोर्वा ह्या बस सेवेमध्ये आठ रुपये प्रमाणे केलेली भाडेवाढ कमी करुन, सहा रुपये प्रमाणे केली त्याबद्दल मा. महापौरांचे अभिनंदन करतो.

**प्रविण पाटील :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अभिनदन ठराव क्र. ५३ :-**

राई, मुर्धा, मोर्वा ह्या बस सेवेमध्ये आठ रुपये प्रमाणे केलेली भाडेवाढ कमी करुन, सहा रुपये प्रमाणे केली त्याबद्दल मा. महापौरांचे अभिनंदन करतो.

**सुचक :- श्री. संदिप पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रविण पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, ह्या सभागृहामध्ये गेले २५ वर्ष दोन सन्मा. सदस्य काम करतात. गेले २५ वर्ष नगरसेवक म्हणून निवडून येतात. सन्मा. ग्रिटा फॅरो, सन्मा. प्रभात ताई पाटील ह्या दोन सदस्या गेली २५ वर्ष सातत्याने महानगरपालिकेत काम पाहत आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की ८ मार्चला महिला दिन साजरा होणार आहे. तर त्याच दिवशी त्याचे महानगरपालिकेतर्फे सत्कार करण्यात यावा. जेणे करुन त्यांनी जे ह्या शहरासाठी योगदान दिलेले आहे. त्याचा ही अभिमान आहे.

**मा. महापौर :-**

करु या.

**वंदना चक्रे :-**

सुनिल गणपत दापतोडे ह्यांनी अनेक वेळेला रक्तदान केलेले आहे. त्यांना महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे. त्यांचा मी ठराव मांडते. त्यांचा डायसवर सत्कार करण्यात यावा.

**मा. महापौर :-**

पुढच्या महासभेत सर्वांचे सत्कार ठेऊ या.

**प्रशांत केळूसकर :-**

मिरा भाईंदर शहरात भारतीय जनता पार्टीचे शहर अध्यक्ष जिल्हाप्रमुख म्हणून श्री. नरेंद्र मेहता यांनी जो कारभार पाहिला होता. त्या कालावधीत त्यांनी ०९ चे २९ नगरसेवक करुन दिले. त्यांचा हा जो सतत कार्यरत कारभार व्यवस्थित चालला, त्याचेच प्रतिक म्हणून व मान म्हणून त्यांना पुनःश्च जिल्हाध्यक्ष या पदावर नेमण्यात आले. म्हणून मी त्यांचा अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अभिनदन ठराव क्र. ५४ :-**

मिरा भाईंदर शहरात भारतीय जनता पार्टीचे शहर अध्यक्ष जिल्हाप्रमुख म्हणून श्री. नरेंद्र मेहता यांनी जो कारभार पाहिला होता. त्या कालावधीत त्यांनी ०९ चे २९ नगरसेवक करुन दिले. त्यांचा हा जो सतत कार्यरत कारभार व्यवस्थित चालला, त्याचेच प्रतिक म्हणून व मान म्हणून त्यांना पुनःश्च जिल्हाध्यक्ष या पदावर नेमण्यात आले. म्हणून मी त्यांचा अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर** **अनुमोदक :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होते. प्रश्न क्रमांक ३ नरेंद्र एल. मेहता ह्यांचा आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, सचिव साहेब आज आपली चौथी सभा आहे. या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये मागच्या काळात एक निर्णय झाला होता की, जे सभेत निर्णय होतील त्याचा अनुपालन अहवाल पुढच्या सभेत द्यावा. आता पर्यंत अनेक प्रश्न उपस्थित राहिले लक्षवेधी झाल्या. सभागृहात अनेक निर्णय झाले. मागच्या तीन सभांपासून मी बघतो आपण अहवाल देत नाही. आम्ही जे मागे प्रश्न मांडले सभागृहाने जे निर्णय घेतले. मा. महापौरानी जे आदेश दिले. त्याचे प्रशासनानी काय केले त्याचा अनुपालन अहवाल कुठे आहे. मा. आयुक्त महोदय ह्या महापालिकेत महासभेमध्ये जे काही निर्णय होतात त्या निर्णयाची अंमलबजावणी काय झाली त्याचे पुढील महासभेत लेखी द्यावे असा ठराव झाला होता तर नियमाप्रमाणे ते द्यायला पाहिजे. गेल्या तीन महिन्यापासून अनेक प्रश्न झाले. अनेक लक्षवेधी झाले. मा. महापौरांनी अनेक निर्णय दिले. त्याचे काय झाले. ते आम्हाला माहित नाही. द्यायचे कारण काय सचिवांनी खुलासा करावा.

**प्र. नगरसचिव :-**

अनुपालन अहवाल पुढील महासभेपासून देण्यात येईल. सभासुचना जरी सहावी असली तरी त्याच्यात २-३ तहकुब झाल्या आहेत. सभा तीनच झाल्या आहेत. त्यामध्ये जे निर्णय घेतले आहेत. त्यावर मी संबंधीत विभागाकडून माहिती घेऊन त्यांच्याकडून लेखी उत्तर घेऊन अनुपालन अहवाल पुढच्या सभेत देतो.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय आपल्या नजरेत आणून देतो. मी माहिती घेतली पण त्याच्यावर काही कारवाई झाली नाही. ह्या शहरात अनेक ॲमिनिटी स्पेस आहेत. महानगरपालिकेने परवानगी देताना ते ताब्यात घ्यायला पाहिजे होते. ते घेतलेले नाहीत. मागच्या सभेत विक्रम कुमार साहेबांनी सांगितले हाते. आम्ही त्वरीत ताब्यात घेऊ. महापालिकेच्या काही जागेवर बिल्डरनी एन्क्रोचमेंट केले. भविष्यात ते निघून जातील. कमीत कमी ५० करोडपेक्षा जास्त ह्या बिल्डरच्या ताब्यात आहे. तुम्ही त्यांना परवानगी दिली आहे. त्या जागा ताब्यात घ्या. महत्वाचे जे आहे ते चेक नाक्याजवळ ठाकूर मॉलच्या बाजूला डिबी रिॲलिटीची एक लाख फुट आपली जागा आहे. ते ताब्यात घेतले नाही. त्याचे काम चालू आहे. आपण त्याच्यावर संबंधित अधिकाऱ्याकडून माहिती घ्या. आणि त्या जागा ताब्यात घेऊन द्या. मॅडम मागच्या वेळेला आपण दरवाढ केली होती. मिरा भाईंदर मध्ये पाणीपट्टी आणि हाऊस टॅक्स वैगेरे तेव्हां दिपक सावंत साहेबांनी सांगितले होते की, आम्ही जे काही पैसे जास्त घेतले ते परत दिले. मी विचारले एकूण किती रक्कम आली. तर त्याच्यात उत्तर भेटले ५ करोड ५४ लाख जास्त रक्कम आली होती. ५ करोड ५४ लाख आपण इकडे दिलेले आहेत. मा. आयुक्त महोदय, २०१०-११ मध्ये महानगरपालिकेने करवाढ केली होती ती नियमाच्या बाहेर होती. म्हणून आम्ही शासनाकडे दाद मागीतली. शासनाने शेवटी निर्णय घेतला ती करवाढ बेकायदेशीर आहे. ती रद्द करा. ते होता होता साधारण एक वर्ष निघून गेले आणि बरीच रक्कम महापालिकेने जमा केली. ज्यावेळी जमा केली त्यावेळी वाढ केली त्या सकट जमा केली. जानेवारीपर्यंत साधारण ५० ते ६० टक्के आजूबाजूला वसूली करतो. उरलेली रक्कम ह्या शेवटच्या दोन महिन्यात किंवा त्यानंतर आफ्टर नेक्स्ट इयर आपण रिकव्हर करतो. ह्यामध्ये तुम्ही १० हजार रुपये रुटीन टॅक्स होता. करवाढ झाल्यानंतर १६ हजार झाले. उदा. आमचेच घ्या आम्हाला माहित होते की हे बेकायदेशीर आहे. ते आज नाहीतर उद्या रद्द होणार दॅट वॉज दी मिस्टेक ऑन दी आपल्या बाजूनी काही लोकांनी ते पैसे भरलेच नाही. ते आम्हाला माहित आहे की आम्हाला न्याय मिळणार. पुढच्या वर्षामध्ये आपण काय केल. १५ हजार मध्ये पाच हजार कमी केले. १० हजारावर तुम्ही इन्टरेस्ट लावले. वॉट वॉज हिस मिस्टेक. त्याची चूक काय तुम्ही बिल वाढवून दिले. तुम्हीच सुधारीत बिल द्यायला पाहिजे. सुधारीत बिल दिलेच नाही. करवाढ कमी झाली आहे. हे सुधारीत बिल १८ जानेवारी ते ३१ मार्च पर्यंत तुम्ही कुठलेही सुधारीत बील काढलेल नाही. जे अधिकारी ही वसुली करायला जायचे त्यांना माहित नव्हते की किती कमी करायला पाहिजे, किती इंटरेस्ट द्यायला पाहिजे, किती पॅनल्टी घ्यायला पाहिजे. ह्याच्यात मागची वसुली किती आहे. त्यांच्याकडे नाही. त्याच्याकडे फक्त बिलाची रक्कम होती आणि पैसे पाहिजे एवढे होते. काही लोकांनी आग्रह धरला तेवढ ठिक आहे. तेवढ सोडून बाकीचे भरा. बऱ्याचशा लोकांनी साधारण २५ टक्के कलेक्शन राहिले असेल. ३१ मार्चनंतर जो झाला त्याच्याकडून तुम्ही इंटरेस्ट घेतलेले आहे. पण अवर बिलसाइड वर्क मिस्टेक आपण नो इंटरेस्ट कस घेऊ शकतात. तुम्ही सुधारीत बिल द्यायला पाहिजे. ते तुम्ही आजपर्यंत दिले नाही. पुढच्या वर्षात ज्या लोकांनी भरले. तुमच्याकडे रेकॉर्ड आहे. तुम्ही दिले. साहेब ७० टक्के ही करवाढ झाली होती. अवर रिवेन्यु इज आपले २०१०-११ चे वार्षिक उत्पन्न किती आहे?

**दिपक सावंत :-**

८४ करोड.

**नरेंद्र मेहता :-**

८४ चे साहेब ७० टक्के इज अल्मोस्ट दी ५० करोडच्या आजूबाजूला. त्यावर्षी आपली वसूली किती झाली.

**दिपक सावंत :-**

६५ करोड झाली.

**नरेंद्र मेहता :-**

८४ तुम्ही बोलता.

**दिपक सावंत :-**

टोटल बोललो.

**नरेंद्र मेहता :-**

वाढ बरोबर की विदाऊट वाढ.

**दिपक सावंत :-**

विदाऊट वाढ सांगितली. वाढ धरुन १०९ करोड होते. ते २० करोड जे होते. ते आपण विविध कर वाढवले होते. मलप्रवाह सुविधा कर, मालमत्ता कर, शिक्षण ..................

**नरेंद्र मेहता :-**

ह्याचे म्हणणे आहे ८४ वर जे वसूली बोलतात हाव इट इज पॉसीबल की साहेब पाच करोडच एक्स्ट्रा येईल. १०९ करोडमध्ये ज्यावेळी ३० करोडची वाढ होते. ऑलमोस्ट तुम्ही ७० टक्के वसुली केली आहे. म्हणजे त्या ३० टक्के मध्ये २१ करोड तुमच्याकडे ॲक्सेस आले असतील. तुम्ही त्या निर्णयाच्या अगोदर पूर्ण पैसे घेतले हाव इट इज पॉसिबल? मुळ तुमचे ८४ करोड त्याच्यावर तुमचे म्हणणे आहे १०९ वसूल झाले. आणि एक्स अमाऊंट बाकी असेल. आपली टोटल डिमांड किती आहे?

**दिपक सावंत :-**

२०१०-११ मध्ये विदाऊट वाढ ८४ करोड विथ वाढ १०९.

**नरेंद्र मेहता :-**

किती फरक आला?

**दिपक सावंत :-**

२५ करोड.

**नरेंद्र मेहता :-**

आता मला सांगा ८४ चे ६० करोड वसूल केले. तुम्ही ५० टक्के वसूल केले. यू हॅव गेट दी २५ वरचे १२.५० करोड एक्स्ट्रा आले असतील ना. पाच करोड कसे एक्स्ट्रा दाखवतात.

**दिपक सावंत :-**

टोटल आहे. ही जी अमाऊंट दिलेली आहे. घरपट्टीमध्ये आपण स्लॅब केले होते. दोन टक्के, तीन टक्के, पाच टक्के, दहा टक्के अशी वाढ केली होती.

**नरेंद्र मेहता :-**

विषय असा आहे. ८४ करोड इज द प्रिन्सीपल विदाऊट वाढ. १०९ करोड विथ वाढ. म्हणजे हा २५ करोड आहे. एखादा जरी ५० टक्के वसूल करतो तर ५० टक्के वाढ त्यामध्येच वसूली आलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये मुद्दा असा आहे की, ज्याठिकाणी आपण दरवाढ केली होती. आपण आता त्रैराशिक पध्दतीने आपल्याला त्यामध्ये जाता येणार नाही. ह्यामध्ये वेगवेगळे स्लॅब ठेवलेले आहेत. स्लॅब ठेवले असल्यामुळे त्यानुसार एकूण रिकव्हरी एकूण डिमांड ह्याचा ताळमेळ घ्यायला गेलो तर ते कधी टॅली होणार नाही. कारण स्लॅब दाखवले हा एक भाग आणि मूळ मुद्दा हा आहे की, ज्या व्यक्तिकडून आपण वाढीव दराने वसूली केली होती त्या सगळ्या मालमत्ता धारकांना ती वाढीव रक्कम जमा करुन हा परत करणे हा मूळ मुद्दा आहे. मी जी माहिती घेतलेली आहे तीन ठिकाणी असे झालेले आहे. त्याठिकाणी आपण कॉम्प्युटर मध्ये अशी अरेंजमेंट केली की, मागच्या वर्षी २००९-१० मध्ये त्याची डिमांड किती होती. २०११-१२ मध्ये जेव्हा वाढीव दराने किती डिमांड घेण्यात आली. वसूल किती झाले. एक्सेस वसूल झाले होते ते चालू वर्षाच्या मार्च २०१३ पर्यंत आपण जी बिल दिली आहेत. त्या बिलामध्ये आपण ॲडजेस्टमेन्ट केलेली आहे. जवळपास सगळी रक्कम आपण ॲडजेस्ट केलेली आहे. फक्त एक वगळला होता. तो मुद्दा मी आपल्याला सांगतो. ह्याच्यामध्ये जेव्हा तो वसूलीला येईल तेव्हा त्याला ह्या वर्षी मागच्या वर्षी जास्त रक्कम भरलेली असेल ती रक्कम त्याला कमी करुन त्याला चालू वर्षाची डिमांड कमी करुन मिळेल आणि त्यानुसार त्याला वसूली करावी लागेल मूळ मुद्दा हा आहे ज्याच्याकडून आपण जास्त वसूली केली आहे. त्याला जादा वसूल केलेली रक्कम पूढच्या बिलामध्ये समायोजित करुन तितकी डिमांड कमी करावी म्हणजे ॲटोमॅटिक आमच संपेल. ह्याच्यामध्ये एक राहिलेल आहे. ज्याठिकाणी जवळपास ७००-७२५ चे नविन नळ जोडणीसाठी अर्ज आले होते. त्यामध्ये आपण १०,०००

ने त्याची वाढवली होती. त्यांना ही रक्कम आपण परत केलेले नाही की, त्यामध्ये मूळ पावत्या आपण मागवल्या होत्या पण मी असा एक निर्णय घेतलेला आहे की ज्या सोसायटीने नळ मागणीसाठी अर्ज केले होते त्यांनी जादा दराने जी महासभेने दरवाढ केली होती. त्या जादा दराने निधी भरला असेल तर त्या सोसायटीच्या मूळ पावतीची वाट न पाहता सोसायटीच्या अकाऊंटमध्ये क्रॉस चेकने, अकाऊंट पे चेकनी त्याच्या अकाऊंटमध्ये जमा करा. मग ॲटोमॅटीकली त्यांची वाढ आपल्याला येणार नाही. आपल्याकडे रेकॉर्ड आहे. ह्यामध्ये ज्यांनी वैयक्तिक अर्ज केले असतील कारण त्यामध्ये सोसायटीची आज बॉडी बदलली आणि दुसरी बॉडी आली तरी अकाऊंट कायम राहते. त्यासाठी निर्णय घेतला आहे. अडचण एकच आहे ज्यांनी वैयक्तिकरित्या भरले असतील ......................

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, तो विषय आल्यावर बोलले तर बरे होईल. कारण दुसरा माझा विषय गेलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

माझा एकच मुद्दा आहे की, ज्या लोकांची अतिरिक्त वसूली केलेली होती. त्या लोकांना मूळ परतावा परत करणे. ह्यामध्ये समजा काही प्रकरण राहिली असेल किंवा कॅन्सल झाली असतील तर ती आमच्या निदर्शनास आणा म्हणजे लगेच आपण दिल्यानंतर सात दिवसाच्या आतमध्ये ॲक्सेस वसूली केली असेल तर पुढच्या बिलामध्ये ॲडजेस्ट करुन त्यांना सुधारीत बिल देण्यात येईल किंवा त्यांना जो अतिरिक्त निधी वसूल केला असेल तो सुध्दा परत करण्याची प्रशासनाची भुमिका आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आता आपण सांगितले की, आपण जानेवारी पर्यंत ६० करोड वसूल केले होते.

**दिपक सावंत :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, २०१०-११ मध्ये आपण करवाढ केली. करवाढ केल्यानंतर आपण लोकांना डिमांड दिली आणि त्यांनी ॲक्सेस १५ करोड आपल्याकडे भरले. हा विषय आहे. त्याच्यानंतर तो ठराव आपल्याकडून रद्द झाला. आणि ती रक्कम त्या लोकांना परत करायची होती. नेक्स्ट इयर २०११-१२ मध्ये आपण जेव्हा बिल दिल जेवढे मालमत्ताधारक आहेत त्यांनी जे १५ करोड भरले होते त्याचे समायोजन केले आणि जी उर्वरित रक्कम होती त्याचे समायोजन केले आहे. तसे एक बिल माझ्याकडे आहे. कुठल्याही व्यक्तिचे २०११-१२ मध्ये संपूर्ण रकमेचे समायोजन केले आहे. जे टॅक्स वाढवले होते ते संपूर्ण.............

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही उत्तर दिले की, टोटल डिमांडवर ८४ करोड नविन प्रमाणे १०९ करोड. जानेवारीपर्यंत १८ पर्यंत तुम्ही सांगितले की, साधारण ६० करोड आपण वसुल केले. २०११ मध्ये आपली टोटल वसूली किती? म्हणजे अप टू ३१ मार्च.

**दिपक सावंत :-**

६५.३८

**नरेंद्र मेहता :-**

८४ चे खाली ६५ च वसूल केले.

**दिपक सावंत :-**

२०११-१२ मध्ये टोटल बिलाचे समायोजन केले होते.

**नरेंद्र मेहता :-**

१५ करोड जे ॲक्सेस आले होते.

**दिपक सावंत :-**

ते आपण २०११-१२ ला परत दिले.

**नरेंद्र मेहता :-**

५ करोडचे काय फिगर दिले आहे.

**दिपक सावंत :-**

घरपट्टी, शिक्षण कर, मलप्रवाह सुविधा कर आणि पाणीपट्टी लाभ कर ही अमाऊंट पुढच्या वर्षी समायोजित करुन टाकली. लोकांचे पैसे परत दिले.

**नरेंद्र मेहता :-**

पाच करोडना.

**दिपक सावंत :-**

हो.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही बोलता १५ ॲक्सेस घेतलेले.

**दिपक सावंत :-**

टोटल सांगतो.

**नरेंद्र मेहता :-**

हा टॅक्सचाच हेड आहे ना. टॅक्स बिलाचाच भाग आहे ना. तुम्ही टोटल १५ वसूल केलेले आणि टोटल परत किती दिले.

**दिपक सावंत :-**

१५.११

**नरेंद्र मेहता :-**

५.५४ काय फिगर दिली आहे. साहेब दुसरा विषय होता की, ज्यावेळी जी काही बिल निघाली १००० ते ५०० ठिक आहे परंतु ज्याची मोठी बिल निघाली १ लाख ओरिजनल आणि ६० हजार किंवा ५० हजार अॅडीशनल वाढ झाली त्यांनी कोणत्या कारणामुळे भरली नाही तुम्ही त्यांना फेरबिल पाठवली नाही कारण आम्ही पूर्ण शहरात आव्हान केले की कोणी पैसे भरु नका. कारण हे बेकायदेशीर आहे. म्हणून बऱ्याच लोकांनी भरले नाही. आता जे साहेबांनी सांगितले ६० करोड वसुल झाले. त्याच्यामध्ये पण १३ करोड अॅक्सेस होते म्हणजे मूळ तुमचे ४३ करोड थकबाकी होती. त्या ४३ करोडवर इंटरेस्ट त्यांना पॅनलाइज केले. वाय दे विल सफर. तुम्ही त्यांना कधी सुधारीत बिल पाठवलेच नाही. त्याच्याकडून ४३ करोडवर इंटरेस्ट घेतले आहे. लोक येतात त्यांना उत्तर मिळत नाहीत. अॅप्लीकेशन करतात शेवटी आपण जातो आणि पाण्याचे कनेक्शन कापतो.

**दिपक सावंत :-**

साहेब आपण प्रत्येक मालमत्ता धारकाला बिल दिल्यानंतर ते १५ दिवसाच्या आत भरावे. अशी टिप दिलेली असते. त्याच्यावर काही ऑब्जेक्शन असेल तर त्यांनी अॅप्लीकेशन करायचे असते.

**नरेंद्र मेहता :-**

विषय तो नाही. तुम्ही बेकायदेशीर बिल पाठवली होती. ती नागरीकांनी भरलेली नाहीत. तुम्ही त्यांना फेर सुधारीत बिल पाठवली नाहीत. पुढच्या वर्षी डायरेक्ट तुम्ही त्यांना सांगितले की, वाढ झाली ते सोडा बाकीचे पैसे का नाही. त्याच्यावर तुम्ही इंटरेस्ट आकारले आहे.

**मा. आयुक्त :-**

आपले म्हणणे आहे की, मूळ डिमांड १०,००० होती आणि १५,००० बिल दिले वाढ केल्यानंतर १५,००० बिल दिल्यानंतर पुढच्या वर्षी १५,००० वर त्यांनी इंटरेस्ट आकारलेले पैसे भरले नाही. वाढ दिली म्हणून त्यांनी आकारले. परंतु त्याची जी मूळ डिमांड १०,००० होती ती भरण अपेक्षित होते त्यामध्ये त्यांनी प्रशासनाकडे आक्षेप दाखल केला होता का? त्यांनी आक्षेप दाखल केला नसेल आणि पैसे भरले नसतील तर त्यामध्ये आपल्याला इंटरेस्ट वेव्ह करता येणार नाही त्याचा इंटरेस्ट चार्ज करावा लागेल. मात्र इंटरेस्ट हा १०,००० ची थकबाकी आहे. मूळ थकबाकी त्याच्यावर असेल ह्याची खातरजमा करुन घेण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब हे उत्तर पटले नाही. प्रशासनाने चूका करायच्या आणि नागरीकांनी भरायची. त्यावेळेला प्रशासनाला लोकांनी सांगितले आम्ही सांगितले एवढेच पैसे द्या आणि स्विकारा. ते बालतात एवढेच भरावे लागेल त्याची काय चूक आहे. मिरा भाईंदरची लाखो लोक तुमच्याकडे अर्ज आणि आक्षेप घेऊन येणार का? तुम्ही बिल दिल्यानंतर वर्बली ब-याच लोकांनी सांगितले की ही वाढ कशी आहे. बेकायदेशीर आहे. तुम्ही त्याला स्विकारलेच नाही. तुम्ही बोलले भरायची तर भरा. तुमच्याकडून हे झाल्यानंतर तुम्ही त्यांना ३१ मार्चच्या आतमध्ये सुधारीत बिल पाठवले का? की आता हे नाही हे ३१ मार्चचे बिल पाठवले का? तुम्ही बिल पाठवली नाहीत. तुमची मागची बिल शासनाने रद्द केली. सामान्य नागरीकाला कसे माहित पडेल की, आता मला हे पैसे भरायचे आहेत. आता तुम्ही बोलता की, त्यांनी आक्षेप घेतला पाहिजे. शासनाने तुमचा पूर्ण आक्षेप घेतला आहे. अजून कुठला आक्षेप पाहिजे. ही रक्कम आपण त्यांना परत देणार आहोत की नाही.

**मा. आयुक्त :-**

व्याजाची रक्कम परत देता येणार नाही ते मी स्पष्ट केले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही जी व्याजाची रक्कम घेतली आहेत ती परत देता येणार नाही असे आम्हाला लेखी द्या.

**मा. आयुक्त :-**

तसे करता येईल.

**रोहिदास पाटील :-**

शासनाचे असे निर्देश आहेत की, १.४८ असेल तर एक रु. चार्ज करायचा आहे.१.५२ असेल तर दोन रु. काऊन्ट करायचे. आपण जी वाढीव रक्कम आहे त्या सगळ्याला दोन रु. प्रमाणेच काऊन्ट केले आहे. हे जेव्हा तुम्ही परिक्षण कराल तो ही एक टेक्नीकल मुद्दा आहे. ही एक मोठी अमाऊंट आहे. जी कळत नकळत नागरिकांकडून वसूल झालेली आहे.

**निलम ढवण :-**

मॅडम, सर्व सामान्य नागरीक आहेत. काही अशिक्षित पण आहेत. महानगरपालिकेच्या ज्या प्रोसीजर आहेत त्या वारंवार शक्य नाही किंवा त्या त्यांना कळत नसतात की आक्षेप घेणे किंवा अर्ज देण मग वाट बघून आपले नळ कनेक्शन कापले जाईल किंवा सिल लागेल ह्या भितीने सर्व सामान्य नागरीक त्याचा भरणा करीत असतो. ह्या कराच्या रुपाने ह्या घटना वारंवार घडतच असतात. त्यामुळे पुढे प्रशासनाने ही काळजी घ्या की

गोरगरिब जनतेला आणि नागरीकाला ह्या गोष्टीचा त्रास होणार नाही. आणि त्यांना ह्या आक्षेप वैगेरे नोंदवणे ह्या झंझटीमध्ये पाडू देऊ नका. ह्याची काळजी प्रशासनाने घ्यावी.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आता जी टॅक्सची बिल आली त्याच्यामागे एक रश्मी बिल्डरची जाहीरात आली आहे. हा निर्णय काय पॉलिसी डिसीजन वाटत नाही. आपल्याला हा महासभेचा अधिकार आहे. एखाद्या महापालिकेच्या वास्तूवर कोणाचे नाव टाकायचे तुम्ही डायरेक्ट छापून टाकले. मा. आयुक्त साहेब रश्मी बिल्डरची जाहीरात आपण करतो, त्याच्यावर अनेक एम.आर.टी.पी. चे गुन्हे दाखल केलेले आहे. तुम्ही त्याच्या बिल्डींगवर कारवाई केलेली आहे. अजून त्याच्या कितीतरी बिल्डींग डिमॉलीश करुन अशाच पडलेल्या आहेत. आणि तुम्ही एका बाजूला जाहिरात करता घर हो तो ऐसा. यहाँ पे खरीदे ह्याचे आम्ही मिनिंग काय समजायचे. पहिली गोष्ट तुमचे अधिकार नसताना केल कस. आणि केल तर अशा बिल्डरचे ज्याच्यावर अनेक एम.आर.टी.पी. चे गुन्हे दाखल आहेत. त्याची बिल्डींग तोडली आहे.

**दिपक सावंत :-**

ह्या बाबत खुलासा करु इच्छितो.

**नरेंद्र मेहता :-**

ॲड कशी छापली ते सांगा.

**दिपक सावंत :-**

ॲड छापण्याबाबत आपण रितसर निविदा काढली होती.

**नरेंद्र मेहता :-**

कोणाच्या परवानगीने?

**दिपक सावंत :-**

त्यावेळेस इलेक्शन होते. त्यामुळे मा. आयुक्तांच्या परवानगीने निविदा काढायला लागायच्या.

**नरेंद्र मेहता :-**

काहीतरी थापा मारु नका. बॉडी डिझल्व्हर्ड झाली का कधी. नविन इलेक्शन होईपर्यंत बॉडी अस्तित्वात होती. त्यानंतर आचारसंहिता लागली. मा. आयुक्तांना कसला अधिकार आला.

**दिपक सावंत :-**

आचार संहितेच्या कालावधीतच आपण बिले काढली.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, सांगा आचार संहिता लागल्यावर आयुक्तांना प्रशासकीय अधिकार आले का? तुम्हाला नियम कोणी सांगितले.

**दिपक सावंत :-**

दहा लाखाच्या खालीच होते.

**नरेंद्र मेहता :-**

दहा लाखाचा विषय नाही. इट वॉज द पॉलीसी डिसीजन. तो एक लाखाचा असू दे किंवा पाच करोडचा. आय ॲम टॉकींग अबाऊट द पॉलीसी डिसीजन. एक रुपयाचा असेल तरी सभागृह घेतो. आयुक्त बोलेल आचार संहिता होती म्हणून मी करुन टाकले.

**दिपक सावंत :-**

आता पर्यंत आपण बिल काढण्यासाठी साधारण ९ ते १० लाख खर्च येत होता.

**नरेंद्र मेहता :-**

विषय तो नाही. तुम्ही चांगल केल त्यासाठी आम्ही तुमचे कौतुक करु. पहिल मला सांगा हे कोणाच्या अधिकाराने तुम्ही केले? तुम्ही महासभेचा अवमान केलेला आहे.

**दिपक सावंत :-**

ह्याच्यामध्ये आपण पेपरमध्ये नोटिस दिली होती आणि ऑफर मागवली होती. कोणाला करायचे आहे का? तर त्यांनी आपली ऑफर स्विकारली............

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, इट वॉज नॉट डिसाइडेड बाय द बॉडी हा पॉलीसी डिसीजनचा भाग आहे. उद्या आपल्या एखाद्या साफ सफाईचे असेल तर त्याला कोणत्याही कंपनीचे नाव द्यायचे नाही. द्यायचे हा निर्णय सभागृहाने घ्यायचा असतो. पार्किंग करतो तो देखील सभागृहाचा निर्णय असतो. आपल्या महापालिकेच्या वास्तूवर एखाद्या खाजगी व्यक्तीचे नाव करुन ते पूर्ण शहरात वाटप केले इट इज द पार्ट ऑफ पॉलीसी डिसीजन वेदर यू शुल्ड गो ऑर नॉट. हे कसे निर्णय घेऊ शकतात. ज्या अधिकाऱ्याने केले आहे त्याच्यावर कारवाई व्हायला पाहिजे अशी आम्ही मागणी करतो. तुम्हाला हे वाटते का की, ज्या बिल्डरवर आपण एम.आर.टी.पी. चे अनेक गुन्हे दाखल केले. आजही त्याचे अनेक अनधिकृत बांधकाम आहेत. अशा लोकांची जाहीरात महापालिकेने करायची आहे का? स्वप्निल सावंत आपण सांगा आपण अतिक्रमणला अधिकारी होते. कदाचित तुम्ही एखादा तोडले असेल. एखादा गुन्हा दाखल केला असेल. एक सर्व्हे नं. तुम्हीच दिलेले आहे

की इनलिगल काम झालेले आहे. कारवाई झालेली नाही. मा. आयुक्त साहेब आपल्याला वाटते का धिस इज राईट पॉलीसी. पैशासाठी आपण कोणाचीही जाहिरात करु. सेव्हींग व्हायला पाहिजे ह्याच्यात काही दुमत नाही. तुम्ही चांगल्या योजना राबवा वी ऑल ऑफ विथ यू. आम्ही तुमच्या बरोबर आहोत. पण तुम्ही महासभेला न विचारता तुम्हाला वाटेल तसे करायचे का? तुमच्यावर कारवाई व्हायला नको का?

**दिपक सावंत :-**

ह्याच्यासाठी मी तुम्हाला खुलासा केला की, आचारसंहिता होती आणि बिल अर्जन्टमध्ये छापायची होती.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम ह्यांना किती घाई होती. आमचे म्हणणे आहे की, आमच्या अधिकाऱ्यांचा कसा विचार करु शकतात. ह्याच्यापेक्षा पण अधिक महत्वाचे निर्णय असतात. करोडो रुपयाचे निर्णय होतात जे महत्वाचे असतात. तुमचे असे म्हणणे आहे का की, ज्यावेळेला आचारसंहिता असते तेव्हा महासभा लागत नाही. तेव्हा आयुक्तांनी निर्णय घ्यायचा. मा. महापौर मॅडम आपण ह्याच्यावर काय कारवाई करणार?

**दिपक सावंत :-**

ह्याच्यामध्ये कोणताही उद्देश नाही.

**रोहिदास पाटील :-**

उद्देश नाही असा प्रश्न कसा येईल. तुमच्या अधिकाराचच उल्लंघन आहे. की तुम्हाला अधिकार नाही. आणि इलेक्शन पिरेडमध्ये तुम्ही डेरींग केली. इलेक्शन पिरेडमध्ये जरी आधार घेऊन काम करत असाल. १०० रु. खर्च करायला तुम्हाला परवानगी नाही. सभागृह कशासाठी आहे. सभागृहाच्या अधिकाराचे पालन व्हायला पाहिजे. ते न होता तुम्ही लाखो रुपयाचे काम आणि खरोखर ज्याच्यावर बदनामीचे आरोप आहेत, ज्यांचे बांधकाम महापालिकेने तोडलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, ह्याच्या म्हणण्याप्रमाणे माझे विरोधी पक्ष दालन आहे. मला कोणी सांगितले मेहता साहेब तुम्ही आज येणार नाही. मी तुम्हाला १०० रू. भाडे देतो मला वापरु द्या. मग मी असा विचार करायचा का की, फायदा होतो. तो बोलला हे घ्या १०० रु. तुमचे काय नुकसान झाले. १०० रु. आपल्याला भेटले ना. देत राहू का भाड्यावर. हे कोणी सांगितले कुठला तरी आम्हाला येऊन कायदा शिकवतात.

**मा. आयुक्त :-**

जाहिरातीची पॉलिसी शासनाने ठरवली आहे की, ज्या-ज्या विविध मार्गातून महानगरपालिकेला उत्पन्न मिळू शकेल. ते मार्ग टॅब करावेत. आणि त्यानुसार जे काही उत्पन्न होईल त्यातून महानगरपालिकेची आर्थिक स्थिती भक्कम करावी. ह्याच्यामध्ये असे दिसते की, आपण बिले इश्यू करतो. त्यामध्ये ॲडव्हटाईजमेंट जसे रेल्वे तिकीटावर रेल्वेच्या पाठीमागे एखादी ॲडव्हटाईज असते तसेच वेबसाईट ॲडव्हटाईज असते. तशीच ॲडव्हटाइजमेंट केलेले आहे. ॲडव्हटाइजमेन्टची निविदा काढावी. ती दहा लाखाच्या आतमध्ये होती म्हणून ती त्यावेळचे मा. आयुक्तांनी ती मान्य केली आणि त्यानुसार संबंधितांना दिली. आता इथून पूढे आपल्याला असे करता येईल की, ॲडव्हटाइजमेन्ट पॉलिसी तयार करताना आपण असा उल्लेख केला की त्याचे पूर्वचरित्र्य तपासून पहावे आणि त्याच्यावर काय गुन्हे दाखल आहेत का? ते तपासून पहावे. त्याची निश्चितपणे काळजी घेण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

आचार संहिता असताना आयुक्तांना निविदा काढायचे अधिकार आहेत का? ते सांगा. जे पॉलिसी डिसीजन आम्ही केलेच नाही. हे टॅक्सचे बिल प्रत्येक घरोघरी जाते इट इज द नॉट पार्ट ऑफ रुटीन होर्डींग ॲन्ड ॲडव्हरटाईजमेंट. इट इज अ वन काईंड ऑफ. वी आर समथिंग विथ देम. कॉलब्रेशन बोला जॉइंट वेन्चर बोला. जे काही बोला प्रत्येक घरी ते बिल जाते. तुमच्याकडे उत्तर नाही की, तुम्हाला दहा लाखाचा अधिकार होता म्हणून केले का? हे मला सांगा. मा. महापौर मॅडम, सभागृहाचे अधिकाराचे हरण आणि अवमान दोन्ही झाल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर आपण काय कारवाई करणार. ह्याचा आम्हाला निर्णय द्या. असच चालत राहिले तर चालणार नाही.

**मा. महापौर :-**

ते काय सांगतात की एक्स आयुक्त होते त्यांनी केलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

कमिशनरसमोर पूटअप कोणी केले. एखादे टाऊन प्लानिंग असेल पाणी डिपार्टमेंट असेल हे सगळे शिफारस कोणी केले.

**दिपक सावंत :-**

ह्यामध्ये शिफारस करण्याचा उद्देशच हा होता की, ॲडव्हटाईजमेंट पॉलिसीनुसार ..................

**नरेंद्र मेहता :-**

शिफारस कोणी केली.

**दिपक सावंत :-**

डिपार्टमेंट थ्रु शिफारस केली. ह्याच्यामध्ये ठाणे महानगरपालिका, नवी मुंबई महापालिकेत असेच बिल छापले जाते. ह्या अनुशंगाने साहेबांनी आम्हाला बोलवले की, आपल्याला सुध्दा हे असे करा असे निर्देश दिले त्यानुसार आम्ही केले. मा. आयुक्त साहेबांनी जे निर्देश दिले की, बाकीच्या ठिकाणी आपल्या महापालिकेच १० लाख रु. वाचतात तर तुम्ही ह्याप्रमाणे नोटिस पब्लिश करा. बिल्डरच नाही कोणी एखादी सामाजिक संस्था असेल किंवा छोटे-छोटे क्लास किंवा वेगवेगळ्या बँका असतील. तुम्ही कुणाचाही कोट घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब विषय काय आहे. मुंबई महापालिकेत २५,००० मानधन आहे. लॅपटॉप दिले म्हणून तुम्ही देणार का? त्यांचा तुम्हाला काय संबंध आहे. तिकडे एका अधिकाऱ्याने असेच केले होते त्या अधिकाऱ्याला दहा मिनिटात निलंबीत केले. ते तुम्ही कधी सांगणार का? महासभेचा अधिकार असताना परस्पर कसे केले. तुम्ही बोलून मोकळे झाले की, आता ठिक आहे. मग नंतर तपासू. नुकसान झाले त्याला कोण जबाबदार? झाला विषय संपला. आणि एखाद्यां अधिकाऱ्याला शिक्षा दिल्याशिवाय हे होणार नाही. त्यांचे काम होते पॉलिसी चेक करा. मा. आयुक्तांना पॉलिसी रिझन माहित नसताना ती खालून शिफारस जाते. त्याप्रमाणे ५० टक्के आयुक्त अधिकाऱ्याच्या शिफारशीवर सह्या करत असतात. ज्या बिल्डींगची ए विंग तोडली आहे. बी विंग मध्ये टॅक्सच्या मागे त्याचीच ॲडव्हटाईज जाते. मॅडम वी नीड द जस्टीस. आम्हाला न्याय पाहिजे. हे झाले ते बघायला गेले तर खूप मोठ आहे. हे चूका करणार आणि आम्ही भोगत राहणार. टॅक्सचा पण अधिकाऱ्यांना शिफारस केली नसती तर नागरिकांना त्रास झाला नसता आणि सभागृहाचा अवमान झाला नसता. सभागृहाला खोटी माहिती देता त्यामुळे सत्ताधारी निर्णय घेतात आणि मग जनतेला हे भोगावे लागते. त्यावेळेला स्पष्ट मांडायचे होते की हे करता येणार नाही. अधिकाऱ्याला पाहिजे तसे मांडत राहायचे. तुम्हाला पाहिजे तसे करुन टाकले. मा. आयुक्तांनी सांगितले की, इंटरेस्ट परत देणार नाही. त्याच्यात नागरिकांचा काय दोष आहे. तुम्ही ५०० रुपयांसाठी त्यांना घराबाहेर काढता, सिल लावता त्याच्या पाण्याचे कनेक्शन कापता. सामान्य नागरिकांना विचारा की, ५०० आणि १००० रुपयाचे काय महत्त्व आहे. ४३ करोडचे व्याज किती होते. आपण किती टक्के लावता.

**दिपक सावंत :-**

१२ टक्के.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही ४३ लाख एक्स्ट्रा घेतले. तुम्हाला ४३ लाख काही वाटत नाही. घेतले तर घेतले आता परत देणार नाहीत. तुम्ही नागरिकांकडून एक रुपया सोडता का? की ५० रुपये कमी आहे एक्सेप्ट करा. मॅडम ह्याच्यावर आज रुलिंग आणि निर्णय पाहिजे. ज्या अधिकाऱ्याने ही बदमाशी केली आहे त्याच्यावर आपण काय कारवाई करणार? सभागृह काय कारवाई करणार? मा. आयुक्त साहेब आम्ही तुमच्याकडुन हीच अपेक्षा करतो चांगले कार्य करा असे अनेक तुमच्याकडे असतील तुम्ही आणा आम्ही त्याला सहमत करु पण जे अधिकारी करत असतील त्यांना जाणीव पण झाली पाहिजे की तुम्ही ज्या बेकायदेशीर गोष्टी करता त्या आम्ही एक्सेप्ट करणार नाही तुमच्याकडे सगळे जुनेच विषय येणार आहेत राजन पाण्डेच्या जेवढ्या होत्या नव्हत्या तेवढ्या सगळ्या इमारती तोडल्या आहेत त्याचे केले असते तर ॲडचे १० लाख जास्त आले असते.

**प्र. नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराची वेळ संपली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मला निर्णय पाहिजे त्याचे रुलिंग द्या.

**मा. महापौर :-**

मी ह्या सर्वांना बोलवून लिगली कोणाचे राईट्स आहे आणि काय आहे ते बोलतात पूर्वीपण असे झालेले आहे की, आचार संहितेमध्ये कमिश्नर साहेबांनी डिसीजन घेतले आहेत नंतर बॉडीने त्याला........

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम असे उदाहरण देऊन चालेल का? एकदा चुक झाली म्हणून परत चूक करायची का?

**मा. महापौर :-**

उदाहरण असे नाही आज एवढी वर्षे जे चालले आहे आचार संहितेमध्ये कितीतरी डिसीजन घेतलेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

I am not worried about the आचार संहिता की केलं असेल अधिकार नसताना अधिकाऱ्याने केले कसे?

**मा. महापौर :-**

ते काय बोलले आम्ही ॲडव्हटाइजमेंट दिलेले जे बिल्डर आले त्याचे आम्ही घेतले खास करुन ते रश्मी वाल्याकडे गेले नाहीत.

**नरेंद्र मेहता :-**

जे लोक खोंट करतात ते लवकर येतात.

**मा. महापौर :-**

कोई दुध का धुला हुआ नही है। सर्व आहेत ह्या लोकांनी लिगली ॲडव्हटाईज दिलेली जे आले आहेत त्यांना काय करायचे? रश्मी वाल्याचे असू दे तुमचे किंवा माझी कंपनी कोणी असू द्या.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांना विचारा भारतीय जनता पार्टी छापते का विचारा? आम्ही दहा लाख जास्त देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडमनी आम्हाला खुलासा दिलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

खुलाश्याचा विषय नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

रुलिंग दिलेले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

पैसे घेऊन ॲड होत नाही भाजपाची आली राष्ट्रवादी कि कॉंग्रेसची आली ते छापणार का? पैसे जास्त आले म्हणून पैसे जास्त घेऊन ॲड छापता येत नाही ना.

**मा. महापौर :-**

लिगली त्याचे काय आहे ते मी विचारले आणि त्याचा खुलासा दुसऱ्या महासभेत देते. तुम्ही आमच्या निदर्शनास आणून दिले आहे तर त्याचे मी तुम्हाला दुसऱ्या वेळेला उत्तर देते.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त आणि मा. महापौर मॅडम तुमच्या दोघांकडुन आमची सभागृहाची अशीच अपेक्षा आहे. अधिकारी वारंवार आपल्या अधिकाराचा वापर करत असेल तर सभागृह ते सहन करणार नाही आणि ह्याच्यावर आपण कडक कारवाई करणार अशी अपेक्षा करतो. आणि पुढील महासभेत किंवा त्याच्या अगोदर काय कारवाई केली ह्याची मला माहिती द्या.

**प्र. नगरसचिव :-**

आजच्या सभेसाठी दोन रजेचे अर्ज आले आहेत. सन्मा. शरद केशव पाटील आणि सन्मा. प्रमोद सामंत एक लक्ष वेधी आहे सन्मा. मदन उदीत नारायण सिंग ह्यांची, ती मी मा. महापौरांकडे देतो.

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरीता सन्मा. सदस्य मदन सिंग ह्यांची लक्षवेधी आली असून ती मी स्विकारत आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर मॅडम लक्षवेधी घेतल्याबद्दल धन्यवाद.

**मा. महापौर :-**

लवकर आटपा हिच विनंती आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मॅडम आमचा उद्देश वेळ घ्यायचा नाही तर लोकांना न्याय द्यायचा.

**मा. महापौर :-**

आहे पण असे नाही एक तास आहे तर एक बोलायचे असे नाही तुमची एकच लक्षवेधी आहे म्हणून मी सांगते.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आज मिरा भाईंदर शहरात लोकांच्या आरोग्यासाठी डास निर्मुलन आणि किटकनाशक तरी काय उपयोग होत नाही तीन चार महिन्यात शहरात डासाची खुप उत्पत्ती होत आहे. मिरा भाईंदरच्या सर्व जनतेला डासाचा खुप त्रास होत आहे. त्यामुळे डेंग्यु, मलेरीया सारखे रोगराई पसरत आहेत तरी अधिकाऱ्याचे ह्याच्यावर काही लक्ष नाही असा मी आरोप करतो जे काही किटकनाशके किंवा अळीनाशक डास निर्मुलनावर जो खर्च होतो लोकांच्या मनात अशी शंका येते की ती औषध खरोखर विकत घेतात की नाही की नुसते कागदावर औषध येते ह्याचा खुलासा करण्यात यावा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो. सन्मा सदस्यांनी मांडलेल्या लक्षवेधीवर माहिती देतो. महानगरपालिकेच्या एकुण चार प्रभाग समित्या आहेत त्यापैकी १२४ कर्मचारी आपण स्प्रेईंगसाठी ठेवतो प्रत्येक वार्डमध्ये दोन कर्मचारी आहेत असे ४७ वॉर्डमध्ये कर्मचारी आहेत टोटल सहा टेम्पो आहेत प्रत्येक प्रभागात १-२ असे टेम्पो आहेत तीन चाकी दोन टेम्पो आणि चार चाकी चार टेम्पो आहे असे सहा टेम्पो आहेत औषधाचा साठा आहे हिवाळ्याच्या दिवसात मच्छरचे प्रमाण वाढले आहे ते मी मान्य करतो दुसरी गोष्ट आपले जे काही लिमिटेशन आहेत. बऱ्याच ठिकाणी नाल्याचे आणि गटाराचे काम चालू आहे. खाडीचा किनारा आहे ह्याठिकाणी मच्छरची पैदास भरपूर होते तरी त्याठिकाणी मॅक्झीमम कसे करता येईल त्याचा प्रयत्न करतो बायोलॉजी कंट्रोल म्हणून १८० ठिकाणी गप्पी मासे पैदास टाकतो त्या ठिकाणी बऱ्यापैकी कंट्रोल आलेले आहे ह्यावर्षी

मलेरीया चे पेशंट फार कमी आहेत गेल्या वर्षीची आणि ह्या वर्षीची तुलना करुन ह्यावर्षी मलेरीयाचे किती पेशंट आहेत ते सांगतो. २०११-१२ मध्ये ११७१ पेशंट होते ह्यावर्षी फक्त ८३१ आहे. तसेच डेंग्युचे प्रमाण बऱ्यापैकी कमी झालेले आहे. गेल्या महासभेने मल्टीपर्पज वर्करची मान्यता दिलेली आहे ते भरल्यानंतर आपल्याला ब-यापैकी कंटेनर सर्व्हे घरोघरी जाऊन रक्ताचे नमुने घेऊन त्यांना ट्रिटमेंट देणे ह्याप्रकारे करता येईल आणि नविन दोन टेम्पो ह्यावर्षी ..........

**मदन उदितनारायण सिंह :-**

तुम्ही म्हटले आहे की, आपल्याजवळ चार टेम्पो आहेत पण माझ्या प्रभागात दोन तीन महिन्यांनी टेम्पोचे दर्शन होत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मोठे नाले आहेत तिकडचे टेम्पो वापरतो छोट्या नाल्यासाठी टेम्पो देत नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपल्याकडे चार चाकी टेम्पो किती आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

दोन आहेत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

दोन टेम्पो अख्ख्या मिरा भाईंदरमध्ये किती दिवसात येतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मोठे नाले आणि कच्चे नाले आहेत ते कव्हर करतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

जरी नाल्यामध्ये केले आमच्या वॉर्डत नाला आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ह्यावर्षी दोन प्रपोज करतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

औषध मारण्याचे जे पंप असतात ते कायमचे नादुरुस्त असतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब चालू आहेत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

कायमचे नादुरुस्त असतात गेल्या महिन्यामध्ये मी तक्रार केल्यानंतर ते पंप रिपेयर झाले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

प्रत्येक सदस्याची फाईल आहे आपली प्रत्येक ठिकाणी सही आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

तुम्ही सही घेता फवारणी करता पण मच्छरचा त्रास लोकांना जात नाही त्याच्यावर काय उपाय आहे? आपली काय उपाययोजना आखली आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

योजना आखलेली आहे. औषध बरोबर आहे की नाही त्याची फिजीकल टेस्ट केलेली आहे. त्याचे आपल्याकडे रिपोर्ट आहेत सेंट्रल इन सिक्स साईटचे बोर्डचे रिपोर्ट आहेत औषध घेतलेले प्रमाणात आहेत की नाही ते सर्टिफाय करुन आलेले आहेत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

कागदावर तुमचे सगळे रिपोर्ट आहेत ती मला कल्पना आहे पण लोकांना त्याचा इफेक्ट होत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मच्छरचे डिसीज पावर वाढलेली आहे आपण घरीसुध्दा मोठेमोठे हिट वापरतो एवढ्या मोठ्या प्रमाणात इनडोअर स्प्रिंग करु शकत नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

दिड वर्षापासून धुर फवारणी करत नाही का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब त्याचा उपयोग होत नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

सावंत साहेबांनी सांगितले की, ठाण्यामध्ये करतो म्हणून आम्ही इथे करतो आपल्याजवळ पासच्या, मुंबई, ठाणे, वसई-विरार सगळीकडे धुर फवारणी चालु आहे आपल्याकडेच का बंद आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ह्या दोन वर्षामध्ये दोन कोटी रुपये खर्च केला होता. अननेसेसरी पेट्रोल, डिझेल आणि औषध लागते त्याचा काही फायदा होत नाही. लोकांच्या समाधानासाठी मोस्केट रिपेलाईन्ट आहे. तात्पुरता तो बाजूला मच्छर जातो. वारा आला की दुसरीकडे जातो त्याचा काही उपयोग होत नाही लोकांना दाखविण्यासाठी त्याचा

काही उपयोग नाही. धुर फवारणीचा उपयोग नाही अगोदर २-२ कोटी खर्च करत होते आता आपण ६० ते ७० लाखावर खर्च आणलेला आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

ह्याच्यावर काय उपाययोजना आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण दोन टेम्पो घेतो. गेल्या महासभेत मल्टीपर्पज जो ४१ मंजुरी दिलेली आहे ती भरती करतो. दोन नविन टेम्पो घेतो आणि जोपर्यंत पक्के नाले आणि गटार कव्हर होणार नाहीत कारण आपली भौगोलिक परिस्थीतीच तशी आहे दहा कोटीची औषधे मारली तरी फरक पडणार नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

भौगोलिक परिस्थीती सोडा जेसलपार्कमध्ये अंडरग्राऊंड ड्रेनेज आहे तरीदेखील तिकडे खुप मच्छर वाढलेले आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पर्टीक्युलर केसमध्ये मी बघायला सांगतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

तुम्ही सांगता धुर फवारणीचा काही इफेक्ट नाही त्याचा आपल्याकडे काही मेडीकली रिपोर्ट आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

डिस्ट्रीक्ट मेलेरिया ऑफिसरशी चर्चा केलेली आहे त्याचा काही उपयोग होत नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मग बाकीच्या महानगरपालिकेत कसे काय हे चालू आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

लोकांना दाखविण्यासाठी समाधानासाठी..............

**मदन उदितनारायण सिंह :-**

मग इकडेपण लोकांचे समाधान करा लोकांना असे वाटते की, नगरपालिका काय करत नाही. तुम्ही सांगता औषधाने काय होत नाही तर लोकांचे समाधान तरी करा. काय तरी केले पाहिजे आपल्या रिपोर्टवर जरी मलेरीया, डेंग्यु जर कमी असेल तरी लोकांना भरपुर त्रास आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

तीन ठिकाणी खाडया आहेत. त्यामुळे खाडीच्या ठिकाणी मोठ्या मच्छराची पैदास होते आता अंडर ग्राऊंड ड्रेनेज सिस्टीम नाल्याचे काम सुरु आहे. गटाराचे काम चालू आहे. प्रवाहच होत नाही, फ्लोच होत नाही. तोपर्यंत मच्छर ........................

**मदन उदितनारायण सिंह :-**

माझ्यामते तुम्ही ग्लोबल वेस्ट मॅनेजमेन्टला ठेका दिला आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्याचा काही संबंध नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपल्या गटार सफाईचा ह्याचा काही संबंध नाही का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तो फक्त मॅनपावर करते. महानगरपालिका औषध वितरीत करते.

**मदन उदितनारायण सिंह :-**

गटाराची सफाई व्यवस्थित नसेल तर त्याचा आणि ह्याचा काही संबंध नाही का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मच्छर आणि साफसफाईचा संबंध नसतो. मच्छर फक्त पाण्याने पैदास होते. बरेच ओपन प्लॉट आहेत त्याठिकाणी स्प्रेईंग करु शकत नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

गटारात गाळ भरलेला असेल त्यातून मच्छर होत नाही का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तो गाळ आपण काढतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

ते पण व्यवस्थित होत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

कुठे असेल तर सांगा. मला कधी सांगीतले नाही.

**गिता जैन :-**

गाळ काढून साईटवर ठेऊन देतात. पावडर टाकत नाही. उलट ते जास्त प्रॉब्लेमॅटिक आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

गाळावर मच्छर वाढत नाही तुमच्या माहितीसाठी सांगतो.

**गिता जैन :-**

*जर मच्छर वाढत नाही तर १०-१२ दिवस तसेच ठेवा.*

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

४-५ दिवसांनी वाळल्यावर आपण उचलतो. त्याला प्रोसेस असते. लगेच उचलू शकत नाही.

**गिता जैन :-**

साहेब, तुमची जबाबदारी क्लिनिंगलेसची आहे. जी तुम्ही बरोबर करत नाही.

**दिपीका अरोरा :-**

साहब, धुवा फवारणी बंद है। मैंने आपको रायटिंग में दिया की, मच्छर की दवा श्याम के टाईम छिंडकी जाये जिससे उस दवा का असर हो।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ठीक है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

ह्याचा खूप त्रास आहे. ह्याच्यावर काही तरी नियोजनबध्द उपाय करा. ज्याने लोकांना त्रास कमी होईल.

**वंदना चक्रे :-**

मा. आयुक्त साहेब, आरोग्याचा फार गंभीर प्रश्न आहे. पानपट्टे साहेब आम्ही आपल्याला वारंवार *सांगतो. तुम्हाला लेखी देना बहुत जरुरी है। तुम्ही तोंडाने सांगून खरच ऐकत नाही असे मला तरी वाटते.* मिरा-भाईंदरमध्ये प्रमाणाच्या बाहेर मच्छर आहे. तुम्ही म्हणता औषध मारतो. एवढ्या गाड्या आहेत. एवढे टेम्पो आहेत, पण ते आमच्याकडे महिन्यातून एकदा येते. चार प्रभागात दोन-दोन गाड्या दिल्या आहेत. तुम्ही म्हणता सह्या आहेत तर माझी सही दाखवा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आहे. मी दाखवतो.

**वंदना चक्रे :-**

औषध मारले जात नाही. डासाचे अंडे मारले असे तुम्ही सांगता. ते औषध सुध्दा टाकले जात नाही. ते पाणी टाकून आणतात ना ते नुसते नावाला मारता. तुम्ही ह्याच्यावर जास्त लक्ष द्या. आम्ही लक्ष देतो पण ते टाकत नाही. मा. आयुक्त साहेब, ह्याची नोंद घ्यावी. कारण मिरा-भाईंदरमध्ये आपण नविन आले आहेत. मच्छर इतके खतरनाक आहे की, जीवच घेऊन टाकतील औषधाच्या साठ्यावर लक्ष ठेवा. ह्याच्यात फार मोठा घोळ आहे. पानपट्टे साहेब आपण ह्याच्यावर लक्ष द्या. आपण लक्ष दिले नाही तर मी स्वस्थ आणि गप्प बसणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**प्रशांत केळूस्कर :-**

साहेब, आपल्या मिरा-भाईंदरमध्ये डेंग्यूचे किती पेशंट आहेत त्याची तुमच्याकडे नोंद आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

नोंद आहे.

**प्रशांत केळूस्कर :-**

एका वर्षात किती झाली?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

चालू वर्षात २७ आहेत.

**प्रशांत केळूस्कर :-**

मयत किती आहेत?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

गेल्या वर्षी मयत तीन आहेत.

**प्रशांत केळूस्कर :-**

ह्या वर्षी किती आहेत?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ह्या वर्षी मयत नाही. २०१२-१३ मध्ये तीन आहेत.

**प्रशांत केळूस्कर :-**

मॅडम माझ्या वॉर्डमध्ये प्रभाग १४ मध्ये दोन जण डेंग्यूने मयत झाली आहेत. १४ जणांना लागण आहे. त्यांची अजून नोंद नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जोपर्यंत सस्पेक्टेड ......................

**प्रशांत केळुस्कर :-**

सस्पेक्टेड म्हणजे तुमची माणसे तिथे पोहोचत नाहीत.

(सभागृहात गोंधळ)

**वर्षा भानुशाली :-**

साहेब आता बोलले की, मलेरीया आहे, पण डेंग्यु नाही. म्हणजे साहेबांना डेंग्युचे लक्षातच नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

डेंग्यु नाही म्हणून मी कुठे बोललो?

**वर्षा भानुशाली :-**

आता तुम्ही बोलले की, मलेरीया आहे आणि डेंग्यु नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

११-१२ पेक्षा १२-१३ मध्ये त्याचे प्रमाण कमी झाले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

डेंग्यु आणि मलेरीयाची नोंद नाही. याचा अर्थ डेंग्युचे पेशंट मिळावेत अशी पालिकेला अपेक्षा आहे. त्यानंतर कार्यवाही होणार का? मलेरीया आणि डेंग्युची नोंद नाही, याचा अर्थ प्रगती आहे, असे वाटते का?

**मा. महापौर :-**

सर्वांनी बसून घ्या, मी सर्वांना बोलायला देते.

**निलम ढवण :-**

नवघर पट्टयाला जुने थ्रीव्हीलर टेंम्पो दिलेले आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आता दोन नवीन घेत आहोत.

**निलम ढवण :-**

त्याचे स्टोरेज पण तुम्ही जे चारशे लिटर म्हणता, ते होत नाही. दोनशे लीटर पर्यंतच होते आणि त्यांचा लोड मागच्या व्हीलवर गेल्यामुळे जुने टेंम्पो असल्यामुळे तिथे त्यांची कार्यक्षमता येत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आता आपण दोन टेम्पो घेत आहोत.

**प्रशांत केळुस्कर :-**

पानपट्टे साहेब, तुम्ही मला एक सांगा की, जे सस्पेक्टेड आहे म्हणता, मग मी जे चौदा सांगता त्यापैकी तीनच झाले. मग बाकीच्यांची नोंद आपल्याकडे का झाली नाही?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, नोंद आहे.

**प्रशांत केळुस्कर :-**

तुमच्याकडे फक्त तीनच जणांची नोंद आहे. मग चौदा जणांची नावे सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

रेकॉर्ड आहे. सस्पेक्टेड वेगळे. जोपर्यंत सिव्हील सर्जनकडून येत नाही, तोपर्यंत आपल्याला घोषित करता येत नाही. शासनाचा तसा नियम आहे.

**प्रशांत केळुस्कर :-**

मी तिकडे तुमच्या माणसांना निदर्शनास आणून दिलेले आहे. श्री. अनिल राठोड म्हणून तुमचा जो अधिकारी आहे, तो कामामध्ये खूप हलगर्जीपणा करतो. त्याला मी दाखवून दिलेले आहे. तरी तो माणूस तिथे आला नाही. म्हणजे नगरपालिकेस त्यांनी बघितल्यानंतर इकडे त्यांच्याकडे नोंद केलेली नाही. मग, तुमचे त्या माणसांवर नियंत्रण काय आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मागे तुम्ही मला सांगितले. आजुबाजुला मी स्प्रेईंग करुन घेतले होते.

**प्रशांत केळुस्कर :-**

परवाचीच गोष्ट आहे. परवा तिथे होते. परवा सोळा ते सतरा घरांमध्ये डेंग्युच्या अळी सापडल्या. ती नोंद तुमच्याकडे आली का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मी चौकशी करतो.

**मा. महापौर :-**

श्री. पानपट्टे साहेब, मी तुम्हाला सांगते की, मच्छरचा जो विषय आहे. खरोखर गंभीर आहे. गेल्या मा. महासभेमध्ये पण आम्ही बोलत होतो. नंतर तुम्हाला मी नंतर बोलवून पण बोलले की, साहेब थोडे लक्ष द्या. त्यावेळी तुम्ही लक्ष दिले असते तर आज सर्व बोलले नसते. तुम्ही एक दिवस संपूर्ण रात्र भाईंदरमध्ये राहा.

तुम्ही रोडवर उभे राहा. सर्वांनी बसून घ्या. मी त्यांना सांगितलेले आहे. या एक महिन्यात केले नाही तर आपण त्यांच्यावर कार्यवाही करु.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, मला या विषयावर एक सुचना करायची आहे. पानपट्टे साहेब, तुम्ही सभागृहाला औषध फवारणी संदर्भात गाड्यांबाबत माहिती दिली. लक्षवेधी चांगली होती. फक्त त्याच्यावर व्यवस्थित चर्चा झाली नाही. आपल्याकडे थ्री व्हीलर टेंम्पो किती आहेत?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

दोन आहेत.

**जुबेर इनामदार :-**

आणि चार?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ते चार आहेत.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, आपले जे जुने टेम्पो आहेत, ते नादुरुस्त आहेत. ते टेंम्पो बदला. या महापालिकेच्या लोकांना आपण ज्या सोयी सुविधा देऊ शकतो, त्यामध्ये मोठी सुविधा म्हणजे आरोग्य. आज ते टेम्पो बदलण्यामध्ये आपल्याला एवढा किती खर्च होणार आहे. ते नादुरुस्त आहेत त्यांनाच आपण परत परत दुरुस्त करतो. त्यांना मोठ्या क्षमतेचा टेम्पो पाहिजे. कारण ते तेवढा बोजा उचलू शकत नाही. प्रत्येक प्रभाग समितीमध्ये कमीत कमी ३ ते ४ टेम्पो ठेवा. जेणेकरुन जास्त फवारणी करता येईल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ठीक आहे.

**जुबेर इनामदार :-**

खरी परिस्थिती आहे एका टेम्पोने किती करणार. यंत्रणा वाढवता आली तर वाढवा. आधुनिक पध्दतीने त्याच्यावर काम करु शकतो. मा. आयुक्त महोदय आपण ह्या विषयावर जातीने लक्ष द्या.

**दिनेश जैन :-**

मिरारोडमध्ये जाफरी खाडी कधी साफ करायला येत नाही. त्यामुळे मच्छरची वाढ झाली आहे.

**मा. महापौर :-**

सर्वांनी बसून घ्या. कारण हा न संपणारा विषय आहे. मी ऑलरेडी रुलिंग दिलेली आहे.

**फरीद कुरेशी :-**

मॅडम मला ह्या विषयावर सुचना करायची आहे. मॅडम, तुम्हाला सुचना घ्यायची नसेल तरी हरकत नाही. मी जी सुचना करतो ती खूप इम्पॉटंट आहे. आपण फवारणी करतो. त्यासाठी आपण कोणत्या कंपनीचे औषध आपण वापरतो. फर्दर ती औषध जे डोमेस्टीक युजसाठी आहे की, एक्सटर्नल बाहेरच्या युजसाठी आहे आणि इफेक्टीव आहे की नाही. आणि त्याच्यानंतर सुध्दा आपण फवारणीसाठी जे औषध परचेस करतो. ती कोणत्या कंपनीची आहेत. बायरची आहेत की इतर कोणत्या कंपनीची आहेत.

**मा. महापौर :-**

तुम्ही त्यांना एक पत्र द्या. हे तुम्ही महासभेत बोलता. लक्षवेधी घेतली नसती तर तुम्ही बोलले नसते. तुम्ही त्याच्याकडून रायटिंगमध्ये घ्या. आज डॉ. जैन नाहीत. नाहीतर त्यांनी तुम्हाला सांगितले असते. ही नोज इन एव्हरी थींग. सर्व माहित आहे. किती इफेक्टीव आहे.

**फरीद कुरेशी :-**

मॅडम, मी स्वतः एस.आय. आहे. मला ही ते करता येते. पण प्रशासनाने तो विषय करायचा आहे. मी करु शकतो.

**मा. महापौर :-**

तुम्ही पण त्याच्याकडून रायटिंगमध्ये घ्या.

**फरीद कुरेशी :-**

त्यांना प्रशिक्षण देत आहेत का? जे अधिकारी फवारणी करतात त्यांना ते माहिती आहे का? हा महत्वाचा विषय आहे. मी रायटिंगमध्ये भरपूर विषय दिले घेतले आहे का?

**मा. महापौर :-**

पानपट्टे साहेबांना आता सांगितले आहे की, नेक्स्ट महासभेपर्यंत ह्याच्यावर काही केले नाही तर आय विल आफ्टर टेक इन ॲक्शन ओन्ली.

**फरीद कुरेशी :-**

मॅडम नेक्स्ट महासभेपर्यंत मच्छर थांबणार नाही. विषय असा आहे की, तिकडे जे.ए.एस.आय. लोक काम करतात. त्यांना प्रशिक्षण दिले की किती इंटरवल वरती परत फवारणी करणार आहात. हा विषय महत्वाचा आहे. औषध दिल फवारणी केली. आपण दुसऱ्या आठवड्यात येणार तर त्याच्याने प्रॉब्लेम सॉल्व होतो का? म्हणून हा विषय आहे.

**मा. महापौर :-**

ठीक आहे. तुमच्या ह्या सुचनेला मी त्यांना उत्तर द्यायला सांगते.

**फरीद कुरेशी :-**

महासभेला उत्तर द्या. त्याच्यावर जी कायदेशीर कारवाई आहे ती करावी. औषध चेंज करा. आणि एस.आय. लोकांना प्रशिक्षण द्या.

**मा. महापौर :-**

महासभेला सुरुवात करा.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४७, दि. ०१/१२/२०१२ व दि. १४/१२/२०१२ (दि. ०१/१२/२०१२ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, मा. महापौर मॅडम, शरद पाटीलजी आज आमच्यामध्ये उपस्थित नाही कारण त्यांच्या आईचे निधन झाले आहे. त्यांची अशी भावना होती की, हा विषय सभागृहापुढे मांडावा. मा. आयुक्त महोदय ह्या मिरा भाईंदर नगरपालिकेने असा निर्णय घेतला आहे की, सर्व गटांना दालन देण्यात यावे. भारतीय जनता पक्षाने आपल्याला वारंवार विनंती केली, आयुक्तांना विनंती केली की, आपण जे दालन दिलेले आहे त्याच्यात २९ खुर्च्या बसत नाही. आज आम्ही बारकुंड साहेबांच्या केबीनला जाऊन बैठक घेतली. आम्हाला अजून ह्या महापालिकेत बसायला जागा नाही. सर्वात मोठा पक्ष भारतीय जनता पक्ष निवडून आलेला आहे. आणि आपण जो मागच्या वर्षी दालन दिलेला आहे त्यावेळी फक्त ९ सभासद होते. आज २९ झाले. चार महिन्यापासून आम्ही सारखे बोलतो.

**मा. महापौर :-**

मी आणि खांबित साहेबांनी स्वतः बघीतले की, सर्व खुर्च्या बसल्या आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

त्यापेक्षा खांबित साहेबाचे दालन मोठे आहे ते एकटे बसतात.

**मा. महापौर :-**

रोज तुम्ही २९ नगरसेवक बसता असे मला पण वाटत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

ज्यावेळेला महासभा, स्टँडिंग कमिटी किंवा इतर काही महत्वाचे निर्णय असतील तेव्हा २९ बसतात. तुम्हाला असे वाटते. नाहीतर तुमच्याकडे दोन-दोन, तीन-तीन दालन अवेलेबल आहेत. महापौर, उपमहापौर, सभागृह नेता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमच्याकडे पण विरोधी पक्षनेत्याची केबीन आहे. ते पण मोठे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

कशाला आमच्यावर नजर ठेवता.

**मा. महापौर :-**

तुम्ही कशाला दुसऱ्यांवर नजर ठेवता.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही आम्हाला सांगीतले की, गटनेता दालन ह्यासाठी दिले की महानगरपालिकेत जे निवडून आलेले सदस्य आहेत. त्यांना महानगरपालिकेच्या कामकाजासाठी बसण्यासाठी आवश्यकता आहे. अनेक नागरीक येत असतात त्याच्यात एक कम्प्यूटर ऑपरेटर, एक शिपाई हे बसले तर अर्धी जागा संपून जाते.

**मा. महापौर :-**

रोज बसत नाही ना.

**गिता जैन :-**

एकदा जरी बसले तरी बाकीच्यांनी उभे राहायचे का?

**नरेंद्र मेहता :-**

महिन्यात चार दिवस मोठा करा, बाकी चार दिवस छोटा करा. महिन्यातून चारदा स्टँडिंग असते. एक दोनदा सभा असतात. अनेक महत्वाचे विषय चर्चेला असतात. आपण ही सर्व नगरसेवकांची बैठक घता. आपण कधी भेटत नाही का? आयुक्तांकडे अनेक विषय असतात. त्यासाठी आम्हाला बैठक घ्याव्या लागतात. आयुक्त साहेब हा आपला अधिकार आहे. आपण आम्हाला सांगा नाही द्यायचे कारण काय. संख्याबळाप्रमाणे आपण गट कार्यालय दिले आहे ना. एकाला मोठे, एकाला छोटे हा काय निर्णय. मा. आयुक्तांनी ह्याचे उत्तर द्यावे. ही प्रशासनाची जबाबदारी आहे. आम्हाला बसण्याची व्यवस्था करुन द्यायची. आपण उत्तर द्या. दोन नगरसेवक अजून यायचे आहेत. म्हणजे ३१ प्रमाणे द्या.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, सेमच विषय आहे.

**मा. महापौर :-**

सगळ्यांच्या केबीन वाढवत जाणार तर कसे होणार?

**नरेंद्र मेहता :-**

ज्यांची संख्या कमी त्यांचे छोटे करा ना.

**प्रशांत दळवी :-**

मॅडम त्यावेळेला ५ होते आणि आता १४ आहेत. नगरसेवक १४ झाले आहेत. त्यामुळे गेल्यावेळेला आपण ठरवले होते की, मा. आयुक्तांबरोबर बोलून दोन दिवसात निर्णय घेणार आहेत. परंतु आजपर्यंत काही झाले नाही. कृपया माझी विनंती आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, संख्याबळाप्रमाणे करायला हरकत नाही.

**मा. आयुक्त :-**

आता जी बसण्याची व्यवस्था आहे ती जेव्हापासून महानगरपालिका स्थापन झाली तेव्हापासून तीच व्यवस्था आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ते चुकीचे आहे. ते मागच्या वर्षी झाली. ह्याच्या अगोदर वेगळी होती.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, निवडणूक झाल्यानंतर सर्व पक्षाचे संख्याबळ बघून त्याप्रमाणे त्यांना दालन द्यायचे असते. ही साधी मागणी आहे. हा चूकीचा विषय नाही.

**मा. आयुक्त :-**

मी पाहणी केलेली आहे. परत एकदा पाहणी करतो. त्यामध्ये कुठे ॲडजेस्टमेंट करता येईल तसे मी प्रयत्न करतो.

**मा. महापौर :-**

दुसरा विषय घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

नाही.

**मा. आयुक्त :-**

पाहणी करुन घेतो आणि त्याच्यावर निर्णय घेतो.

**नरेंद्र मेहता :-**

मागच्या वेळेला आपण ट्रेनिंग कार्यक्रम आयोजित केलेला. त्यामध्ये महानगरपालिकेचे काम व्यवस्थित चालावे म्हणून त्या डिसेन्ट्रलाईज्ड करुन प्रभाग समितीची स्थापना करावी असे कायद्यात बंधनकारक आहे. मग हे का होत नाही. प्रभाग समित्या का होत नाही. ते कायद्यात आहे. तुम्हाला बंधनकारक आहे. बंधनकारक असताना आपण करत नाही. वर्क ऑफ डिसेन्ट्रलाइन्ड आपण का करत नाही. मा. आयुक्त महोदय आपण कॉप्शनचे इलेक्शन का लावत नाही. आपला काय इंटरेस्ट आहे याच्यात. संख्याबळाप्रमाणे आपल्याला करायचे आहे सभागृह किंवा महापौर मॅडमला ते करायचे नाही. सचिव साहेब तुमचे काय इंटरेस्ट आहे त्याच्यात. व्हाय आर नॉट प्रोसेडिंग. तुम्ही का करत नाही.

**रोहिदास पाटील :-**

हे प्रशासनाचे काम आहे. आपल्याकडे सचिव आणि प्र. सचिव अशी दोन माणसे काम करतात. एक अधिकारी बसून राहतात. एक अधिकारी काम करतात. खरोखर त्यांना ताण पडत असेल तर जे अधिकारी बसून आहेत त्यांना कामाला लावा.

**नरेंद्र मेहता :-**

कायद्यात आणि संविधानात कॉप ह्यासाठी नाही की संख्याबळ वाढवावे. त्या भागातले तज्ञ व्यक्ती ह्या सभागृहात यावे आणि त्याचे काही मार्गदर्शन आहे त्यासाठी ही प्रोव्हिजन आहे. तुम्ही त्याला एकदम इजी घेतले आहे. कारण काय. तुमचा अधिकार असताना लावत का नाही. आज ७-८ महिने झाले. आयुक्त साहेब आपण सांगा कधी लावणार आहात. आज तुम्ही सांगा उद्या लावतो.

**मा. आयुक्त :-**

तरतुद बघतो आणि लवकर निर्णय घेतो.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, सचिव इकडे आहेत. तुम्ही असे उत्तर दिले की, तरतुद बघतो तर आम्ही कुठे जायचे. सचिव साहेब कायदा सांगा. मा. महापौरांची निवड झाल्यावर तुम्ही ताबडतोब ती प्रोसेस करायला पाहिजे हे बरोबर आहे की नाही. तुम्ही मा. आयुक्तांकडे सादर केले आहे का?

**प्र. नगरसचिव :-**

मी सांगितलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय आपल्याला सांगितले आहे. आणि प्रभाग समितीचा अधिकार मा. महापौराचा आहे.

**मा. महापौर :-**

थॅक्यू फॉर टेलींग मी माय अधिकार. आय विल डू इट.

**नरेंद्र मेहता :-**

पण ते करा ना. मॅडम तुम्ही ट्रेनिंग दिली आहे आम्हाला.

**मा. महापौर :-**

मी ट्रेनिंग दिली आहे. मला माहिती आहे आणि मी ह्या पोस्टवर बसली आहे तर मला माझे अधिकार माहित आहेत तुम्ही महापौर असताना तुम्ही तुमचे किती अधिकार वापरले आहेत ते मला माहित आहे.

(सभागृहात गोंधळ)

**म. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, तुम्ही प्रभाग समितीचा प्रस्ताव दिला.

**प्र. नगरसचिव :-**

नाही.

**नरेंद्र मेहता :-**

का देत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब तुम्हाला महापौर मॅडमनी सांगितले आहे. विषय सुरु करा. तुम्ही प्रोसेडिंग वाचा.

**नरेंद्र मेहता :-**

असे नाही चालणार. मॅडम तुम्हाला उत्तर द्यावे लागेल.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

मी लावणार. जेव्हा प्रभाग समितीचे इलेक्शन असणार तेव्हा तुम्हाला येणार.

**नरेंद्र मेहता :-**

पिठासीन अधिकारी म्हणून तुमचे कर्तव्य आहे.

**मा. महापौर :-**

मी निर्णय देते. मी तुम्हाला आता का डेट देऊ.

**नरेंद्र मेहता :-**

सहा महिने वाट बघितली की येईल, पण सहा महिने झाले आले नाही.

**प्रभात पाटील :-**

मंजुर तरतुदीतील १ करोड ३३ लाख वजा जाता उर्वरीत १ लाख रुपये एवढी रक्कम लिंक वर्कर ह्यांना सानुग्रह अनुदान वाटप करण्यात यावी ते झाले आहे का? आम्ही नुसतेच इथे येऊन ठराव करायचे का?

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

त्याचे बिल तयार केलेले आहे. ते मंजुरीसाठी सादर केलेले आहे. अजून प्रदान केलेले नाही.

**प्रभात पाटील :-**

बाकीच्या लोकांचे सानुग्रह अनुदान वाटप झाले. म्हणजे क्लास वनपासून चार पर्यंत सगळ्यांचे झाले आहे का?

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

हो ते झाले.

**प्रभात पाटील :-**

मग हे का ठेवले? उपसुचनेशिवाय तुमचा ठराव पूर्ण कसा होतो.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौराच्या परवानगीने, मागच्या सभेमध्ये ह्याला मंजुरी दिल्यानंतर ते विवरण पत्र तयार करुन ठेवले आहे. परंतु तत्कालीन आयुक्तांची बदली झाल्यानंतर ते बिल तयार करुन ठेवलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

मॅडम एक लक्षात घ्या. त्यांनी सांगितले मोकळे झाले. अधिकारी १ ते ४ पर्यंतची सही झाली. मग हे का राहिले. जे तुमच्या दारोदारी जाऊन भिक मागीतल्यासारखे २०० रु. मध्ये काम करतात. त्याचेच पेंडीग राहिले का? महिलांचेच पेन्डीग राहिले का? मला फक्त उत्तर द्या की हे किती दिवसात होणार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मॅडम, तो विषय पेंडींग ठेवा. त्याला इतिवृत्तांतामध्ये मंजुरी देऊ नका.

**प्रभात पाटील :-**

तेच मी सांगते ह्या गोष्टीला आपण कार्योत्तर मंजुरी घेतली आहे. ते मंजुर केले नाही.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सदरची रक्कम संबंधीत कर्मचाऱ्यांना आठ दिवसांच्या आत प्रदान करण्याची व्यवस्था करतो.

**ग्रिटा फॅरो :-**

नक्की झाली पाहिजे.

**मा. महापौर :-**

मी त्यांना सांगितले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मॅडम ६७ पेज नं. आहे. प्रकरण क्र. १९ मानधनावर संगणकचालक व लघुलेखक ह्यांच्या मुदतवाढीचा विषय होता. त्याच्यामध्ये आपले स्टेटमेन्ट दिलेले आहे की, संबंधीत सर्व संगणकचालक दरमहा ९५००/- इतके मानधन व लघुलेखक ह्यांना दरमहा १०,५००/- इतके मानधन देण्यात यावे. आपली पण ह्याच्यावर सही झालेली आहे. त्या कर्मचाऱ्यांना अजुनही वेतन दिलेले नाही त्यांना जुन्याप्रमाणेच दिलेले आहे. संबंधीत अधिकाऱ्यांना विचारा की, अजुन का दिले नाही? हे कमिशनर २८ तारखेला आले. त्या कमिशनरना दोन महिन्याचा कालावधी होता त्या दोन महिन्यामध्ये आयुक्तांनी सही का केली नाही? त्यांना ६५००/- प्रमाणेच पगार दिला मॅडम संबंधीत अधिकाऱ्यांना विचारुन घ्या.

**प्रभात पाटील :-**

आपली सही आहे आपण ठराव करतो आणि त्याचे इम्पलीमेंटेशन नाही आणि मॅडम ते आपल्याला मंजुरीसाठी सुध्दा येतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

१४-१२ ला विषय झालेला आहे.

**मा. महापौर :-**

मी त्यांना सांगीतले. काल दालनात बोलवून सुध्दा सांगितले.

**प्रेमनाथ पाटील :-**

जुन्याप्रमाणेच पगार दिलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम ह्या विषयावर माझे बोलणे झाले राणे साहेबांनी सांगितले की, आयुक्ताची मंजुरी घेऊन देतो सर्वानुमते मंजुर झालेला ठराव आहे तो.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रभात ताईनी ह्याच्यावर सुचना मांडली आहे तरी त्याच्यावर काही करत नाही.

**मर्लिन डिसा :-**

मॅडम पान नं.३९ तिथे मी सुचना मांडली होती. कनाकिया रोडवर जे गटाराचे काम एकदम बंद झाले आहे तिथे शाळा कॉलेज वगैरे आहे. तुम्ही पण महासभेत सुचना एक्सेप्ट केली होती but the work is stopped there so monsoon. just request again the follow again the work.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम ह्या विषयाचे काय करणार मानधनावर संगणक चालक लघुलेखक...

**विलास ढगे :-**

मा. महापौर मॅडम, मागील सगळे मुद्दे जे मानधनावर संगणकचालक आहेत त्यांना निविदा धारकातील मंजुर धारानुसारच त्यांना सुध्दा मानधन द्यायचे सुधारीत करण्याचा ठराव झालेला आहे. त्याप्रमाणे सुधारीत दराने त्याचे वेतन काढण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता.

**प्रेमनाथ पाटील :-**

कोणाकडे सादर केला होता.

**विलास ढगे :-**

मा. आयुक्त साहेबांकडेच सादर केलेला आहे. तर आयुक्तांनी सुचना दिलेली आहे आता की मी ते पुर्वी सादर केला तेव्हा साहेबांची बदली झाली.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, १४-१२-२०१२ ला हा विषय झालेला आहे.

**प्रभात पाटील :-**

साहेब निविदेचा काय प्रश्न आला मला स्पष्ट करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याच्यानंतर ११ महिन्याची मान्यता देऊन एक दिवसाचा खंड करुन.......

**विलास ढगे :-**

मॅडम आपणच मुद्दा उपस्थित केला होता की, जे निविदा मार्फत जे संगणक ऑपरेटर पुरवठा केला जातो त्याचा ९५००/- दर आहे आणि दिर्घ कालावधीपासुन आपल्याकडे जे मानधनावर संगणक चालक आहेत त्यांना ६५००/- ते ७५००/- मानधन दिले जाते ही जी तफावत आहे ती तफावत दुर करण्यासाठी आपण सभागृहात सुचना मांडली होती त्यावेळी मा. महापौर आणि मा. आयुक्तांनी त्याप्रमाणे त्यांना सुधारीत मानधन द्यायचे कार्यवाही करण्यात येईल असे स्विकृत केलं होतं त्याप्रमाणे सुधारीत मानधन देण्यासाठी प्रस्ताव महापालिका आयुक्तांकडे सादर केला होता त्यानंतर महापालिका आयुक्तांची बदली झाली. साहेबांची याबाबत त्यांच्याशी चर्चा झाली.

**प्रेमनाथ पाटील :-**

उपायुक्त साहेब, १४-१२-२०१२ ला आपली सभा झाली हा विषय प्रकरण क्र.९ १४/१२/२०१२ ला विषय झालेला आहे त्यानंतर आज दोन महासभा झाल्या आयुक्त साहेब २८ तारखेला आले आहेत तोपर्यंत आपण काय केले त्याचा खुलासा करा दोन महिने काय केले ते सांगा.

**विलास ढगे :-**

जानेवारीमध्ये तो प्रस्ताव दिला होता.

**प्रेमनाथ पाटील :-**

१४-१२ ला विषय झाला त्यानंतर महापौर मॅडमनी लगेच सही करुन दिली.

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेब उत्तर द्या.

**मा. आयुक्त :-**

ही जी बाब आहे ती आर्थिक बाबीशी निगडीत आहे त्याच्यात फायनान्शिअल इम्प्लीकेशन्स आहेत त्याचा शासनाच्या नेमुन दिलेल्या टक्केवारीवर होतो का? ही माहिती मी त्यांना काढायला सांगितले आहे आणि हे जे कंत्राटी पध्दतीवर आपण नेमलेले आहेत ते कोणत्या कालावधीपासून आहेत त्यांचा ११-११ महिन्याचा आपण कंन्टीन्युशन देतो ह्यामध्ये कायम स्वरुपी उपाययोजना करता येणे शक्य आहे का? दर सभेमध्ये किंवा दरवर्षी वाढ देत गेलो तर पर्यायाने जबाबदारी ती महानगरपालिकेतील ह्या महानगरावर येईल आणि दिर्घ पध्दतीचे परिणाम संभवतील म्हणून हा आर्थिक बाबीशी निगडीत असल्यामुळे त्याला काही विलंब लागणे अपरिहार्य आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, हा विषय तुमच्यासमोर ढगे साहेबांनी आणला. निविदाच्या माध्यमातुन जे आम्ही संगणक चालक घेतले आहेत त्यांचा पगार आणि मानधनावर जे कार्यरत आहेत त्यांच्या पगारामध्ये बरीच तफावत होती म्हणून ती तफावत एकसारखी करा म्हणजे तो आकडा एकसारखा आणण्यासाठी तो विषय आणला होता दुसरा म्हणजे ते पुर्व नियोजन सुध्दा म्हणजे आर्थिक बाबीने अडचण येऊ नये म्हणून त्या ठरावामध्ये स्पष्ट केलेले आहे ते पुर्ण नियोजन करुन तो आर्थिक तरतुद भरण्यात यावी.

**मा. आयुक्त :-**

मला मान्य आहे मी तो ठराव वाचलेला आहे एकुण कंत्राटी पध्दतीने कर्मचारी किती आहेत? त्यापैकी आपण ह्या ठरावाची अंमलबजावणी झाली तर त्याचा परिणाम दुसरे जे कंत्राटी पध्दतीने लावले आहेत त्याच्याकडुन जर मागणी आली तर त्याचा एकुण आर्थिक बोजा किती आपल्या महानगरपालिकेवर पडेल त्याचे दुरगामी परिणाम काय होतील आणि जर समजा सगळ्यांना सामावून घ्यायचे असेल तर आपला मंजुरी आकृतीबंध आहे त्यामध्ये किती पदे मंजुरी आपण शासनाकडुन मंजुरी मागितलेली आहे ह्या सगळ्यांचा विचार करुन त्याच्यावर निर्णय घेण्यात येईल त्यामुळे त्याला विलंब लागणे अपरिहार्य आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

किती विंलब झाला?

**मा. आयुक्त :-**

मला मान्य आहे विलंब झाला मला मान्य आहे आपण कोणालाही कमी केले नाही किंवा कोणाचा पगार थांबवलेला नाही आपण ज्या नेमणुका केल्या त्या ११-११ महिन्यासाठी केलेल्या आहेत ११ महिन्यानंतर आपण एक दिवसाचा तांत्रिक खंड देतो तसे पाहिले तर त्याच्या ज्या सेवा आहेत त्या माणुसकीच्या किंवा सहानुभुतीच्या दृष्टीनेच चालू ठेवल्या आंहेत त्याचे कारण शासनाने २००६ मध्येच तो आपला प्रस्ताव त्यांनी म्हटले होते की, तुम्हाला कायम स्वरुपी नेमणुका करता येणार नाही त्याच्यानंतर आपण ह्या नेमणुका केल्या आहेत २०१० मध्ये अजून एक प्रस्ताव शासनाला सादर केला आहे त्याची जर मंजुरी मिळाली तर त्याची आणि ह्याची काही सांगड घालता येईल का? तो आपला प्रयत्न आहे म्हणजे एकुण हा प्रश्न कायमस्वरुपी मिटावा असे माझे प्रयत्न आहेत.

**जुबेर इनामदार :-**

*आम्ही ठराव करतो म्हणजे महासभा सर्वमताने ठराव करते सर्व पक्षाचे सदस्य त्याला मान्यता देतात* म्हणजे ती सर्व सभागृहाची मान्यता किंवा भावना असते त्याच्या नंतर ठरावाची अंमलबजावणी होत नाही किंवा प्रशासनाने ते ठराव विखंडीत करुन आणावे किंवा त्याची अंमलबजावणी करावी त्यातून पायवाट काढु नये.

**मा. आयुक्त :-**

अंमलबजावणी करु नये अंमलबजावणी झाली नाही किंवा अंमलबजावणी करणार नाही हा मुद्दा नाही अंमलबजावणी करणार नाही असे कुठे म्हटले नाही पण अंमलबजावणी करताना त्याचे दुरगामी परिणाम काय होतील ह्याचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते म्हणून तो केल्यानंतर अंमलबजावणी केली जर अधिक सोयीस्कर होईल असे मला वाटते.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब हा विषय पेंडींग ठेवावा का? प्रोसिडींगमध्ये ह्या विषयाला मान्यता द्यायची नाही का?

**मा. आयुक्त :-**

प्रोसिडींग आपण मान्य केलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रोसिडींग मान्य कशी करणार इम्प्लीमेंन्टेशन झाले नाही तर मान्यता कशी देणार.

**मा. आयुक्त :-**

ठराव केल्यानंतर ठरावाला मान्यता देणे तो आपला अधिकार आहे मा. महापौरांचा अधिकार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम हा विषय पेंडींग ठेवावा का?

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला आज इतिवृत्तांत मान्यता देऊ अंमलबजावणी झाली पाहिजे ती महत्वाची.

**मा. आयुक्त :-**

आपला मुद्दा जो आहे ठरावाला मान्यता देण्याचा.

**जुबेर इनामदार :-**

किंवा प्रशासनाने तो ठराव विखंडीत करुन आणा.

**मा. आयुक्त :-**

अंमलबजावणीचा मुद्दा आहे त्याबद्दल मी सविस्तर भाष्य केले आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब सभागृहाची एवढीच विनंती आहे की, मा. महापौर मॅडमने आदेश द्यावे की २४ तासात, ४८ तासात त्याच्यावर अंमलबजावणी करा कोणत्याही टेक्नीकल आम्हालाही समजते, तुम्हालाही समजते कोणतीही चुक केली नाही ह्याच्याकडुन त्याची कार्यवाही झाली नाही. नाही झाली तर कोणाला दोषी ठरवू नका ते जे कर्मचारी ते संगणक कर्मचारी आहेत इतके वर्षे काम करतात नाही दिले आपणही त्याच्याविषयी सहानुभुती दाखवावी लवकर पूर्ण करावे घासाघीस काढत बसू नका जर त्याच्यामध्ये जोडतोड करायला गेलो तर जे सभागृहाला करावेसे वाटते ते न होता ते प्रकरण वाढेल मा. महापौरांनी *आमची विनंती आहे की, आपण संबंधीतांना निर्देश द्यावे. की ४८ तासात, २ दिवसात, ३ दिवसात ह्याच्यावर* निर्णय घ्यावा त्या लोकांना मागच्या तारखेपासुन वाढीव पगार मिळाला पाहिजे.

**मा. महापौर :-**

मी ऑलरेडी सांगितले आहे.

**राजेंद्र जैन :-**

इस विषय के अंदर प्रशासन की कार्यप्रणाली जो है वह सबको मालूम नही पडती और इ-गव्हर्ननेस और टपाल सॉफ्टवेअर ॲडमिनिस्ट्रेटीव्ह प्रोसेस है जो यहाँ पे फॉलो नही करते। हर बार महासभा होती है हर बार कई विषय मे पुछना पडता है की, इंटरनल क्या किया अगर ई-गव्हर्ननेंस के अंतर्गत टपाल सॉफ्टवेअर को जल्दीसे जल्दी चालू किजीए। पहले जैसा नेटवर्किंग नही है।

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण जो ठराव केला त्याच्यामध्ये सुचना होती की, आताच्या होणाऱ्या भरतीमध्ये ज्या जागा भरायच्या होत्या. त्याच्यामध्ये आपल्या संगणक चालकांनी पण अर्ज केले होते. तो सुध्दा प्रस्ताव जर नवीन मा. आयुक्त साहेब विचारात घेत असतील तर त्याच्यामध्ये सुध्दा प्राधान्याने त्यांचा विचार व्हावा. म्हणजे मा. आयुक्त साहेब जर म्हणतात की, लेट होत असेल तर आम्हाला चालेल. आमचे संगणक चालक कित्येक वर्षापासून वाट बघत आहेत. परंतु, ते तर त्यांच्या भविष्याचा विचार पदनिर्मितीच्या बाबतीत करत असतील तर ते नक्कीच चांगले आहे, स्तुत्य आहे आणि आपल्याला असे वाटते की, त्यासाठी थांबायची काही हरकत नसावी.

**मा. महापौर :-**

आता सर्वांनी बसून घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

मॅडम, ७२ नंबरचा सेम विषय आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मार्केट इमारतीमधील गाळ्यांबाबत विचार विनिमय करणे हा ठराव आपण दिलेला आहे की, हा पण त्याच सेम दिवशी ठराव झालेला आहे. पण अजून त्याच्या निविदा काढलेल्या नाहीत. मी श्री. दिपक सावंत साहेबांना बऱ्याच वेळेला विचारले. तर त्यांनी हा विषय माझा नाही म्हणून उत्तर दिले. तर श्री. दिपक सावंत साहेबांनी सांगावे की, हा विषय त्यांचा आहे की, बांधकाम विभागाचा आहे?

**दिपक सावंत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. या संबंधी जी फाईल आहे ती बांधकाम विभागाकडून गाळ्यांचा लिलाव ..........................

**प्रेमनाथ पाटील :-**

कर विभाग तुमच्याकडे आहे? मार्केटला कर आकारणी आपण करता?

**दिपक सावंत :-**

होय.

**मा. महापौर :-**

श्री. प्रेमनाथ पाटील साहेब, तुम्ही जरा ऐका. ते बोलतात, त्याच्या अगोदर तुम्ही लोक मध्ये बोलता. त्यांना तुम्ही लोक बोलूपण देत नाहीत.

**दिपक सावंत :-**

गाळ्याचे जे लिलाव करायचे आहेत, त्यासंबंधी बांधकाम विभागाकडून माझ्याकडे फाईल आलेली आहे. ते करुन आम्ही लिलाव प्रक्रिया करीत आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, किती कालावधी? दोन-दोन महिने ................

**दिपक सावंत :-**

मागच्या महिन्यात फाईल आलेली आहे. या महिन्यात करतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

या महिन्यात म्हणजे अॅटप्रेझेन्ट की, मार्चमध्ये?

**दिपक सावंत :-**

२० मार्चपर्यंत होईल.

**दिनेश जैन :-**

७४ वर मी माझी एक सुचना दिली होती की, आपल्या मिरारोडच्या बाहेर जे मटन शॉप आहेत. शासनाची अशी परमिशन आहे की, तिकडे आपल्याला काळ्या काचा नाहीतर पडदे लावले पाहिजेत. मिरा-भाईंदरमध्ये मोठ्या प्रमाणात जैन आणि हिंदू समाज राहतो. आणि त्या लोकांना उपवास असताना खूप त्रास होतो. म्हणून तिकडे स्टेशनच्या बाहेर जेवढे मटणशॉप आहेत तिकडे लटकलेले असते. म्हणून मी सुचना मांडली होती की, ते असे का आहे? याचे आपण काय केले? आणि याचा जबाब मला कोण देणार?

**दिपक कुरळेकर :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलतो. साधारण दिडशेच्या आसपास मटणाची दुकाने मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये आहेत. याबाबत जे नियम आहेत की, काळी काच वगैरे असावी, सन्मा. सदस्यांनी मुद्दा उपस्थित केल्याप्रमाणे ...........................

**दिनेश जैन :-**

पण अजून कुठेही लावलेल्या नाहीत.

**दिपक कुरळेकर :-**

परंतु प्रत्येक शॉपला हे नाही हे मी मान्य करतो. मी प्रत्येक शॉपला व्हिजीट केलेली नाही. मी काही शॉपला व्हिजीट केलेल्या आहेत. आणि स्वच्छतेच्या बाबतीत आपण जेव्हा परवाना रिन्यु करतो, त्यापूर्वी आपण सॅनेटरी इन्स्पेक्टर, जे स्वच्छता निरिक्षक असतात, त्यांचा अहवाल आल्यानंतर आपण परवाना रिन्यु करतो.

**दिनेश जैन :-**

पण त्या काचा लावलेल्या नाहीत, त्यांच्यावर आपण काय कार्यवाही करणार? कार्यवाही केली की, केली नाही किंवा करणार की काय?

**दिपक कुरळेकर :-**

परवाना विभागामार्फत फक्त व्यवसायासाठी परवाना दिला जातो. परंतु परवाना विभागामध्ये फक्त परवाना दिला नाही म्हणून तो दुकान बंद करेल असे बऱ्याचदा होत नाही.

**दिनेश जैन :-**

परंतु, मिरा भाईंदरच्या लोकांना त्याच्यामुळे जो त्रास होतो, त्याचे आपण काय करणार? ते लोक लावत नाहीत. आम्ही तिकडे गेलो तरी आम्हाला बोलतात की, तुम्हाला जे करायचे असेल ते करा.

**दिपक कुरळेकर :-**

हा विषय थोडा फार राज्य शासनाशी संबंधीत फुड ॲन्ड ड्रग डिपार्टमेंट जे आहे, त्या मार्फतसुध्दा कार्यवाही करण्यासाठी आपण कळवू शकतो. परंतु, सुमोटो असे परवाना विभागामार्फत सदरील दुकानाला सील करण वगैरे अशा प्रकारची कार्यवाही ....................

**दिनेश जैन :-**

सील करु नका पण तिकडे ती कारवाई करा की, काच किंवा पडदे लावा.

**दिपक कुरळेकर :-**

त्याबाबत प्रशासनामार्फत प्रत्यक्ष एक पत्र दिले जाईल की, याबाबतची कारवाई तातडीने करण्यात यावी.

**हेलन गोविंद :-**

सन्मा. महापौर मॅडम, आता साहेब बोलले की, मटणाचे जे गाळे आहेत, त्यांना काळ्या काचा लावाव्या. यानंतर जे वर्षानुवर्षे जे मच्छी मार्केट आहेत, नंतर असा विषय यायला नको की, मच्छी मार्केटला सुध्दा काळ्या काचा लावा. कारण आता बरीच वर्षे मच्छीमारांचे उपजीविकेचे साधन आणि आगरी लोकांचे मच्छीपासून ते मटणापर्यंत. एवढे वर्षे या गावामध्ये असे नव्हते. आता हे पहिल्यांदा आणि ह्याच वर्षी ऐकावे लागते की मटणाला काळ्या काचा लावा.

**दिनेश जैन :-**

ते शासनाचे आदेश आहेत की, आपल्याला त्याच्यावर काळ्या काचा लावल्या पाहिजेत. कारण ते स्टेशनच्या बाहेर आहेत.

**हेलन गोविंद :-**

शासनाच्या आदेशानुसार लावा. पण असे करायला नको की, मच्छी मार्केट आहे. तिथे काळ्या काचा लावा. मग मच्छी मार्केट पण बंद होतील. लोकांचा मच्छीचा पण व्यवहार बंद होईल. याच्यावर लक्ष द्या.

**मा. महापौर :-**

इथे असे काही प्रकार होणार नाही. कोणाचे काही बंद होणार नाही. एवढेच आहे, जे दुकान आहेत आणि जे मटण वगैरे टांगून ठेवतात, त्यांना आपण काळ्या काचा किंवा पडदा लावण्याबाबत मी त्यांना सुचना देते.

**हेलन गोविंद :-**

मॅडम, हा आमचा गाव आहे. आमच्या वडिलोपार्जितपासून आम्ही इथले स्थानिक लोक आहोत. आमच्या पिढ्या-न-पिढ्या आहेत. म्हणून याच्यावर जरा लक्ष द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दि. ०१/१२/२०१२ व दि. १४/१२/२०१२ (दि. ०१/१२/२०१२ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४७ :-**

दि. ०१/१२/२०१२ व दि. १४/१२/२०१२ (दि. ०१/१२/२०१२ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ५५ :-**

दि. ०१/१२/२०१२ व दि. १४/१२/२०१२ (दि. ०१/१२/२०१२ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील          अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४८, श्रीम. सिमा जैन यांनी मा. स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनाम दिल्याने रिक्त झालेल्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम २३ अन्वये एका सदस्याची उर्वरित कालावधीसाठी नेमणूक करणे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, विषयाला सुरुवात होण्यापूर्वी मला दोन मिनिटे बोलायचे आहे. मा. महापौर मॅडम, आपण ज्या सभागृहामध्ये बसलात आणि तुमच्या खुर्चीला देखील जो मिरा भाईंदर महानगरपालिकेचा लोगो लागलेला आहे, हा लोगो रजिस्टर आहे का ते जरा सचिवांना विचारा. कारण हा लोगो जर रजिस्टर नसेल तर हा लोगो कोणीही हॅक करेल. आणि हा लोगो यापुढे आपल्याकडे राहणार नाही. तर तो रजिस्टर करावा लागतो, तो आपण केला आहे का? याविषयी जरा उत्तर द्या. ही फार मोठी गंभीर बाब आहे की, मिरा भाईंदर नगरपालिका असल्यापासून तो लोगो आहे असे मला वाटते. सन्मा. सभापती श्रीम. ग्रिटा फॅरो इथे आहेत. मला असे वाटते की, त्या काळामध्ये आपण त्याला मान्यता दिली की, हा आमचा लोगो राहील. याच्यामध्ये आगरी आहेत, जमीन कसणारे शेतकरी आहेत, कोळी बांधव आहेत, इथे ज्या स्मॉल स्केल इंडस्ट्रीज होत्या, त्याचा आपण समावेश केलेला. इथे जितक्या ग्रामपंचायती या नगरपालिकेमध्ये समाविष्ट झाल्या, त्यांचे स्टार आपण तिथे दाखवले. आता त्यांचा अभ्यास करुन घेण्याची खरे तर गरज आहे. पण तो रजिस्टर नाही. उद्या ह्या प्रकारचा लोगो कोणी सुध्दा वापरु शकेल. त्यानंतर आपल्याला हा लोगो वापरता येणार नाही. आपण जिथे बसतो. आपले नगरसेवक सगळ्या गाड्यांवर तो स्टीकर लावतात. महापालिकेच्या इमारतीवर तो लोगो आहे. तुमच्या पाठीमागे, तुमच्या खुर्चीवर आहे, महापालिकेच्या लेटरहेडवर आहे. परंतु तो लोगो तुमचा नाही. आणि ही अतिशय गंभीर बाब आहे. प्लीज खुलासा करा आणि त्याच्या प्रोसीजरला पण लागा.

**प्र. नगरसचिव :-**

अद्यापपर्यंत लोगो रजिस्टर केलेला नाही. त्याची माहिती घेऊन रजिस्टर करण्याची व्यवस्था मी करतो.

**मा. महापौर :-**

श्रीम. प्रभात पाटील मॅडमचे आम्ही आभार मानत आहे की, तुम्ही आज आमच्या निदर्शनास आणून दिलेले आहे आणि हे रजिस्टर करायचे मी त्यांना लवकरात लवकर सांगते.

**प्रशांत केळुस्कर :-**

प्रकरण क्र. ४८ मध्ये आपल्याकडे पत्र दिलेले आहे. त्याचे वाचन करण्यात यावे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, आपले ट्रस्ट रजिस्टर व्हायचे काम बाकी होते.

**मा. महापौर :-**

तेही रजिस्टर करायला मी सांगितलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपला लोगो नगरसेवक सोडून अन्य गाड्यांना पण लोगो लावतात. ते योग्य आहे का? सचिव साहेब, जरा खुलासा करा.

**दिनेश जैन :-**

जे माजी नगरसेवक आहेत, ते पण आता लोगो लावून फिरतात.

**बर्नड डिमेलो :-**

रजिस्टर नसल्यामुळे कोणीही लावू शकतो.

**मा. महापौर :-**

मा. महासभा सुचना क्र. ०६, दि. ०६/०२/२०१३ विषयपत्रिकेवरील प्रकरण क्र. ४८ नुसार उर्वरीत कालावधीसाठी डॉ. श्री. रमेश जैन यांची रिक्त झालेल्या जागेवर नेमणुक करावी ही विनंती भारतीय जनता पार्टीचे मा. गटनेता श्री. शरद केशव पाटील यांनी केलेली आहे. भारतीय जनता पक्षाचे मा. गटनेता यांनी मा. स्थायी समिती सदस्यपदी नेमणुक होणेकरीता श्री. रमेश धरमचंद जैन यांच्या नावाची शिफारस केलेली आहे. तरी श्री. रमेश धरमचंद जैन यांची मा. स्थायी समिती सदस्यपदी नेमणुक करण्यात येत असून सभागृहाच्या वतीने मी त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४९, मिरा भाईंदर शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ उभारण्याकरीता चर्चा करुन महासभेमध्ये निर्णय घेणेबाबत.

**जुबेर इनामदार :-**

मिरा-भाईंदर शहराचे भौगोलिक क्षेत्र ७९.०० चौ.कि.मी. असून २५ टक्के रहिवास क्षेत्रे व ७५ टक्के इतर आहे. शहराची लोकसंख्या आजमितीस १२ लाखापर्यंत पोहोचलेली आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर वाहनांची संख्याही वाढलेली आहे. सन २००८ मा. महासभा दि. १०/०४/२००८ प्र.क्र. ०३ ठराव क्र. ०३ अन्वये

मा. आयुक्तांना प्राधिकृत केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून शहरामध्ये २३ ठिकाणी नवीन वाहनतळ "पे ॲन्ड पार्क" च्या निविदा प्रसिध्द करण्यात आल्या. मा. स्थायी समिती दि. ०५/०१/२०१३ ठराव क्र. ०४ अन्वये सदरची निविदा प्रक्रिया रद्द करण्यांत आली व सदर विषय मा. महासभेसमोर घेण्याचे सुचित करण्यांत आले.

मिरा-भाईंदर शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ उभारण्याची गरज व महापालिकेला होणाऱ्या आर्थिक फायद्याच्या दृष्टीकोनातून प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या २३ ठिकाणांमधून व इतर खाली उल्लेखलेल्या जागी सदरची कार्यवाही करावी.

१ गोल्डन नेस्ट सर्कल पोलीस चौकी ते इंद्रलोक पोलीस चौकी
२ स्मशान रोड ते इंद्रलोक, न्यू गोल्डन नेस्ट
३ दिपक हॉस्पीटल ते सेव्हन स्क्वेअर ॲकेडमी
४ शिवार गार्डन ते सरदार पटेल हायस्कूल
५ मॅडोना हॉटेल ते रामदेव पार्क
६ कनकिया रोड
७ एस.के.स्टोन समोर लतिफ पार्क गृहसंकुल ते डोंगरी झोपडपट्टी
८ जी.सी.सी. क्लब ते विद्यानगरी हाऊसिंग सोसायटी
९ झंकार पासुन ते आर.एन.ए
१० प्लेझंट पार्क ते एम.आय.डी.सी.
११ सृष्टी ते रॉयल कॉलेज रोड
१२ शितल नगर ते जांगीड सर्कल (रस्त्याच्या एका बाजुला)
१३ एस.के.स्टोन ते शितल नगर सर्कल (गीता नगर संकुलाच्या लगत असलेला रस्ता)
१४ मिरा रोड ब्रम्हकुमारी सर्कल ते पुनम कॉम्पलेक्स मुख्य रस्ता
१५ मिरा रोड स्टेशन शांती शॉपींग सेंटर समोर स्काय वॉक खाली
१६ भाईंदर (पुर्व) जेसल पार्क रेल्वे समांतर शिवसेना शाखेच्या बाजुचा रस्ता
१७ शिवाजी पुतळा ते गोल्डन नेस्ट सर्कल रस्त्याच्या दोन्ही बाजुला
१८ शहरामध्ये महापालिकेचा आरक्षीत भूखंड जागा उपलब्ध असल्यास

तसेच भाईंदर (पश्चिम) रेल्वे स्टेशन जवळ, स्काय वॉक खाली वाहनतळ ठेका पध्दतीने चालविण्यासाठी मे. सुशिला ट्रेडींग कंपनी यांची निविदा एक वर्षाकरीता स्विकारण्यास ही मा. महासभा मान्यता देत आहे व यापूढे निविदा काढताना निविदेमध्ये टाकण्यांत येणाऱ्या अटीशर्तीमधून सदरच्या कामाकरीता अनुभवाची अट काढून टाकावी ज्यामुळे जास्त लोकांना ठेका स्पर्धामध्ये सहभागी होता येईल व तद्नंतर याखेरीज वाहनतळ उभारण्याची जागा उपलब्ध असल्यास प्रशासनाने मा. महासभेमध्ये प्रस्तावित करुन मान्यताप्राप्त करावे व नामकरण झालेल्या प्रत्येक रस्त्याला दिशादर्शक / नो एन्ट्री, नो पार्कींग, वन-वे व इतर आवश्यक फलक ठिकठिकाणी शहरामध्ये लावण्यात यावेत, असा मी ठराव मांडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा जो गोषवारा दिलेला आहे, त्या गोषवाऱ्यामध्ये आपल्या मा. महासभेचे कामकाज मराठीत चालले पाहिजे असे शासनाचे निर्देश आहेत. हे इंग्लीशमध्ये का दिले?

**मा. महापौर :-**

पूर्वी पण इंग्लीशमध्ये असायचे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही अधिकाऱ्यांना विचारा.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, या पे ॲन्ड पार्कच्या ज्या जागा आरक्षित केल्या आहेत, या कधी आरक्षित करण्यात आल्या?

**मा. महापौर :-**

या आरक्षित केलेल्या नाहीत.

**प्रशांत दळवी :-**

त्या आरक्षित आहेत का?

**मा. महापौर :-**

नाही. हे पे ॲन्ड पार्कचे आहे. यामध्ये आरक्षितचे काही नाही.

**प्रशांत दळवी :-**

पे ॲन्ड पार्कला २००८ मध्ये जसा ठराव झाला होता. त्यावेळेला आपण सहा ठिकाणी जागा निश्चित केल्या होत्या. त्यानुसार मिरारोडमध्ये १८४ ही आरक्षित जागा आहे. त्या ठिकाणी पे ॲन्ड पार्क चालू आहे. मग

ज्या उर्वरित पाच जागा राहिल्या, त्या जागा आहेत का? त्याची अंमलबजावणी का झाली नाही? त्या ठिकाणी पे ॲन्ड पार्क का चालू करण्यात आले नाही? त्यापैकी एक चालू आहे. गोषवाऱ्यामध्ये तसे नमुद केले आहे.

**दिपक सावंत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. २००८ मध्ये ज्या सहा ठिकाणी पे ॲन्ड पार्कसाठी निविदा काढली होती, आणि संबंधित कॉन्ट्रॅक्टरला दिली होती. त्यापैकी त्यांनी एकच, जे १८४ नंबरचे आरक्षण आहे, तिथेच पे ॲन्ड पार्क सुविधा चालू केली.

**प्रशांत दळवी :-**

मग त्याच्या निविदा पुन्हा काढल्या नाहीत का?

**दिपक सावंत :-**

उर्वरीत जी पाच ठिकाणे आहेत, तिकडे त्यांनी करणार नाही असे सांगितले. त्यामुळे आपण परत निविदा काढलेली नाही.

**प्रशांत दळवी :-**

आपण आता म्हणतो की, प्रमुख रस्त्यांवर आता पे ॲन्ड पार्क चालू करणार आहोत. मग हे जे मुख्य रस्ते आहेत, त्याच्यामध्ये पण आता डिव्हायडर बसविण्यात येत आहेत. मग ही पार्किंग कोणत्या साईडला करणार आहात? उजवी साईड की, डावी साईड की पूर्ण रस्ता? याचे काही धोरण निश्चित केले आहे का? तुम्ही तसे गोषवाऱ्यामध्ये कुठे म्हटले आहे. तुम्ही पे ॲन्ड पार्क चालू केल्यानंतर रहदारीला किती अडचण निर्माण होणार आहे. यामधले काही जे आहेत, ते तुम्ही वगळा. बाकीचे तुम्ही म्हणता की, मिरारोड स्टेशन, स्काय वॉकखाली वगैरे हा सगळा भाग ठिक आहे. परंतु तुम्ही इथे प्रमुख रस्त्यांची नावे दिली आहेत. त्या प्रमुख रस्त्यांवर आता डिव्हायडरची कामे चालू आहेत. मध्यंतरी आम्ही तोच विषय गेल्या मा. महासभेमध्ये मांडला होता की, त्या डिव्हायडरमुळे फार त्रास होतो आहे. त्यावेळेला मॅडम आणि मा. आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, आपण डिव्हायडरचे काम थांबवू. परंतु, माझ्या माहितीप्रमाणे अजूनपर्यंत ते डिव्हायडरचे काम थांबलेले नाही. आणि अशा परिस्थितीत आपण तिकडे पे ॲन्ड पार्कचे करत आहोत. म्हणजे रस्त्याला अडथळा निर्माण करायचा का?

**मा. महापौर :-**

मी मा. आयुक्त साहेबांना आता सांगते. त्यांना माहिती नव्हते. मी आता त्यांना सांगते की, जिथे डिव्हायडरची गरज नाही. तिथून आपण डिव्हायडर काढून घेऊ. कारण ट्राफिकला खूप प्रॉब्लेम होतो हे मलाही माहिती आहे.

**प्रशांत दळवी :-**

मॅडम, यांनी जसे म्हटले की, याच्यामधून जे उत्पन्न आपण मिळवणार आहात, या महानगरपालिकेसाठी, तर असे उत्पन्नामध्ये वाढ करण्यासाठी बरेच काय आहे. तुम्ही मग गेस्ट हाऊसचे नुतनीकरण वगैरे का थांबवले? ते पण सुरु करा. इथे आम्ही आम रस्त्यामध्ये, जिथे शाळेच्या बसेस वगैरे फिरत नाहीत. तिकडे फिरायला जागा नाही. मध्ये डिव्हायडर आले आहेत. त्या रस्त्याला तुम्ही पे ॲन्ड पार्कचे करुन तुम्ही रहदारीला कायम स्वरुपी करुन देता.

**दिनेश जैन :-**

जिकडे टाकायला पाहिजे तिकडे टाकलेले नाही.

**प्रशांत दळवी :-**

मॅडम, कुठलेही धोरण निश्चित करा. आणि तुम्ही जे काही दुचाकी आणि चार चाकी वाहनांसाठी काय आकारणी .........................

**मा. महापौर :-**

तुम्ही परवानगी शिवाय उठू नये. तुम्ही तिथे बसा.

**प्रशांत दळवी :-**

आपण दुचाकी आणि चार चाकीला काय कर आकारणी करणार आहोत, याचाही खुलासा करावा.

**दिपक सावंत :-**

मा. महासभेनेच ते ठरवलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, दुचाकी आणि चारचाकीचे किती पैसे असणार आहेत त्याचा ठराव आधी झालेला आहे. त्याचप्रमाणे त्याची अंमलबजावणी चालू आहे.

**प्रशांत दळवी :-**

त्यातून आपल्याला किती उत्पन्न मिळणार आहे?

**जुबेर इनामदार :-**

हा विषय जो आला होता प्रशासनाने त्याचे टेंडर आधीच काढले होते. आम्ही सुचना केली, मा. आयुक्तांना निवेदन केले, हा विषय मा. स्थायी समितीने रद्द केला आणि मा. महासभेसमोर परत आणला. हा विषय एका दिवसामध्ये झालेला नाही. तशीच कोणाची या विषयावर काही अडचण होती तर त्यांनी त्यांचा

पत्रव्यवहार केला पाहिजे होता. दुसरे असे की, प्रशासनाने जेवढी क्षेत्र, परिसर सुचवल होते, त्यातून काही वगळले आहेत. जे आम्हालाही अडचणीचे वाटत होते, ते ही वगळले. शहराच्या दृष्टीकोनातून त्यातून चांगले काहीतरी उत्पन्न मिळावे. वाहने उभी करतात, त्याचे नियंत्रण व्हावे. कारण वाहने उभी करणारे करुन जाणारच आहेत. त्याच्यावर नियंत्रण राहातच नाही. कमीत कमी पे ॲन्ड पार्क झाले तर त्यातून उत्पन्न हे एक स्तोत्र. दुसरे म्हणजे जिथे वाहने व्यवस्थितरित्या उभी केली जात नाहीत त्याला एक अंकुश लागेल. त्या विषयाची एक व्यवस्था राखली राईल. त्या दृष्टीकोनातून हा रितसर विषय अभ्यास करुन परत आणलेला आहे. त्याच्यावर कोणाला आक्षेप असेल तर त्यांनी तो मांडावा. आम्ही आमचा ठराव मांडलेला आहे.

**प्रशांत दळवी :-**

आमचा आक्षेप नाही. परंतु जिथे अरुंद रस्ते आहे, जिथे मध्ये डिव्हायडर लावण्यात आलेले आहेत, असे डिव्हायडर ................

**मा. महापौर :-**

मी डिव्हायडरचे साहेबांना ऑलरेडी सांगितलेले आहे. साहेब फिरतील. जिथे त्यांना वाटते की, डिव्हायडर योग्य नसेल तिथून ते काढण्याची परवानगी साहेब तुम्ही द्या.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम, ठराव झालेला आहे. दुसरा कोणाचा ठराव असेल तर त्याच्या समोर ठराव घ्या. विषय निकाली लावा.

**नरेंद्र मेहता :-**

वाहनतळाचा विषय आहे. मा. आयुक्त महोदय, २००८ ला हे मान्य झाले त्यावेळी ही जी नावाची यादी सादर केलेली आहे, आणि आज आपल्या सहीने तो विषय आलेला आहे. साहेब, आपण या जागा पाहणी केलेल्या आहेत का? म्हणजे याच्यामध्ये प्रशासनाची नक्की भुमिका काय? साहेब २००८ नंतर यामध्ये जे मेजोरीटी पार्ट आहेत ते मिरारोड भागातील आहेत. २००८ आणि २०१३ मध्ये मिरारोडची लोकसंख्या साधारण दुप्पट झालेली आहे. आपण त्यावेळी हा निर्णय घेतला की, ज्या जागेवर जास्त पॉप्युलेशन आहे. तिकडे आपण हे करु. आणि त्यामध्ये अजून एक निर्णय झाला होता की, पार्किंगची जागा रस्त्यावर, आपण एकटे मा. महासभा किंवा महापालिका निर्णय घेत नसतात. यामध्ये लॉ ॲन्ड ऑर्डरच्या हिशोबाने पोलीस, आर.टी.ओ. ऑफिस, यांची तिघांची त्यामध्ये मान्यता लागते. त्यानंतर तुम्हाला कोणत्याही रस्त्यावर पे ॲन्ड पार्क करता येते. तर या रस्त्याला या मान्यता आपल्याला प्राप्त झाल्या आहेत का? कारण त्यावेळी ती घ्यायची होती. मा. आयुक्त महोदय, या तिघांची एक कमिटी होऊन हे होते. त्यांची मान्यता आपल्याकडे या रस्त्यावर झालेली आहे का?

**दिपक सावंत :-**

आपण एन.ओ.सी. देतो की, आपण हे धोरण राबवणार. त्याच्यात आपण आर.टी.ओ. कडून परवानगी घेणार.

**नरेंद्र मेहता :-**

मी असताना अनेक गटनेत्यांची बैठक घेऊन त्यावेळी जो योग्य वाटला तो निर्णय घेतला. त्यामध्ये आर.टी.ओ. आणि पोलीस या तिघांची समितीमध्ये निर्णय होतात. आपण आज ठराव केला आणि निविदा काढली. नंतर त्यांनी परवानगी दिली नाही तर निविदा परत चेंज करायची का?

**दिपक सावंत :-**

याच्यावर पोलीसांबरोबर चर्चा केलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, २००८ ते २०१३ हे तुम्हाला स्टँडींगने मान्यता दिली नाही. म्हणून तुम्ही इकडे आले. तुम्हाला वाटते की, ही मान्यता घ्यायला पाच वर्षे तुम्हाला कमी आहेत?

**दिपक सावंत :-**

हे जे आहे, आपध शॉर्ट टर्म ट्राफिक मॅनेजमेंट ॲन्ड इंम्प्रुव्हमेंट प्लान तयार केला. त्याच्यामध्ये हे.......

**नरेंद्र मेहता :-**

हे त्यांनी सुचवलेले आहे. पण त्याची इम्प्लीमेंट करायला या दोन ॲप्रूव्हल लागतात ना?

**दिपक सावंत :-**

पोलीसांशी चर्चा करुनच हे घेतलेले आहे. पोलिसांनी सुध्दा पहाणी केलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

चर्चा आणि लेखी या दोघांमध्ये मा. आयुक्त महोदय, मा. महापौर मॅडम, मागच्या वेळी आपण सर्वांनी की, सगळीकडे डिव्हायडर सिस्टम चालू केली आहे. तुम्हालाही माहिती आहे की, डिव्हायडर लागल्यानंतर पार्किंग झाली तर काय अवस्था होईल. ज्या प्रकारचे रोड आहेत, सगळीकडे डिव्हायडर चालू आहेत. भाईंदर ईस्ट, वेस्ट, मिरारोड सगळीकडे. यानंतर या पार्किंग बसणार नाहीत. उदाहरण, तुम्ही आता दिपक हॉस्पीटलच्या रस्त्यावर मंजुर केले. त्या ठिकाणी दोन्ही साईडला फेरिवाले बसतात, हे तुम्हालाही माहिती आहे. इट इज द मार्केट. तुम्ही त्यामध्ये पार्किंग, चार हॉस्पीटल आहेत. चार छोट्या मोठ्या शाळा आहेत.

तुम्हाला वाटते की, पार्किंगसाठी ही जागा व्यवस्थित आहे? याला काही क्रायटेरीया आहेत, बायलॉज आहेत, काहीतरी आहेत. आपण डायरेक्टली आम्हाला प्रस्ताव सादर केला. आम्ही प्रत्येक रोडला जात नाही की, काय परिस्थिती आहे आणि या दोन ज्या मान्यता लागतात, पाच वर्षामध्ये तुम्ही घ्यायला पाहिजे होते. आम्ही २००८ ला ठराव केला. तुम्ही आता जे बोलले, ट्राफिक कंट्रोल इम्प्लीमेंट, ते आता मागच्या वर्षी आले. मग तुम्ही पाच वर्षे काय केले? पाच वर्षे तुम्ही त्यांचे अप्रुव्हल घेतलेच नाही. आता आम्ही जे मान्य करणार ते पोलीस आणि हे करणार का? तुम्ही निविदा काढायची आणि पोलीसांनी मा. आयुक्तांना पत्र द्यायचे की, इकडे ट्राफीक पार्कींग करु नये. अडचण निर्माण होणार. मग हे जे रस्ते तुम्ही आम्हाला सादर केले, हे दोघांना मान्य आहेत? साहेब, तुम्ही इकडे विषय दिला आहे की, स्टँडींगला मान्यतेला या निविदा गेलेल्या ..................

**ध्रुवकिशोर पाटील :-**

फक्त एकच स्कायवॉकच्या खालचा विषय स्टँडींगचा होता. बाकी जे सगळे विषय आहेत ते ट्राफीक सिस्टम मॅनेजमेंटने दिले होते. आणि त्याप्रमाणे त्याच्यामध्ये पोलिस डिपार्टमेंट आणि दोन्ही डिपार्टमेंट, एकत्र फिरुन त्यांनी जॉईंट सर्वे केला आणि त्या हिशोबाने दिलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ज्या एजन्सीला आपण काम दिले होते. हे टेबलवरचे काम आहे. त्यांनी आपला नकाशा घेतलेला आहे आणि ज्या ठिकाणी १५० फुट, ९० फुट, ६० फुट असे नकाशात दाखवले आहेत, त्याच्यावर त्यांनी मार्किंग करुन दिलेली आहे. आम्हाला अजून ती प्रत मिळालेली नाही. पण मला जी माहिती मिळालेली आहे की, ज्या ठिकाणी ३० फुटाचे रस्ते आहेत, त्या ठिकाणीही त्यांनी डिव्हायडर बसवलेले आहेत. प्रत्यक्षात साईट सर्वे झालेला नाही. श्री. सावंत साहेब, तुम्ही त्याचा साईट सर्वे करा. तुमच्याकडे नकाशा असेल तर तुम्ही बघा. आम्ही जे सांगतो ते खात्रीपूर्वक सांगतो की, त्या नकाशामध्ये दाखवलेले जे स्पॉट आहेत, ते आपल्या डी.पी. प्लानमध्ये ६० फुट आहेत. पण प्रॅक्टीकली ते ३० फुटपण नाहीत. अशा ठिकाणी त्यांनी प्रोव्हाईड केलेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, एकतर या ठरावामध्ये असे नमुद होते की, २००८ ला मान्य झालेले आहेत आणि स्टँडींगने इकडे पाठवले असे दिसून येते. साहेब, यामध्ये आपण दोघांची मान्यता घ्या. मी आता उदाहरण सांगितले, कारण मी तिकडे रोज येतो जातो, मला माहिती आहे. चार हॉस्पीटल, चार स्कुल आणि दोन्ही साईडला मार्केट. म्हणजे तुम्ही एकही गाडी उभी करु शकत नाही. आपण असा ठराव केला, निविदा काढायची. निविदा काराने निविदा भरायची. नंतर पैसे भरायचे नाहीत, या सगळ्या गोष्टी निर्माण होतील. यात दोघांची मान्यता घ्या. नंतर आणा.

**मा. महापौर :-**

आपण आर.टी.ओ.ची मंजुरी वगैरे सर्व घेऊ. त्यानंतर निविदा काढू. तसेच करणार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपण टोटल मिरा भाईंदरमध्ये हे रस्त्यावर पार्किंग करतो. म्हणजे नागरिकांना त्रास होऊ नये. आपल्याकडे पार्किंग आरक्षणे किती आहेत? किती ताब्यात आहेत? आपण ते का करत नाहीत? टोटल किती आरक्षणे आहेत? तुम्ही म्हटले आहे की, कनाकिया रोड म्हणजे मॅकडोनल्डाच रोड. त्याच रस्त्यावर १०० ते १५० गाड्या पार्किंगसाठी तुम्ही उभारलेलेच आहे. मग तुम्ही परत बोलता की, रस्त्यावर पार्क करा. त्या पार्किंगमध्ये पार्किंग करु नका. इट इज रेडी. १०० ते १५० गाड्या पार्किंगचे आपण पूर्ण जी प्लस फोरचे स्ट्रक्चर आपल्याला रेडी आहे. ते घेऊन मग तुम्ही कनाकिया रोडवर परत कशाला करता? पार्किंग तर त्याच रस्त्याला आहे. अशी अनेक आरक्षणे आहेत, ज्यामध्ये इट इज रिझर्व्ह फॉर द पार्किंग. तेच वापर करा. मिरारोड स्टेशनजवळ पार्किंग रिझर्व्हेशन आहे. मागच्या वेळी आपण त्याची निविदा काढली होती की, ते बी.ओ.टी. वर द्या. त्याच्यामध्ये जी प्लस फोरचे करा. ते २०१० ला केले. ते इम्प्लीमेंट झाले नाही, कारण तिकडे सी.आर.झेड होते. पण आपण निविदा काढलेली. अशाच प्रकारे निविदा काढत बसायचे आणि इम्प्लीमेंट?

**मा. महापौर :-**

यावेळी आपण पहिली मंजुरी घेऊ. नंतर निविदा काढू.

**नरेंद्र मेहता :-**

माझे फक्त एवढेच निवेदन आहे की, पार्किंग जागा आहेत. इट इज रिझर्व्ह फॉर पार्किंग. आपण हे सर्व रस्त्याचे आणले आहे. पण पार्किंगची जागा एखादे वेळी १०० टक्के आली नसेल, ५० टक्के एस.के. स्टोनच्या लेफ्ट बाजूलापण पार्किंगचे आरक्षण आहे. २५ टक्के आले तर २५ टक्के करा. मोकळ्या जागेमध्ये पण पार्किंग करता येईल. तर त्या जागा याच्यात समाविष्ट करायला पाहिजेत.

**जुबेर इनामदार :-**

श्री. मेहता साहेब, ठरावामध्ये समाविष्ट केल्या आहेत. महानगरपालिकेच्या आरक्षित जागा उपलब्ध असल्यास, असा उल्लेख केला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ठराव करताना आपण कनाकिया रोड पण म्हटले आणि पार्कीगपण आहे. म्हणजे कनाकिया रोडला पण निविदा काढायची का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कनाकिया रोडला पार्किंग आहे. पण ज्याला शॉटटर्म पार्किंग करायची असेल, पाच मिनिटासाठी पार्किंग करायची असेल तो वाहनतळामध्ये जाऊन पार्क पाच मिनिटांसाठी पार्क करुन शॉपिंग करायला जाणार आहे का?

**मा. महापौर :-**

हे शार्ट टर्म पार्किंगचे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, इट इज अ पार्किंग, आपण शॉर्ट टर्म आहे म्हणून बोलू शकत नाही.

**मा. महापौर :-**

ज्याला पाच मिनिटाचे काम आहे. तो जाऊन तिथे पार्क करेल आणि मग पाच मिनिटाचे ..............

**नरेंद्र मेहता :-**

तुम्हाला वाटते की, आपल्याकडे दोन मिनिटांसाठी जाईल त्याला हैराण करायला पाहिजे की, पैसे दे नंतर जा. आम्ही सुचना केलेली आहे की, जेवढे पार्किंग स्टेशन आहेत, ते डेव्हलप करा. त्यामध्ये पार्किंग करा. म्हणजे नागरीकांना आणि मा. आयुक्त महोदय सर्व परवानग्या घेतल्यानंतर आपण ही निविदा काढावी.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर महोदय, मिरा भाईंदर के लिए जो रोडपर पार्किंग का विषय लाया है। जैसे एम.टी.एन.एल. से लेकर आय.डी.बी.आय. का, तो मैं चाहूँगा की, संबंधित अधिकारी हर रोड के पार्किंग के उपर का पुरा प्रायोगिक परिक्षण रिपोर्ट दे। जो जाँच सके की, यह रोड पर कितना लेन्थ है। और पार्किंग करेंगे तो इतना मीटर रिझर्व्ह होगा। गाडी को आने-जाने मे इतना ट्राफिक लगेगा। तो आने-जाने में कितनी दिक्कत पडेगी। बिना इस स्टडी के पास करना बेवकुफी का काम हो जाएगा।

**मर्लिन डिसा :-**

मॅडम, आपकी परवानगी से बोलती हूँ। यह जो शितल नगर से जांगीड सर्कल रस्ता है। यहाँ पर २०११ पासून रस्ता नुतनीकरण झालेले आहे. तिथे ओव्हर टेकींग आणि बाईक राईडींगची स्पीड होते. वहाँ पर काफी अॅक्सीडन्ट हो चुके है। और इसके लिए वहाँ के सिटीझन्स के बहुत सारे डिमांड है। इसलिए ट्राफिक डिपार्टमेंट के साथ मिलकर, जो प्रिवीयस कमिशनर श्री. विक्रम कुमार साहब थे, उनसे भी परमिशन लेकर, ट्राफिक डिपार्टमेंट की परमिशन लेकर वहाँ पर डिव्हायडर डाले। ताकी, ओव्हरटेकींग रिड्युस हो जाए और स्पीड बाइकींग कम हो जाए।

**मा. महापौर :-**

मॅडम, मी त्यांना तसेच बोललेी आहे की, जिथे जरुरी आहे, तिथे राहू द्या. पण जिथे नाही आणि फक्त ३० फुट रोड आहे, स्मॉल रोडस् आहेत, रोडस् तिथून आपण काढू. तसे सांगितलेले आहे.

**मर्लिन डिसा :-**

There is sevious traffic jam always at that sheetal nagar circle.

**दिनेश जैन :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. आपल्या मिरारोड स्टेशनच्या बाजूला जे स्कायवॉक बनलेले आहे. त्याच्या खाली एका जागी पार्किंग होते. म्हणजे आपण जी रश्मी बिल्डरची अॅड बिलावर छापलेली आहे. तो तिकडे इलिगल पार्कीग करतो आणि ती जागा रेल्वेच्या बाजूला लागून आहे. तिकडे आपल्याला पे अॅन्ड पार्कीग करता येईल. आणि ती जागा आपल्या नगरपालिकेच्या हद्दीमध्ये आहे.

**प्रशांत दळवी :-**

ते आता विषयामध्ये घेतलेले आहे. तिकडे पार्किंग होणारच आहे.

**मा. महापौर :-**

ते ऑलरेडी घेतलेले आहे.

**गिता जैन :-**

मॅडम, हम हमेशा मुंबई और ठाणे मे जो हुआ उसका उदाहरण देकर करते है। तो इस बार यह उदाहरण क्यों नही लेते की, मुंबई में आप एक जगह पार्क करते है और पंद्रह मिनिट तक हम चलकर जाते है। क्योंकी वहाँ वह स्ट्रीक्ट है। अब यह साहब बोल रहे है की, किसीको दो मिनिट काम होगा, तो वो यहाँ पार्क करेगा और कहाँ जाएगा। तो दो मिनिट वहाँ भी जिसको काम होता है, वो यहाँ पार्क करता है। आयदर वह कॅब लेकर जाता है, चलकर जाता है, कैसे भी जाता है। लेकिन उस नियम का पालन करता है। तो फिर यहाँ क्यों नही? अगर कनाकिया पर अपने पास एक बिल्डींग है। और उस रोड पर वापस उसको पार्किंग दे रहे है, तो यह क्यों? क्यों नही वो बंदा रिक्शा, टॅक्सी या चलकर जा सकता है? जवाब दिजीए।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम, आपने जैसे बोला की, हमे भी कुछ करना चाहिए। तो वैसे प्रशासनने यह प्रस्ताव लाया। हमने उसे पास किया। अगर इसमें आपको कुछ गलत लगता है, तो आप भी ठराव दे दिजिए। कनाकिया में जो पार्कींग प्लेस है, वहाँ पर पार्कींग होने वाली है। और जो रोड पर भी पार्किंग प्लेस है, वहाँ पर भी पार्किंग होनेवाली है। हमने टेंडर निकाला है। अगर आपको इसमें कुछ ऐतराज है, तो आप ठराव मांडो।

**गीता जैन :-**

अब चर्चा हो रही है, तो हम अपनी सुचना दे रहे है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो पर्टिक्युलर पॉईंट आऊट मत किजिए।

**गीता जैन :-**

शाम के समय हमारा मेन रोड, गोल्डन नेस्ट सर्कल से फ्लाय ओव्हर तक या शिवाजी पुतले तक का बोलते है, वो इतना क्राऊडेड होता है, अगर आप उधर पार्कींग की एक लाइन देते है, तो वो कितना प्रॉब्लेम हो जाएगा? प्रॅक्टीकली काई जाकर, दिन के चार बार आप जाइए। प्रॅक्टीकल देखीए की, किस समय पर क्या प्रॉब्लेम हो रहा है। उसके बाद आप उसको आरक्षित किजीए।

**मा. महापौर :-**

इन्होंने प्रस्ताव रखा है। हमने वहीं बोला है की, पहले जब तक आर.टी.ओ. और सबकी मंजुरी नहीं आती है, तब तक निविदा नहीं निकाल सकते है। सब पुरा हो जाएगा, सर्व्हे हो जाएगा, उसके बाद निविदा निकालनेवाले है। उन्होंने उनकी राय रखी है, आप आपकी राय रखो।

**सुरेश खंडेलवाल :-**

मा. महापौर मॅडम, जैसे यह मुद्दा चल रहा है। दो चाकी और चारचाकी वाहन के लिए यह जो पार्कींग स्पेस के लिए ठराव है। मेरा यह जानना है की, दोचाकी और चारचाकी वाहन के लिए हम लोग यह उपाययोजना ला रहे है। लेकिन जो बडे ट्राव्हेल्स की गाडीया, जैसे बस, ट्रक, जो कमर्शिअल वाहन है। वो रोडपर खडे रहते है। और सुबह से लेकर शामतक, दो-दो दिन तक वही पार्क होते है। उसके लिए मैंने एक अध्ययन किया था। श्री. दिपक सावंत साहब से मेरी बात भी हुई थी की, पुना महानगरपालिका और एक-दो महानगरपालिका मे जिस तरह का एक प्रावधान है की, यह जो बस, ट्रक और जो भी कमर्शिअल वाहन, जो अपने महानगरपालिका के रोड पर खडे रहते है। वो लोग पार्क करके दो-दो, तीन-तीन दिन तक हिलाते भी नही है। तो उसके लिए कोई उपाययोजना मैंने आर.टी.ओ. में भी कम्प्लेंट की थी, तो उन्होंने यह बताया .....

**मा. महापौर :-**

श्री. सावंत साहेब, मला असे वाटते की, ज्या जागा रिझर्व्ह केलेल्या आहेत, ओपन ग्राऊंड असेल, तिथे तुम्ही ट्रक टर्मिनल किंवा बस टर्मिनल बनवू शकता. त्यांना स्ट्रीक्ट करा आणि त्यांना तिथे पाठवा.

**दिपक सावंत :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. घोडबंदरला जे आरक्षण क्र. ३२६ आहे. तिथे आपण ट्रक टर्मिनलसाठी जी वाहतुक संघटना आहे त्यांना सांगितलेले आहे की, तिकडे पार्क करा.

**मा. महापौर :-**

तुम्ही त्याच्यावर थोडी स्ट्रीक्ट कारवाई करा.

**दिपक सावंत :-**

काशिमिरा पोलिस स्टेशनला पत्र दिलेले आहे की, जे आहेत त्यांच्यावर कारवाई करा.

**सुरेश खंडेलवाल :-**

साहेब, माझी एक विनंती आहे की, आजच्या मा. महासभेमध्ये आता आपला पुढे विषय आहे. आपण जे पोलिस नियुक्त करत आहोत, त्यांना युज करुन आपण याच्यावर कारवाई करु शकतो. अब जो यह ट्राफिक समस्या की बात चल रही है, आप अब गोल्डन नेस्ट से काशिमिरा, शाम के टाइम जाते है, तो आधा, पौना, एक घंटे तक, जो ट्राफिक की समस्या है, आज शाम के टाईम देखिए, काशिमिरा पहुँचने तक एक-एक घंटा लग जाता है। आगे यह समस्या बढनेवाली है। मेरा यह सुझाव था की, दुसरी महानगरपालिका मे, मुंबई में सिंक्रानाइज सिग्नल सिस्टम लगा हुआ है। यदि हम कंटीन्यु जाते है, तो उसका थोडा बेनिफिट होगा। और सिंक्रोनाइज सिस्टम का मैंने पत्र भी दिया हुआ है। लेकिन उसके उपर अब तक कुछ कारवाई नहीं हुई है। मेरी एक रिक्वेस्ट है की, यदी आप इसके उपर थोडा ध्यान देंगे, तो यह समस्या दिन-ब-दिन बढते जाएगी। आगे इसपर थोडासा ध्यान देना जरुरी है।

**फरिद कुरेशी :-**

मॅडम, सिंक्रोनायझेशन ऑफ सिग्नलचे मी ही पत्र दिले आहे. आणि त्यावर असे आहे की, दहिसर चेकनाक्यापासून गोल्डन नेस्ट सर्कलपर्यंत जेवढे सिग्नल आहेत, एकतर त्याच्यावर आपल्याला ट्राफिक वॉर्डनची मागणी, ट्राफिक डिपार्टमेंटने सुध्दा केली होती. तर तसे मी ही पत्र दिले आहे आणि माझी अशी सुचना आहे की, ट्राफीक वॉर्डन तरी द्यावे. कारण सिनिअर सिटीझन्स क्रॉस करतात. आणि तिकडे ट्राफिकचे भरपूर हेव्ही मूव्हमेंट आहे. म्हणून सिग्नल सिंक्रोनायझेशन ॲन्ड ट्राफिक वॉर्डन हे सगळे जर तिथे राहिले तर

बरे होईल. या विषयावर पार्किंगच्या संदर्भात श्री. जुबेर इनामदार साहेबांनी जसा ठराव मांडला आहे. आता काशिमिरा फ्लाय ओव्हरपासून गोल्डन नेस्टपर्यंत बरेचसे सिग्नल्स आहेत. आणि आजूबाजूला दोन्ही साईडला पार्किंग आयडेन्टीफाइड वेदर इट इज आयडेन्टीफाईड पार्कींग एरिया और नॉट? नसले तरी तिथे हेव्ही पार्किंग होतात. हेव्ही व्हेईकल्स आहेत. स्मॉल रिक्शा, कार. कारण दोन्ही बाजूला पेट्रोल पंम्प आहेत. गॅस स्टेशन आहे. तिथे पार्कींग होत असतात.

**मा. महापौर :-**

मी साहेबांना सांगितलेले आहे.

**फरिद कुरेशी :-**

मॅडम, माझी जी मागणी आहे ती सांगतो. आपले जे जंक्शन्स आहेत, तिथे आपण जर अंडरपास घेतला. तर जे हेव्ही मूव्हमेंट आहेत ते डायरेक्ट जाणार आणि क्रॉस ओव्हरसाठी अंडरपास आला. त्याच्याखालून लोकांना येण्याजाण्यासाठी पण मार्ग होतो आणि जे इंटरनल टर्न आहेत, यूटर्न आहेत ते आपल्याला बंद करता येतात आणि ॲक्सीडन्टच्या अनुषंगाने सुध्दा त्यामुळे ॲक्सीडन्ट कमी होतील. हा विषय मा. महासभेत घेण्यासाठी तसे पत्र मी मा. आयुक्त साहेबांना दिले आहे. त्याच्यावर अजून चर्चा करुन आणि डिझायनिंग करुन पुढच्या मा. महासभेमध्ये त्याला बजेटींगसाठी आणि कॉन्ट्रॅक्ट देण्यासाठी किंवा त्याची पुढची जी कार्यवाही असते ती करण्यासाठी माझी एक सुचना आहे आणि निवेदन आहे की, त्याला घ्यावे. आणि सेम तसेच दहिसर चेकनाक्यापासून काशिमिरापर्यंत जो मिरा गावठणचा एरिया आहे, तिकडे सुध्दा एक असा झोन आहे की, दोनशे-अडीचशे फ्लॅट एका कॉम्पलेक्सला आहेत, अडीचशे फ्लॅट दुसऱ्या कॉम्पलेक्सला आहेत. बाराशे फ्लॅट दुसरे बिल्डर बांधतात. तिकडेसुध्दा आता हेव्ही ट्राफिक मुव्हमेंट आहे. आणि यापुढे लोकल होणारच आहे. तर तिकडे सुध्दा असाच एक अंडरपास, एक स्काय वॉक आणि एक सिग्नल अशी मागणी मी मागच्या मा. आयुक्त साहेबांकडे केलेली आहे. तर त्याच्यावर आपण प्रत्यक्ष पाहाणी करुन आम्हाला त्या विषयावर जर तिकडे इन्स्पेक्शनसाठी बोलावले तर आपल्याला थोडे सोयीस्कर होईल.

**रोहिदास पाटील :-**

मा. स्थायी समितीमध्ये या पार्कींगचा विषय आला. आम्ही त्यांना जागा दाखवली होती. पत्र दिले. संबंधित सर्व डिपार्टमेंटला त्याची कॉपी दिली की, तात्पुरत्या स्वरुपात नवघरच्या पाण्याच्या टाकीजवळ जे मैदान आहे. आता ते जंगलासारखे झालेले आहे. लोक तिथे वेगवेगळ्या कामासाठी त्याचा वापर करतात. तिकडे नको ते चरसी लोक बसतात. प्रातःविधीसाठी वापरले जाते. तेवढे जर सपाटीकरण केले तर नवघर गाव ते स्टेशन, नवघर गाव ते फाटक ह्या रस्त्यावर उभे राहणारे जे ट्रक आहेत, बसेस उभ्या राहतात, नीट सन्मानाने तिकडे उभे राहू शकतील. शाळेच्या मुलांनाही त्रास होणार नाही. नागरीकांनाही त्रास होणार नाही. ज्या मोठ्या बसेस येतात, त्यांना टर्न मिळत नाही. आणि रोज त्या रस्त्यावर इलेक्ट्रीकचे, पाणीवाल्यांचे, हॉल्ट होतच राहतो. काल आणि परवा दोन दिवस बी.पी.रोड पूर्ण जाम. रिलायन्सवाल्यांनी आपल्याला न विचारता आपल्या पाईपलाईनला आरपार भोक पाडला. तो फॉल्ड निघत नव्हता. आपले डिपार्टमेंट चोवीस तास काम करत होते. काल संध्याकाळी तो फॉल्ट क्लीअर झाला. संपूर्ण रस्ता बंद. अशासाठी ज्या ट्राव्हेल्स गाड्या आहेत. त्या आमच्या बंदरवाडी ...................

**मा. महापौर :-**

ठिक आहे, मला समजले आहे. नवघरची जी जागा आहे, तेही आपण त्यांना सांगितलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

लेव्हल करायला सांगा.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. आता सर्वांनी बसून घ्या.

**अनिल भोसले :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. दहिसर चेकनाका ते वर्सोवा घोडबंदर पर्यंत जो वेस्टर्न हायवे आहे, त्या हायवेवर आजुबाजूला गॅरेजवाले उभे असतात. त्यामुळे अनेक अपघात झालेले आहेत. अनेक लोकांचे बळी गेलेले आहेत. जसे श्री. सावंत साहेबांनी सुचवले की, घोडबंदर या ठिकाणी आपण ट्रक टर्मिनलसाठी जागा आरक्षित केलेली आहे. त्या अनेक संघटनांनी जे मोठे वाहन चालक आहेत, यासाठी आम्ही अनेक वेळा प्रयत्न केले. पण त्या गाड्या हटल्या गेल्या नाहीत. याला असे कारण आहे की, आपण ज्या ठिकाणी आपले ट्रक टर्मिनल बनवलेले आहे. त्या ठिकाणी कुठलीही सुरक्षा भिंत किंवा तारांचे कंम्पाऊंड नसल्यामुळे त्या ठिकाणी वाहने चोरीला जातात. यामुळे ट्रक टर्मिनलमध्ये जायला तयार नाहीत. त्यामुळे माझी एक सुचना आहे की, त्या ठिकाणी जर तारांचे कम्पाऊंड केले तर त्या ठिकाणी गाड्या उभ्या राहतील.

**रवि व्यास :-**

मॅडम, भाईंदर वेस्ट, जय अंबे नगर के पास अपना जो बस डेपो का रिझर्व्हेशन प्लॉट है। वहाँ पर अपनी एम.बी.एम.टी. की बस और बेस्ट की जो बसेस है। वो ग्राऊंड में पार्क नहीं होती है। सारी बसेस जय अंबे नगर के रोड पर खडी करके ड्रायव्हर चले जाते है। एक तरफ वहाँ पर सब वे का काम चालू है। तो

मॅडम, पुरा ट्राफिक जाम हो जाता है। आगे फिश मार्केट भी है। मैंने श्री. सावंत साहब को इसके लिए एक लेटर भी दिया है। लेकिन अब तक कोई कारवाई हुई नहीं है।

**मा. महापौर :-**

उस ग्राऊंड पर जो एस.टी. के डेपो के लिए जगह उपलब्ध है। वहाँ पार्किंग होती थी। बाद में एस.टी. वालोने अपने कॉर्पोरेशन को लेटर भेजकर वहाँ पर पार्किंग के लिए मना किया है। इसलिए थोडा प्रॉब्लेम हो रहा है। मैं भी गयी थी। श्री. दिपक कपूर साहब उनके इन्चार्ज है। मैंने मागणी की है, ॲन्ड व्हेरी सून हमें वो जगह उपलब्ध हो जाएगी। ऐसा मुझे लगता है। जैसे ही वो रिझल्ट आता है, आय थिंक वी विल पार्क ऑल द ट्रक्स ऑन द ग्राऊंड.

**रवि व्यास :-**

मॅडम, एक सुचना है की, वहाँ पर ग्राऊंड में प्रायव्हेट बसेस पार्क की जाती है। और वहाँ पर जो कर्मचारी है, उनके मिलीभगत से वहाँ पर प्रायव्हेट बसेस ....................

**मा. महापौर :-**

प्रायव्हेट बसेस के लिए मैंने भी आर.टी.ओ. को लेटर दिया था की, वहाँ पर पार्किंग ना किया जाए।

**वंदना चक्रे :-**

मॅडम माझी अशी एक सुचना आहे की, जेव्हा पाहणी करण्यासाठी जातात, आपण म्हणतात की, पाहाणी केल्यानंतर होणार. याच्यात बरीचशी नावे आलेली आहेत. काही नावे आली, काही आली नाहीत. विचारणा केली होती. परंतु माझे असे म्हणणे आहे की, ज्यावेळेस तुम्ही सर्वे कराल, त्यावेळे तुम्ही स्थानिक नगरसेवकांना घ्याल का? म्हणजे त्यांना माहित पडेल की, आपल्या एरियामध्ये कुठे पार्किंगसाठी द्यायचे की नाही. ट्राफीकचा हा सगळ्यात मोठा प्रॉब्लेम सॉल्व होऊन जाईल. अशी माझी सुचना आहे. ही सुचना आपण समाविष्ट करुन घ्यावी.

**शर्मिला बगाजी :-**

मा. महापौर मॅडम, आपण आता शहरातील ट्राफिक बद्दल भरपूर गोष्टी ऐकलेल्या आहेत. मी तुम्हाला एक रिक्वेस्ट करते, उत्तन एरिया खूप आतमध्ये एरिया आहे. आणि आमच्या नाक्यावरची परिस्थिती कदाचित तुम्ही पण पाहिली असेल. प्रत्येक वेळेला खूप ट्राफिक होते. दोन्ही साईडला, टू व्हीलर उभ्या असतात. मी एकदा लेटर पण दिले आहे. आर.टी.ओ. कडून त्याचे फॉलो अप्स पण लेटर घेतले होते. एक-दोन वेळा टोईंग मशिन लावली म्हणजे, स्थानिक लोक आहेत. त्यांना कळले की असे झालेले आहे तर पुढच्या वेळेला कदाचित ते करणार नाही. तुम्ही प्लीज माझी ही रिक्वेस्ट समजून जरा त्यांच्याकडून ......................

**मा. महापौर :-**

मी श्री. सावंत साहेबांना आर.टी.ओ. ला स्ट्रीक्ट करायला सांगते.

**शर्मिला बगाजी :-**

नो पार्किंग झोन झाला तर, कारण खूपच छोटा एरिया आहे, म्हणजे अरुंद रस्ता आहे, तिथे नाक्यावर ट्राफिक होतो.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करत आहे.

**प्रकरण क्र. ४९ :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ उभारण्याकरीता चर्चा करुन महासभेमध्ये निर्णय घेणेबाबत.

**ठराव क्र. ५७ :-**

मिरा-भाईंदर शहराचे भौगोलिक क्षेत्र ७९.०० चौ.कि.मी. असून २५ टक्के रहिवास क्षेत्रे व ७५ टक्के इतर आहे. शहराची लोकसंख्या आजमितीस १२ लाखापर्यंत पोहोचलेली आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर वाहनांची संख्याही वाढलेली आहे. सन २००८ मा. महासभा दि. १०/०४/२००८ प्र.क्र. ०३ ठराव क्र. ०३ अन्वये मा. आयुक्तांना प्राधिकृत केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून शहरामध्ये २३ ठिकाणी नवीन वाहनतळ "पे ॲन्ड पार्क" च्या निविदा प्रसिध्द करण्यात आल्या. मा. स्थायी समिती दि. ०५/०१/२०१३ ठराव क्र. ०४ अन्वये सदरची निविदा प्रक्रिया रद्द करण्यांत आली व सदर विषय मा. महासभेसमोर घेण्याचे सुचित करण्यांत आले.

मिरा-भाईंदर शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ उभारण्याची गरज व महापालिकेला होणाऱ्या आर्थिक फायद्याच्या दृष्टीकोनातून प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या २३ ठिकाणांमधून व इतर खाली उल्लेखलेल्या जागी सदरची कार्यवाही करावी.

१ गोल्डन नेस्ट सर्कल पोलीस चौकी ते इंद्रलोक पोलीस चौकी

२ स्मशान रोड ते इंद्रलोक, न्यू गोल्डन नेस्ट

३ दिपक हॉस्पीटल ते सेव्हन स्क्वेअर ॲकेडमी

४ शिवार गार्डन ते सरदार पटेल हायस्कूल

५ मॅडोना हॉटेल ते रामदेव पार्क

६ कनकिया रोड
७ एस.के.स्टोन समोर लतिफ पार्क गृहसंकुल ते डोंगरी झोपडपट्टी
८ जी.सी.सी. क्लब ते विद्यानगरी हाऊसिंग सोसायटी
९ झंकार पासुन ते आर.एन.ए
१० प्लेझंट पार्क ते एम.आय.डी.सी.
११ सृष्टी ते रॉयल कॉलेज रोड
१२ शितल नगर ते जांगीड सर्कल (रस्त्याच्या एका बाजुला)
१३ एस.के.स्टोन ते शितल नगर सर्कल (गीता नगर संकुलाच्या लगत असलेला रस्ता)
१४ मिरा रोड ब्रम्हकुमारी सर्कल ते पुनम कॉम्पलेक्स मुख्य रस्ता
१५ मिरा रोड स्टेशन शांती शॉपींग सेंटर समोर स्काय वॉक खाली
१६ भाईंदर (पुर्व) जेसल पार्क रेल्वे समांतर शिवसेना शाखेच्या बाजुचा रस्ता
१७ शिवाजी पुतळा ते गोल्डन नेस्ट सर्कल रस्त्याच्या दोन्ही बाजुला
१८ शहरामध्ये महापालिकेचा आरक्षीत भूखंड जागा उपलब्ध असल्यास

तसेच भाईंदर (पश्चिम) रेल्वे स्टेशन जवळ, स्काय वॉक खाली वाहनतळ ठेका पध्दतीने चालविण्यासाठी मे. सुशिला ट्रेडींग कंपनी यांची निविदा एक वर्षाकरीता स्विकारण्यास ही मा. महासभा मान्यता देत आहे व यापूढे निविदा काढताना निविदेमध्ये टाकण्यांत येणाऱ्या अटीशर्तीमधून सदरच्या कामाकरीता अनुभवाची अट काढून टाकावी ज्यामुळे जास्त लोकांना ठेका स्पर्धामध्ये सहभागी होता येईल व तद्नंतर याखेरीज वाहनतळ उभारण्याची जागा उपलब्ध असल्यास प्रशासनाने मा. महासभेमध्ये प्रस्तावित करुन मान्यताप्राप्त करावे व नामकरण झालेल्या प्रत्येक रस्त्याला दिशादर्शक / नो एन्ट्री, नो पार्कींग, वन-वे व इतर आवश्यक फलक ठिकठिकाणी शहरामध्ये लावण्यात यावेत, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५०, श्री. भारत जगताप, सहाय्यक नगररचनाकार यांना महानगरपालिका सेवेतून कमी/बडतर्फ करणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सहाय्यक नगररचनाकार श्री. भारत जगताप यांची कार्यालयीन आदेश क्र. मनपा/आस्था/४४०/२९८८/२००३-०४ दि.११/०७/२००३ रोजीच्या आदेशांन्वये सरळ सेवा निवडीद्वारे सहाय्यक तथा बिल्डिंग इन्स्पेक्टर या पदावर नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था/१५२३/१८२०/२००६-०७ दि.०२/१२/२००६ अन्वये श्री. भारत जगताप यांना सहाय्यक नगररचनाकार या पदावर पदोन्नती देण्यात आली.

सहाय्यक तथा बिल्डिंग इन्स्पेक्टर या पदावर सरळ सेवेने नियुक्ती होण्यासाठी उमेदवाराची किमान शैक्षणिक अर्हता ही महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातील ३ वर्षाची पदवीका/पदवी उत्तीर्ण आवश्यक होती आणि त्या पृष्ठर्थ श्री. भारत जगताप यांनी ३ वर्षाची पदवीका उत्तीर्ण झाल्याबाबत गुणपत्रिकेची छायांकित प्रत सादर केली होती.

दि.०५/०५/२००३ रोजीच्या मुलाखतीच्या पत्रामध्ये मुद्दा क्र.२ अन्वये शैक्षणिक पात्रतेबाबत मूळ दाखला आणणेबाबत नमूद करण्यात आलेले आहे आणि तसेच दि.११/०७/२००३ रोजीच्या नियुक्ती आदेशातील अट क्र.३ अन्वये शैक्षणिक अर्हतेची मूळ प्रमाणपत्रे दाखल करण्याचे बंधनकारक असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. त्यानंतर श्री. भारत जगताप यांना दि.२८/०१/२०१० रोजीच्या पत्रांन्वये कागदपत्र/प्रमाणपत्राच्या मूळप्रती मागणी करण्यात आली होती असे दि.०१/०२/२०१० रोजीच्या श्री. भारत जगताप यांचे प्राप्त लेखी निवेदनावरुन दिसून येते.

शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र पडताळणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना दि.०६/०६/२०१२ रोजीच्या लेखी पत्राद्वारे लेखी कळविण्यात आले होते, परंतु कार्यरत १५ अधिकारी/कर्मचारी यांच्यापैकी श्री. भारत जगताप यांचे वगळता इतर १४ अधिकारी/कर्मचाऱ्यांचा शैक्षणिक अर्हता पडताळणी अहवाल प्राप्त झालेला आहे.

सबब, श्री. भारत जगताप यांना कार्यालयीन नोटीस क्र. मनपा/आस्था/११२६/२०१२-१३ दि.१२/१२/२०१२ अन्वये शैक्षणिक अर्हता मूळ गुणपत्रिका व प्रमाणपत्र ७ दिवसाचे आत दाखल करणेबाबत लेखी कळविण्यात आलेले आहे. अन्यथा आपले दि.११/०७/२००३ रोजीचे मूळ नियुक्तीचे आदेश रद्द करुन

सेवेतून कमी करण्यात येईल असे कळविण्यात आले होते. तरी सुद्धा श्री. भारत जगताप यांनी शैक्षणिक अर्हता मूळ गुणपत्रिका व प्रमाणपत्र दाखल केलेले नाहीत.

सर जे.जे. रुग्णालय, मुंबई वैद्यकीय मंडळाचे दि.२०/१२/२०१२ रोजीच्या प्रमाणपत्रानुसार श्री.भारत जगताप हे पुढील सेवा करणेस पुर्णपणे व कायमस्वरुपी अपात्र असल्याचे कळविले आहे.

सबब, श्री. भारत जगताप, सहाय्यक नगररचनाकार यांची सहाय्यक तथा बिल्डिंग इनस्पेक्टर या पदावर दि.११/०७/२००३ रोजीच्या आदेशान्वये केलेली नियुक्ती रद्द करुन कार्यालयाचे क्र.मनपा/आस्था/१२०७/२०१२-१३ दि.२९/१२/२०१२ रोजीच्या आदेशान्वये श्री. भारत जगताप यांना महानगरपालिका सेवेतून तात्काळ बडतर्फ/सेवेतून कमी करण्यात आले आहे.

श्री. भारत जगताप, सहाय्यक नगररचनाकार यांची वेतनश्रेणी ही सहाय्यक आयुक्त पदाच्या वेतन श्रेणीशी समान असल्यामुळे नियुक्ती प्राधिकरण म्हणून मा. सर्वसाधारण महासभेची आवश्यकता आहे.

तरी वर नमूद केलेल्या कारणास्तव श्री. भारत जगताप यांना सेवेतून कमी करणे/बडतर्फ करणे दि.२९/१२/२०१२ रोजीच्या आदेशानुसार केलेल्या कारवाईस ही सभा मंजूरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही प्रशासनाला दरवेळी सांगत असतो की, आम्हाला खरी माहिती देत जा. मी काँग्रेस पक्षामध्ये होतो त्यावेळी माझ्याच हस्ते हा ठराव मांडला गेला होता. म्हणजे आता मी त्याला विरोध करु शकत नाही. पण प्रशासनाने जे दिलेले असते, त्यावेळी नवीन निवडून आलो. २००२ ला इलेक्शन झाले. २००३ ला मला वाचायला दिले. मी वाचले. काही डिटेल माहिती नव्हती. अनेकदा अजून होऊ शकते की, प्रशासनाने ही माहिती खरी दिली पाहिजे. आपण जी कारवाई केली ती योग्य आहे. त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. ठराव झालेला आहे. याच्यामध्ये प्रशासनाची काही चूक नाही का? मागच्या वेळी आपण अनेक नवीन भरती केल्या. त्यामध्ये मा. उपायुक्तांवर गुन्हा दाखल झाला. मा. आयुक्तांवर गुन्हा दाखल झाला. बोगस कागदपत्रे, म्हणजे एकाचे पटणाने सर्टिफिकेट. मला वाटते तो पी.आर.ओ. साठी होता. फायरमध्ये ड्रायव्हींग लायसन्स बोगस आहे. हे सगळे आहे. अजून तो दावा मा. सचिवांकडे चालू आहे. भविष्यात हे सगळे आम्ही भोगायचे का? आणि आपण आता हे खात्रीने सांगा की, यापूढे या मिरा भाईंदरमध्ये जेवढे अधिकारी काम करतात त्या सर्वांची जात पडताळणी झालेल्या आहेत का? ही ग्वाही कोण देणार? हमी कोण देणार की, यापूढे असे अधिकारी नाहीत? साहेब, आपण अनेकदा वेगवेगळ्या कारणाने, वेगवेगळ्या पध्दतीने नेमणुका करत असतो. मधल्या काळाच याच अधिकाऱ्याच्या संदर्भात मा. सुप्रिम कोर्टाची जजमेंट आहे की, ज्या बॅकडोअर एन्ट्री असतात. पण एखाद्या विशेष महापालिकेसाठी आपण जातो. पण तो सुप्रिम कोर्टाचा आदेश आपल्या महापालिकेला लागू होत नाही का? मग त्या बॅकडोअर एन्ट्री आपण का कमी केल्या नाहीत? मग थोड्या वेळानंतर परत कोणतरी यायचे, असाच ठराव आणायचा की, हे आले आहे म्हणून त्यांना बडतर्फ करा किंवा कमी करा. याबद्दल आपण पूर्ण माहिती घ्या. या बॅकडोअर एन्ट्रीचे सुप्रीम कोर्टाचे जजमेंट आहे की आपल्याला बॅकडोअर एन्ट्रीचे घेता येणार नाही. प्रोसेस फॉलो केल्याशिवाय त्यांना पदावर घेता येणार नाही. आपल्याला खास विनंती आहे की, जेवढे अधिकारी असतील, त्या सर्वांची आपण जात पडताळणी करा. आणि जे सुप्रीम कोर्टाचे गाईडलाईन आहेत त्याप्रमाणे कारवाई करा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर मॅडम, आता हे श्री. भरत जगताप यांचा निर्णय घेतला. उशिरा का होईना योग्य निर्णय घेण्यात आला. पण मी विचारतो की, आता सध्या आपल्या महानगरपालिकेत जे सगळे कर्मचारी किंवा अधिकारी कार्यरत आहेत. प्रत्येकाची कागदपत्रे अर्हता छाननी करण्यात आलेले आहेत का? पडताळणी झालेली आहे का?

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य, आपण कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची पात्रता किंवा त्यांचे प्रमाणपत्र, विशेष पथकामार्फत किंवा विशेष मोहिम आपण राबवलेली नाही. परंतु, गेल्या मा. स्थायी समिती सभेमध्ये एका कार्यवाहीसाठी मान्यता घेतलेली आहे की, सर्व सेवापुस्तके पडताळणी करण्यात येतील. त्याच्यामध्ये त्यांची कागदपत्रे पडताळणी करणे उचीत होईल.

**मदन उदितनारायण सिंह :-**

माझ्या माहितीप्रमाणे बऱ्याच कर्मचाऱ्यांची पडताळणी केलेली नाही. एका कर्मचाऱ्यांची अर्हता नसताना त्याला कामावर घेतलेले आहे.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मी कार्यालयामधून माहिती घेतो.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपल्याला तक्रारीमुळे माहिती झाले. तेव्हा याच्यावर कार्यवाही करावी असे वाटले नाही का?

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

याबाबतीत कार्यवाही करण्यांत येईल.

**प्रभात पाटील :-**

आता आपण पंधरा कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पडताळणी करायला पाठवली होती. आणि त्याचा अहवाल प्राप्त झाला. आपल्याकडे पंधराच कर्मचारी आहेत का? आपला जो संपूर्ण विभाग आहे, आरोग्यापासून नगररचना, संगणक विभाग, बांधकाम विभाग इथे टेक्निशिअनची गरज आहे. तिथे तुम्हाला बी.ए. आणि बी.कॉम घेऊन चालणार नाही. मग तुम्ही तिथे ह्या सगळ्या पडताळणी का करत नाहीत? मी मागच्या वेळेला सुध्दा एका पत्रान्वये कळवले होते की, तुम्ही या, म्हणूनच मी मागे जेव्हा गेल्या महिन्यामध्ये सेवाभरतीचा विषय आला तेव्हा म्हटले होते की, तुम्ही टेक्नीकल बाबी, तिथे डॉक्टरची गरज असताना एखादा बी.ए. बी.कॉम नेऊन ठेवला. आणि त्याला इंजेक्शन मारायला दिले. तो इंजेक्शन मारण्यापर्यंत काम करेल. पण जेव्हा एखाद्याचा प्राण वाचवण्याची वेळ असेल तेव्हा तो काय करेल? तेव्हा हे मुद्दे लक्षात घेऊन आपल्याला त्यांची पडताळणी केली पाहिजे. ठिक आहे, बी.ए., बी.कॉम आहे. आपण विद्यापिठाकडून तो बी.ए. आहे हे परिक्षण करुन आणले. पण तो बी.ए. असलेला माणूस कोणत्या फील्डमध्ये काम करतो. तो टेक्नीकलला काम करतो का? टेक्नीकलला त्याची गरजच नाही. तिथे त्याचे कामच नाही. आणि म्हणून या ज्या पंधरा पडताळणी केल्या. त्यापैकी तुमच्या चौदा बरोबर आल्या. माझी तुम्हाला हीच विनंती आहे की, आज आपण हा दोन ओळींचा ठराव मांडला आणि त्यांच्या बडतर्फीवर शिक्कामोर्तब केले. जर हा विषय बाहेर जाईल, हा इतकासा दोन ओळींचा विषय नाही की, तो माणूस २००३ पासून आपल्याकडे काम करत आहे. आणि आपण त्याला चालवून घेतले. तो आपल्याकडे चालला. आपल्या मनाचा मोठेपणा की, आपण कधी अधिकाऱ्यांना त्रास देत नाही. मला असे वाटते की, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ही एक अशी महानगरपालिका असेल की, आपण अधिकाऱ्यांच्या खूपच फेवरने चालतो. आणि चालले पाहिजे. कारण इथे आपले सगळ्यांशी घरोब्याचे संबंध आहेत. परंतु याचा अर्थ कोणाच्या जिवीताशी खेळणे असा होत नाही. २००३ पासून आजपर्यंत ते आपल्याला चालले. त्यांनी या पालिकेमध्ये चांगले काम केले. सगळ्या गोष्टी खऱ्या आहेत. परंतु बाहेर मॅसेज जाताना काय जाईल की, ही महापालिका अशाच लोकांची नेमणुका करते. आणि त्यांच्याकडून काम करुन घेते का? हा मॅसेज फार चुकीचा जाणार आहे. हे कुठेतरी थांबले पाहिजे. म्हणून माझी आस्थापनेला व मा. आयुक्तांना विनंती राहील की, पहिल्यांदा आपले प्रशासन स्वच्छ करा. आपले प्रशासन स्वच्छ झाले पाहिजे. यांच्या सगळ्यांच्या पदव्या, डिप्लोमा, डिग्री ज्या असतील त्या पडताळणी करा. त्यांना काढून टाका असे म्हणणे नाही. परंतु त्या-त्या पदावर तो-तो योग्यतेचा माणूस बसवा. आपल्याला सगळ्यांच्या सहकार्याने काम करायचे आहे. त्याच्यामुळे तुमच्यावर आक्षेप नको आणि आम्ही काहीतरी खपवून घेतो म्हणून आमच्यावरही आरोप नको. एवढीच माझी विनंती आहे.

**राजेंद्र जैन :-**

श्री. भरत जगताप साहब को टर्मिनेट करने की बात कर रहे है। उसमे सिर्फ इतना जानना चाहता हूँ की, जब यह पाया गया की, एक अधिकारी चिटींग करके और उसको चिटींग में कोऑपरेट करनेवाले अधिकारी जिसने नियुक्ती दी, उन दोनो के खिलाफ क्रिमीनल मामला नता है या नही? और उनको आपने कबसे सस्पेंड किया? अब तक प्रशासनने कोई ॲक्शन लिया है क्या की, उसपर क्रिमीनल कॉन्सीरसी का एफ.आय.आर. किया जाए? मुझे इसकी जानकारी चाहिए। जो आदमी अपात्र था। जिसने इतने साल काम किया, क्या उसकी स्क्रुटीनी करने का हमारा दायीत्व नहीं बनता है?

**मर्लिन डिसा :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते. मी पण एक शाळा आणि ज्युनिअर कॉलेजची मुख्याध्यापिका आहे. मला प्रत्येक आठवड्याला व्हेरिफिकेशनसाठी सर्टिफिकेट येतात. तर अशी व्हेरिफिकेशन आपण इथून पाठवत नाहीत का? इट्स अ गव्हर्नमेंट ऑरगनायझेशन ॲन्ड वी आर रिस्पॉन्सीबल पीपल हीअर. सो, व्हेन वी अपॉइंट ॲन्ड रिक्रुट द पीपल, उनका पुरा सर्टिफिकेट अपॉइंटमेंट से इमिजिएट पहले उनका व्हेरिफिकेशन हो जाएगा। तो इट विल सेव सो मच ऑफ ट्रबल. उसमें पब्लीक का पैसा जा रहा है। वो लोग फेक सर्टिफीकेटस् देकर सॅलरी ले रहे है। इट्स अ वेस्ट ऑफ पब्लीक मनी.

**मा. महापौर :-**

हा ठराव मी सर्वानुमते मंजुर करत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

मा. महापौर मॅडम, मैं अधिकारी के विषय में थोडा बोलना चाहूँगी। कही अधिकारी ऐसे है, जब हम लोग वॉर्ड का काम लेकर जाते है, या कुछ समस्या लेकर जाते है, तो ऐसे जवाब देते है, जैसे वह नगरपालिका के मालिक है। और हम लोग उनके सामने नौकर बनकर जा रहे है। तो हम लोगो को ऐसा जवाब मिलता है। तो यह उचित है क्या? या फिर हर छोटी-छोटी समस्या हम लोग आपके पास लेकर आते है। तो आप उनको थोडा यह बताइए की, वह कौन सी जगह पर बैठे है। नगरपालिका से वह सॅलरी ले रहे है। मेरी रिक्वेस्ट है की, आप उनको उनकी जगह क्या है वो बताइए। आपके पास छोटी-छोटी समस्या

डायरेक्ट लेकर आने के लिए आप परमिशन देते हो क्या? यह शिकायत मेरी नही, मेरे काफी नए नगरसेवकों की भी है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, विषय जरा सिरिअस है। आप ध्यान रखीए। और अगर कोई अधिकार ऐसा करता है, तो यह गलत बात है। यह सब प्रतिष्ठित और सन्मानित लोग है। लोगो ने इनको चुनकर दिया है। तो ऐसे दुबारा नहीं होना चाहिए। आप आपके सभी कर्मचारीयों को ताकिद दिजिए।

**निलम ढवण :-**

मॅडम, आता सन्मा. नगरसेवकांनी अधिकाऱ्यांबद्दल सांगितले आहे. पण माझ्यासारखेच सगळ्या सन्मा. नगरसेवकांचे म्हणणे असेल की, जेव्हा-जेव्हा वॉर्डमध्ये काम करतो. त्या-त्या वेळी, इथे आम्हाला सभागृहामध्ये सन्माननिय मानले जाते. परंतु, त्या-त्या वॉर्डची जेव्हा कामे घेतली जातात. तेव्हा त्या ठेकेदारांची उत्तर किंवा ठेकेरादासंदर्भात आम्ही अधिकाऱ्यांना कम्प्लेंट दिल्या तर आमची जी कामे असतात, आज सहा महिने होत आले. अशी बरीचशी शुल्लक कामे आहेत की, गटारांवरचे झाकण म्हणा किंवा जे होल पडलेले आहेत. आता मागच्याच पेपरमध्ये, मिरारोडची एक मुलगी गटारात पडून मेली. यापूर्वी इंद्रलोकला अशी घटना घडलेली आहे. माझ्याच वॉर्डमध्ये अशी दोन गटारे आहेत आणि त्याचे होल भरण्यासाठी आज चार-पाच महिने मी सतत मागे आहे. परंतु, उद्या येतो, परवा येतो असे करुन हे ठेकेदार देखील त्यांच्यावर दुर्लक्ष करत आहेत. तर यापुढे देखील त्यांच्यावर कारवाई करा.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेबांना मी सांगते.

**निलम ढवण :-**

कोणावर एकावर कारवाई झाल्याशिवाय, आम्हाला जर खरोखर सन्माननीय म्हणून मानत असतील तर तिथे त्यांचा आदर झाला पाहिजे आणि त्यांनी कम्प्लेंट दिल्यानंतर त्याची कार्यवाही ताबडतोब झाली पाहिजे.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांचे असे म्हणणे आहे की, प्रशिक्षणासाठी नगरसेवकांना पण गरज आहे असे मला वाटते.

**मा. महापौर :-**

आपल्या इथे ऑलरेडी प्रशिक्षण झालेले आहे.

**वंदना चक्रे :-**

सध्या सभागृहामध्ये नवीन मा. आयुक्त साहेब पण आहेत. तर आमची अशी सुचना आहे की कायद्यात ती तरतुद आहे.

**मा. महापौर :-**

चक्रे मॅडम, माझ्यापण लक्षात आहे. परंतु, तेव्हा मा. आयुक्त श्री. विक्रम कुमार साहेब होते. त्यांना मी सांगितलेले, तर ते बोलले की, थोडा फंडचा प्रॉब्लेम आहे. ते होऊ द्या. मग आपण प्रशिक्षणाला घेऊन जाऊ.

**प्रकरण क्र. ५० :-**

श्री. भारत जगताप, सहाय्यक नगररचनाकार यांना महानगरपालिका सेवेतून कमी/बडतर्फ करणेबाबत.

**ठराव क्र. ५८ :-**

सहाय्यक नगररचनाकार श्री. भारत जगताप यांची कार्यालयीन आदेश क्र. मनपा/आस्था/४४०/२९८८/२००३-०४ दि.११/०७/२००३ रोजीच्या आदेशांन्वये सरळ सेवा निवडीद्वारे सहाय्यक तथा बिल्डिंग इन्स्पेक्टर या पदावर नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था/१५२३/१८२०/२००६-०७ दि.०२/१२/२००६ अन्वये श्री. भारत जगताप यांना सहाय्यक नगररचनाकार या पदावर पदोन्नती देण्यात आली.

सहाय्यक तथा बिल्डिंग इन्स्पेक्टर या पदावर सरळ सेवेने नियुक्ती होण्यासाठी उमेदवाराची किमान शैक्षणिक अर्हता ही महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातील ३ वर्षाची पदवीका/पदवी उत्तीर्ण आवश्यक होती आणि त्या पृष्ठर्थ श्री. भारत जगताप यांनी ३ वर्षाची पदवीका उत्तीर्ण झाल्याबाबत गुणपत्रिकेची छायांकित प्रत सादर केली होती.

दि.०५/०५/२००३ रोजीच्या मुलाखतीच्या पत्रामध्ये मुद्दा क्र.२ अन्वये शैक्षणिक पात्रतेबाबत मूळ दाखला आणणेबाबत नमूद करण्यात आलेले आहे आणि तसेच दि.११/०७/२००३ रोजीच्या नियुक्ती आदेशातील अट क्र.३ अन्वये शैक्षणिक अर्हतेची मूळ प्रमाणपत्रे दाखल करण्याचे बंधनकारक असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. त्यानंतर श्री. भारत जगताप यांना दि.२८/०१/२०१० रोजीच्या पत्रांन्वये कागदपत्र/प्रमाणपत्राच्या मूळप्रती मागणी करण्यात आली होती असे दि.०१/०२/२०१० रोजीच्या श्री. भारत जगताप यांचे प्राप्त लेखी निवेदनावरुन दिसून येते.

शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र पडताळणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना दि.०६/०६/२०१२ रोजीच्या लेखी पत्राद्वारे लेखी कळविण्यात आले होते, परंतु कार्यरत १५ अधिकारी/कर्मचारी

यांच्यापैकी श्री. भारत जगताप यांचे वगळता इतर १४ अधिकारी/कर्मचाऱ्यांचा शैक्षणिक अर्हता पडताळणी अहवाल प्राप्त झालेला आहे.

सबब, श्री. भारत जगताप यांना कार्यालयीन नोटीस क्र. मनपा/आस्था/११२६/२०१२-१३ दि.१२/१२/२०१२ अन्वये शैक्षणिक अर्हता मूळ गुणपत्रिका व प्रमाणपत्र ७ दिवसाचे आत दाखल करणेबाबत लेखी कळविण्यात आलेले आहे. अन्यथा आपले दि.११/०७/२००३ रोजीचे मूळ नियुक्तीचे आदेश रद्द करुन सेवेतून कमी करण्यात येईल असे कळविण्यात आले होते. तरी सुद्धा श्री. भारत जगताप यांनी शैक्षणिक अर्हता मूळ गुणपत्रिका व प्रमाणपत्र दाखल केलेले नाहीत.

सर जे.जे. रुग्णालय, मुंबई वैद्यकीय मंडळाचे दि.२०/१२/२०१२ रोजीच्या प्रमाणपत्रानुसार श्री.भारत जगताप हे पुढील सेवा करणेस पुर्णपणे व कायमस्वरुपी अपात्र असल्याचे कळविले आहे.

सबब, श्री. भारत जगताप, सहाय्यक नगररचनाकार यांची सहाय्यक तथा बिल्डिंग इनस्पेक्टर या पदावर दि.११/०७/२००३ रोजीच्या आदेशान्वये केलेली नियुक्ती रद्द करुन कार्यालयाचे क्र.मनपा/आस्था/१२०७/२०१२-१३ दि.२९/१२/२०१२ रोजीच्या आदेशान्वये श्री. भारत जगताप यांना महानगरपालिका सेवेतून तात्काळ बडतर्फ/सेवेतून कमी करण्यात आले आहे.

श्री. भारत जगताप, सहाय्यक नगररचनाकार यांची वेतनश्रेणी ही सहाय्यक आयुक्त पदाच्या वेतन श्रेणीशी समान असल्यामुळे नियुक्ती प्राधिकरण म्हणून मा. सर्वसाधारण महासभेची आवश्यकता आहे.
तरी वर नमूद केलेल्या कारणास्तव श्री. भारत जगताप यांना सेवेतून कमी करणे/बडतर्फ करणे दि.२९/१२/२०१२ रोजीच्या आदेशानुसार केलेल्या कारवाईस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील      अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठरा वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५१, महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकाम यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्राकरीता पोलीस पथक निर्माण करणे व पोलीस स्टेशन स्थापन करणेबाबत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, आपण जो गोषवारा दिलेला आहे, त्यामध्ये आपण आर्थिक व प्रशासकीय मान्यता मागितलेली आहे. यामध्ये आपण असुधारीत वेतनश्रेणी म्हटलेले आहे. आता ही असुधारितची व्याख्या काय आहे?

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर मॅडम आणि सन्मा. सदस्य, ते पोलिस विभागाचे, गृह विभागामार्फत जी पदे मंजुर झालेली आहेत, त्यातील सहाव्या वेतन आयोगानुसार त्यांच्याकडील पदाच्या ज्या वेतनश्रेणी आहेत, त्या अजून सुधारीत केलेल्या नाहीत. त्यामुळे ते असुधारीत दिलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मग आम्ही आर्थिक व प्रशासकीय मान्यता कोणाला द्यायची? असुधारीतला मान्यता देता येते का? असे होते का?

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

त्याबद्दल मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो. मागे हा प्रस्ताव याच सभागृहाने मान्यता करुन शासनाला शिफारस केलेली आहे. त्याच्यामध्ये वेगवेगळ्या महापालिकांचे जे ठराव आले होते, त्याच्यामध्ये वाक्यरचना एकसुत्रता नव्हती. त्यामुळे शासनाने हा ठरावाचा मसुदा परत करुन सर्व महापालिकांना कळवला आहे. तो सुधारीत सबमीट करायला सांगितला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, दे डोन्ट नो वॉट द सॅलरी. वी हॅव टू पे. आपण मान्यता म्हणजे आपण एक कायदाच करतो.

**मा. महापौर :-**

तुम्ही ठराव ऐका नंतर बोला.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही ठराव करणार, आम्हाला मान्य ते नाही. मा. आयुक्त महोदयांच्या नजरेत एक हा भाग झाला. दुसरे यामध्ये मा. आयुक्त महोदय, हे डेप्युटेशनवर येणार. आपण जे मान्यता करणार, ती पदनिर्मिती शासन करणार, इकडे डेप्युटेशनवर येणार, त्यांना आपण सॅलरी पे करणार. आता हे परमनन्ट असतील की, तीन तीन वर्षांनी ट्रान्सफरवर असतील? मा. आयुक्त महोदय, हे परमनन्ट असतील तर त्यांना पेंन्शनपासून सगळे

आम्हाला द्यावे लागेल. त्यांची पेन्शन कोण देणार? रिटायर झाल्यानंतर हे सगळे कोण करणार? महापालिकेने करायचे आहे का? मा. आयुक्त महोदय, आपण या गोषवाऱ्यात म्हटले आहे की, आमचा खर्च ३२ टक्के खरे म्हणजे पूर्ण देशात आपल्या महापालिकेचे कौतुक केले पाहिजे. ३२ टक्के कोणाचेच नाही. आपण ही खोटी माहिती का देता? मागच्या वेळी श्री. विक्रम कुमार होते. ते बोलले की, आम्ही माहिती मागवली आहे. तुम्ही मागवली नाही. पण आम्ही शासनाकडून जी.आर. मागवलेले आहेत. तुम्ही जे काही ठेका पध्दतीने कामकाज देता, दॅट अल्सो द पार्ट ऑफ ॲडमिनिस्ट्रेटर. म्हणजे आता तुमचा खर्च किती आहे? त्या गोष्टी आम्ही आणायच्या. आता ऑडीटर किंवा श्री. बेलवटे साहेबांना काही समजत नाही का? दरवेळी चुकीची माहिती आमचा खर्च ३२ टक्के आहे का? वी हॅव द एक्सपेन्स मोर दॅन ४२ टक्के. इकडे ३२ टक्के दिलेले आहे. आणि शासनाचा जी.आर. आहे की, तुम्ही जो काही खर्च, भाडेवाढ, याच्यावर करता तो सगळा आस्थापना खर्च आहे. मागच्या वेळी पण आमची दिशाभूल केलेली की, आम्ही माहिती मागवतो. भरतीबाबत होती की, तुम्ही एखादी नवीन भरती करु नका जोपर्यंत तुमचा खर्च होत नाही. तुमचे भरती करायचे चालू आहे. आणि चुकीची माहिती देऊन आता तुमचे म्हणणे आहे की, ठरावात ही चुकीची माहिती आहे. त्यांनाही माहिती आहे, मलाही माहिती आहे. आम्ही निर्णय घेतो. नंतर माहिती पडते की, ही सगळी गडबड आहे. अधिकाऱ्यांनाही सभागृहाला माहिती, तुम्हाला काय वाटते, हे कितीपर्यंत सिरिअसनेस आहेत? असेच देऊन काम करुन घ्यायचे का? आता अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करायला नको? हा जी.आर. गव्हर्नमेंटकडून आम्ही आणला. त्यावेळी आम्ही अनेकदा सांगितले. ते बोलले की, आम्ही माहिती घेऊ. त्यांची भरती चालू आहे. खर्च वाढला तरी भरती चालू आहेत. आज आपला खर्च ४२ टक्के वर गेला आहे. आताही ३२ टक्के दाखवून तुम्ही आमची मान्यता घेता. आम्ही ठराव केला की, ३२ टक्के आहे म्हणून आम्ही मान्य करतो. मग ३३ टक्के झाला तर काय करणार? अपॉईन्ट करणार नाही? तुम्ही खरी माहिती द्या. आम्हालाही विकास पाहिजे. आम्हालाही पोलिस दल पाहिजे. आम्ही देऊ. पण लपून का? मग एखाद्याने चॅलेंज केले की, ही चुकीची माहिती आहे, मग ठराव रखडायचा. मॅडम, दरवेळी याप्रकारे अधिकाऱ्यांनी सभागृहात, म्हणजे हे सर्वोच्च स्थान, त्याला चुकीची माहिती देणार. आता जे श्रीम. वर्षा भानुशाली मॅडमनी सांगितले की, आपण सन्माननीय बोलतो. आम्हाला काही खोटे दाखवून खोटे बोलून करतो. आम्ही महापालिकेचे ऑडीट करायचे का? अधिकारी जे सांगतात, त्याच्यावर आम्ही विश्वास ठेवत असतो. मग शेवटी बोलतात हे झाले. ज्या भरती आता केल्या त्या ३२ टक्केच्या वर होत्या. तुम्ही ते कमी करणार आहात का? तुम्ही ३२ टक्के दाखवता. भरती करुन घेता. मागच्या वेळी माझा तसा प्रश्नाचा तास होता. श्री. विक्रम कुमार यांनी सांगितले की, आपले ३२ टक्के आहे. जो कॉन्ट्रॅक्टवर आहे तो येत नाही. मी या भाषेत सांगितले की, जर श्री. नरेंद्र मेहता यांनी भाड्यावर गाडी घेतली तर ॲडमिनिस्ट्रेशन एक्सपेन्स नाही. महापालिकेची घेतली, तर ॲडमिनिस्ट्रेशन एक्सपेन्स. म्हणून हा त्याचा जी.आर. आहे. मग याच्यावर खोटी माहिती का दिली ते आम्हाला क्लीअर करावे. त्यांना माहिती नाही का? समजा श्री. बेलवटे साहेबांना हे माहिती नाही की, इट इज पार्ट ऑफ ॲडमिन. तर ते त्या स्थानावर असले पाहिजे का? खरे म्हणजे श्री. जगताप बरोबर त्यांचेही झाले पाहिजे. बिकॉज ते पण २००८ चे जे मंजूर झाले नाही. २००५ चे आपल्या महापालिकेत इम्प्लीमेंट, २००८ प्रमाणे. आपण त्यांना प्रमोशन दिलेले आहे. मग असेच होणार आहे. तुम्ही एखाद्या माहिती नसलेल्या व्यक्तीला प्रमोशन देणार. याप्रकारे असेच होत जाणार आहे. याच्यावर आपण काय कार्यवाही करणार?

**मा. महापौर :-**

ठराव वाचा.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, बिकॉज इट इज फ्रॉम यूवर सिग्नेचर. म्हणजे तुम्ही याला मान्य करत आहात. म्हणजे तुम्हालाही विश्वासात घेतले असे याचे मिनींग आहे का? सभागृहाला चुकीची माहिती देणे याचे खूप मोठे गांभीर्य आहे. तुम्ही असेच इझी घेऊ नका.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

याच्यामध्ये दोन विषय आहेत. आस्थापना खर्चाबाबत विवरणपत्र तयार करणे. त्यासाठी ठरवलेले शासन निकष. आणि आस्थापनाच्या खर्चाची टक्केवारी कधी विचारात घ्यायची आहे, पद मंजुर करताना की, रिक्त पदावर नियुक्ती करताना हा विषय वेगळा आहे. आता अजेंड्यावर जो विषय आहे, तो पोलिस ठाण्यासाठी जी पदे प्रतिनियुक्तीवर भरायची आहेत, किंवा शासन प्रतिनियुक्तीवर पाठवणार आहे. त्यासाठी प्रस्तावित आहे. तर यासाठी जो प्रस्ताव यापूर्वी सभागृहाने ......................

**नरेंद्र मेहता :-**

आम्हाला माहिती आहे. आम्ही बोलतो की, तुम्ही याच्यात ३२ टक्के खोटे का म्हटले आहे? तुम्ही ४२ टक्के का म्हटले नाही?

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

त्याच्यामध्ये मी पुनःश्च निवेदन करु इच्छितो की, त्याच्यामध्ये सभागृहाला किंवा कोणालाही खोटी माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. किंवा हेतू नाही. तर ते जे विवरणपत्र तयार केलेले आहे ते शासनाच्या

नगरविकास विभागाने ठरवून दिलेल्या निकषानुसार तयार केलेले आहे. त्याच्यामध्ये कोणत्या बाबी समाविष्ट कराव्या ................

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही ते बोलत नाही. ३२ टक्के का म्हटले आहे तेवढेच सांगा. शासनाने केले तर आम्ही पोलिसांचे मान्य करणार. आम्हालाही या महापालिकेसाठी पाहिजे.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मी त्या टक्केवारीच्या विवरणपत्राबद्दल बोलतो आहे. टक्केवारीचे जे विवरणपत्र तयार केलेले आहे, शासनाने ज्या परिपत्रकामध्ये किंवा शासन निर्णयामध्ये ज्या बाबी खर्चामध्ये समाविष्ट कराव्यात हे नमूद केलेले आहे. ते नमुद करुनच विवरणपत्र तयार केलेले आहे. आपल्याला जर शंका वाटत असेल की, ते विवरणपत्र चुकीचे आहे. त्या विवरणपत्राची प्रत आपल्याला व मॅडमनापण देतो. त्याच्यामध्ये कोणती बाब समाविष्ट करायला पाहिजे किंवा ही जी पुर्नःनिश्चिती आपण सुचविल्यास त्याच्यात कोणती बाब चुकीची आहे हे आपण मा. मुख्य लेखापरिक्षक जे आहेत, त्यांच्याकडून तपासून घेऊ किंवा त्रयस्थ एजन्सीकडून तपासून घेऊ. त्याच्यामध्ये कोणतीही खोटी माहिती देण्याचा काही प्रश्न उद्‌भवत नाही.

**मा. महापौर :-**

श्री. ढगे साहेब, तुम्ही आता बसा.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आपण जी वेतनश्रेणी दिली आहे ती, अॅज ऑन अपॉइन्टींग टूडेची दिलेली आहे. एखादा व्यक्ती डेप्युटेशनवर आला असेल, तो दहा वर्षापासून त्या पोलिस डिपार्टमेंटला कामाला असेल, त्याची सॅलरी ही नसणार. त्याचे प्रमोशन होऊन तो त्या सॅलरीला. मग आपण त्याला मान्यता देतो की, याच सॅलरीला मान्यता देतो आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही काय ठराव मांडतो ते बघून तर घ्या.

**मा. महापौर :-**

आता तुम्ही दोन मिनिटे बसा. त्यांना ठराव वाचू द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नागरी पोलीस ठाण्यासाठी मंजूर व निर्माण करण्यात येणाऱ्या पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्त्याचा खर्च शासनाकडे आगाऊ जमा करणेबाबत शासनाचे प्रारुप मसुदा ठरावामध्ये नमुद करण्यात आले आहे. तरी वेतन व भत्त्यावर दरमहा ढोबळ व अंदाजे किती खर्च अपेक्षीत आहे. याची परिगनणा करुन तसेच नियुक्त करण्यात येणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कामकाजावर महानगरपालिकेचे प्रशासकीय नियंत्रणावर शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात यावे. तद्‌नंतर सदरचा विषय मा. महासभेस फेर सादर करण्यात यावा.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

मॅडम, मला एवढेच म्हणायचे आहे की, आपले लेखापरिक्षक इथे आहेत. तर त्यांनी हा जो वेतनश्रेणीसह आलेख आपल्यापुढे मांडला आहे. साहेब, सध्या तुम्ही कर्मचारी आहात. मी पण एका शाळेमध्ये कर्मचारी आहे. सध्या सगळीकडे सहावे वेतन आयोग लागू आहे. आणि मला असे वाटते की, ही वेतनश्रेणी पाचव्या वेतन आयोगाची आहे. मग जेव्हा लागू होणार तेव्हा आपण त्यांना सहावे वेतन लागू करणार का? आता दिलेली वेतनश्रेणी पाचव्या वेतन आयोगाची आहे.

**मा. महापौर :-**

आपण त्यांना आज मंजुरी देत नाही. आपण रितसर माहिती मागवलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपण जे बोलता, आम्ही अभिनंदन करतो. पण माझे फक्त एवढेच म्हणणे आहे की, प्रशासनाने आपल्याला खुलासा करायला पाहिजे. हे असे आहे. मग परत पाठवायची आवश्यकता नव्हती. ते यासाठी यावे लागेल.

**प्रशांत दळवी :-**

मॅडम, म्हणजे अधिकारी आपली दिशाभूल करत आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम, जेवढ्या त्रुट्या आहेत त्याची मागणी करु.

**मा. महापौर :-**

सर्वांनी खाली बसा. मा. आयुक्त साहेब बोलत आहेत.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. विरोधी पक्षनेत्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, ही पदे कायमस्वरुपी आपल्या महानगरपालिका आस्थापनेवर असतील का? आणि त्यांच्या पेन्शनचा बोजासुध्दा आपल्यावर पडेल का? हा एक भाग. आणि दुसरा भाग याच्यामध्ये जी वेतनश्रेणी दिलेली आहे, त्या वेतनश्रेणीप्रमाणे. जर त्या वेतनश्रेणीमधील एखादा सिनिअर माणूस आला तर तोसुध्दा बोजा आपल्यावर पडेल का? याबाबत मी असे स्पष्ट करु इच्छितो की, ही जी पदे आहेत ती गृह विभागाच्या म्हणजे पोलिस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर निर्माण होणार आहेत. ती आपल्याकडे दोन वर्षे, तीन वर्षे किंवा शासन जे ठरवेल त्या कालावधीपर्यंत आपल्याकडे राहिल. या ग्रेडमध्ये हे पाचव्या वेतनश्रेणीमधल ग्रेड आहे. परंतु जेव्हा हे सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत होईल त्या वेतनाप्रमाणेच आणि एखादा अधिकारी जर समजा आठ वर्षे सेवा करुन आपल्याकडे आलेला असेल तर त्याचा पे प्रोटेक्ट होईल. तो पे आपल्याला या वेतनश्रेणीप्रमाणे या वेतनश्रेणीमधील जो टप्पा असेल त्या टप्प्याप्रमाणे आपल्याला त्याला पेमेंट करावे लागेल. आणि गृह विभागाने किंवा पोलीस आयुक्तालयाने सुधारीत वेतनश्रेणी का केली नाही किंवा का दिली नाही. कारण हा ठरावाचा मसुदा शासनाकडून आपल्याकडे आलेला आहे कदाचित त्यांच्या वेतनश्रेणीमध्ये अद्याप सुधारणा व्हायची असेल. म्हणून त्यांनी आपल्याला असुधारीत असा शब्दप्रयोग केलेला आहे. तो आता मा. सभागृह नेता महोदयांनी असा प्रस्ताव केलेला आहे की, यामध्ये काही विषयांबाबत शासनाकडून खुलासा मागवावा. त्याबद्दल सभागृहाने निर्णय घेऊन आम्हाला उचित आदेश द्यावे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एक विनंती आहे की, आपण ह्या सगळ्या लोकांच्या सोयीसाठी कामे करतो. आपण जाहिरात आणि परवाना विभाग रामनगरला नेला.

**मा. महापौर :-**

ते मी ऑलरेडी सांगितलेले आहे. साहेबांनी पाहणी केलेली आहे. आपण इथेच घेऊन येणार आहोत.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, माझा एक प्रश्न होता की, हे जे पोलिस यंत्रणा आणि या संदर्भात आपण अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामासाठी आणले. तर वर्षभरासाठी किंवा आपण आजपर्यंतचा एका वर्षामध्ये जो खर्च असेल, तो खर्च साधारणतः अंदाजे किती असतो? आणि आता आपण जी पोलिस यंत्रणा राबवणार आहोत किंवा जी वाढ करणार आहोत, तर त्या दृष्टीने आपल्या महानगरपालिकेला हा खर्च परवडणारा आहे का? किंवा काही ठराविक अतिक्रमणे किंवा हे नियम होण्यासाठी आपण एवढ्या पोलिस यंत्रणेचा वर्षभर भार उचलणार आहोत. तर तो महानगरपालिकेला परवडणारा आहे का? आणि दुसरी गोष्ट की, अनधिकृत बांधकामे जी चालू केली जातात. त्यावेळी चालू करतानाच काही लोकांचा वरदहस्त असतो आणि त्यामुळे ती चालू होतात. मग तीच जर चालू केली नाहीत तर पुढे हा जो त्यांचा हटविण्याचा प्रश्न आहे किंवा तोडण्याचा प्रश्न आहे, हा जो पर्ण विषय आहे, तर हे प्रश्न उपस्थित होणारच नाहीत. म्हणजे हा अवास्तव खर्च महानगरपालिकेवर पडतो आहे. तर याच्यावर सुरुवातीलाच जर पायबंद घातला, अतिक्रमणे म्हणा किंवा हे प्रत्येक वॉर्डमधील सन्मा. नगरसेवक इथे आहेतच. मग त्या-त्या वॉर्डमध्ये काय होते याची माहिती त्या-त्या नगरसेवकांना असणारच आहे. मग त्याच वेळी जर त्यांना पायबंद घातला तर हा सगळा अनाठायी होणारा, खर्च हाणार नाही. आणि पालिकेचा तोच खर्च किंवा ते पैसे जर वाचवले तर इतर जनतेच्या विकासासाठी किंवा कोणत्याही गोष्टीसाठी तो पैसा वापरला जाईल. तर याचादेखील अभ्यास करावा आणि नंतरच याविषयी आपण निर्णय घ्यावा.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ५१ :-**

महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकाम यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्राकरीता पोलीस पथक निर्माण करणे व पोलीस स्टेशन स्थापन करणेबाबत.

**ठराव क्र. ५९ :-**

नागरी पोलीस ठाण्यासाठी मंजूर व निर्माण करण्यात येणाऱ्या पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्त्याचा खर्च शासनाकडे आगाऊ जमा करणेबाबत शासनाचे प्रारुप मसुदा ठरावामध्ये नमुद करण्यात आले आहे. तरी वेतन व भत्त्यावर दरमहा ढोबळ व अंदाजे किती खर्च अपेक्षीत आहे. याची परिगनणा करुन तसेच नियुक्त करण्यात येणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कामकाजावर महानगरपालिकेचे प्रशासकीय नियंत्रणावर शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात यावे. तद्‌नंतर सदरचा विषय मा. महासभेस फेर सादर करण्यात यावा.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठरा वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एक शोकप्रस्ताव आहे. मिरा भाईंदर शहरातील सन्मा. नगरसेविका श्रीम. वंदना मंगेश पाटील तसेच शिक्षण समिती सदस्य श्री. मंगेश पाटील यांचे वडील श्री. आत्माराम भाऊराव पाटील, सन्मा. नगरसेवक श्री. शरद केशव पाटील यांच्या मातोश्री श्रीम. मथुरा केशव पाटील व भाईंदर सेकंडरी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. प्रेमा शंकर चित्राव मॅडम यांचे निधन झालेले आहे. तरी हे सभागृह त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असून त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही प्रार्थना.

**सीमा जैन :-**

त्याच्यामध्ये परहित सेवा संघ ट्रस्टचे ट्रस्टी श्री. रामगोपाल शर्मा यांचेही दुःखद निधन झालेले आहे.

**प्रशांत दळवी :-**

शिवसेनेचे जेष्ठ नेते, माजी विधानसभा अध्यक्ष श्री. दत्ताजी नलावडे यांचाही स्वर्गवास झालेला आहे. त्यांचेही नाव याच्यात नमूद करुन घेण्यात यावे.

**प्र. नगरसचिव :-**

कृपया सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभे राहायचे आहे.

**दुःखवटा ठराव क्र. ६० :-**

मिरा भाईंदर शहरातील नगरसेविका श्रीम. वंदना मंगेश पाटील तसेच शिक्षण समिती सदस्य श्री. मंगेश पाटील यांचे वडील श्री. आत्माराम भाऊराव पाटील, नगरसेवक श्री. शरद केशव पाटील यांच्या मातोश्री श्रीम. मथुरा केशव पाटील व भाईंदर सेकंडरी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. प्रेमा शंकर चित्राव मॅडम यांचे निधन झालेले आहे. तरी हे सभागृह त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी असून त्यांच्या आत्म्यास चिरःशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना. तसेच परहित सेवा संघ ट्रस्टचे ट्रस्टी श्री. रामगोपाल शर्मा यांचेही दुःखद निधन झालेले आहे. तसेच शिवसेनेचे जेष्ठ नेते, माजी विधानसभा अध्यक्ष श्री. दत्ताजी नलावडे यांचाही स्वर्गवास झालेला आहे. तरी या सर्वांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठरा वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करते.

**सभा संपल्याची वेळ - दु. २.१० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रकरण क्र. २ दि. १८/४/२०१३

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

## मा. महिला व बालकल्याण समिती

सभा दि. २१/१/२०१३

**प्रकरण क्र.:- महिला व बालकल्याण समितीच्या योजना राबविण्यासाठी महिला व बालकल्याण समितीच्या कामकाजाबाबत अधिकार व कर्तव्य समितीला देणेबाबत.**

**ठराव क्र. ५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महिला बालकल्याण समिती गठीत करण्यात आलेली आहे. मा. महिला व बालकल्याण समिती व्दारे शहरातील महिला व बालकांसाठी शासनाकडून जाहिर झालेल्या अतिमहत्वाच्या विविध योजना राबविल्या जात आहेत. महिला व बालकल्याण समितीव्दारे राबविल्या जाणाऱ्या विविध योजना तसेच उपक्रमासाठी सद्यस्थितीत मा. महासभेपुढे विषय घेऊन प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेण्यात येते. यामुळे एखादया प्रस्तावावर तात्काळ निर्णय घ्यावयाचा असल्यास महिला व बालकल्याण समितीपुढे निर्णय घेता येत नाही तसेच काही योजना, उपक्रमासाठी शासनाकडून वेळ मर्यादा घालून दिलेली असते. अशा योजना उपक्रमावर त्वरीत निर्णय घेणे आवश्यक असते. मा. महासभेपुढे मान्यता घेणेच्या प्रक्रियेमुळे महत्वाच्या योजना, उपक्रम राबविणेसाठी तात्काळ निर्णय न होता विलंब होतो. करीता मा. महिला व बालकल्याण समितीस प्रशासकिय व आर्थिक मान्यतेचे संपूर्ण अधिकार दिल्यास समितीच्या निगडीत प्रस्तावांवर तात्काळ निर्णय होऊन योजना, उपक्रम विनाविलंब राबविले जातील.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, चे प्रकरण २ नियम ३०(२) नुसार महानगरपालिकेस, ठरावाब्दारे आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये विनिर्दिष्ट केलेल्या विशेष समित्यांकडे प्रत्यायोजित करता येतील अशी तरतुद आहे.

उपरोक्त तरतुदीनुसार मा. महिला व बालकल्याण समिती निगडीत सर्व प्रस्ताव यापुढे प्रशासकिय व आर्थिक मान्यतेसाठी मा. महासभेपुढे न घेता, मा. महिला व बालकल्याण समितीमध्ये घेण्यात यावा यासाठी मा. महासभेपुढे शिफारस करित आहे.

सौ. वंदना विकास पाटील
सूचक
V.Patil

सौ. निर्मला सावळे पाटील
अनुमोदन

**सभापती**
**महिला व बालकल्याण समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. महाशय, उलिखारा, रजिस्टर नोंद क्र. ९

गोपवारा प्राप्त

दि. ०६/७/२०१३

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/४/२०१३

## // गोषवारा //

प्रकरण क्र. :- ०४

विषय :- **मनपा. क्षेत्रातील पावसाळ्यापुर्वी कच्चे/पक्के नाले सफाई/खोदाई या अंतर्गत येणा-या कामांच्या प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रे हे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पायथ्यास वसले असून शहराच्या तीन बाजूने खाडीचा परिसर आहे. पावसाळ्या दरम्यान राष्ट्रीय उद्यानाच्या डोंगराळ भागातून मोठ्याप्रमाणात पावसाचे पाणी शहरामधील कच्चे, पक्के नाले, गटारातून निचरा होत असतो. शहरातील बहुतांश नाले हे कच्च्या स्वरुपाचे आहेत. सदरचे कच्चे, पक्के नाले यातून नागरी वस्ती व औद्योगिक परिसरात पडलेल्या पावसाच्या पाण्याचा निचरा होत असतो.

महानगरपालिका क्षेत्रात विकास कामे होत असून नागरी वस्त्या वाढत आहेत. पावसाळ्यात डोंगराळ भागातुन येणारे पावसाचे पाणी नाल्यालगत असलेल्या सखल भागातील नागरी वसाहतीमध्ये पावसाचे पाणी साचुन वित्तहानी होत असते. त्याचप्रमाणे नागरीकांची मोठ्याप्रमाणावर गैरसोय होत असते. दरवर्षी प्रमाणे शहरातील कच्चे, पक्के नाले तसेच खाडी परिसरातील नाले सफाई, खोदाई करणे कामी भाडेतत्वावर जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन आदी यंत्रसामुग्रीद्वारे पावसाळ्यापुर्वी नाले सफाईची कामे करणे अत्यावश्यक आहे. त्याचप्रमाणे निघालेला गाळ वाहतुक करणे याकामी कंत्राटी मजुर व डंपर, टोरस भाड्याने घेणे आवश्यक आहे. या सोबतच शहरातील कच्चे नाले हे नागरी वस्तीतुन जात असल्याने इमारतीच्या प्रवेशद्वारा जवळ तसेच रोड क्रॉसिंग करुन पावसाच्या पाण्याचा निचरा करणे कामी विविध व्यासाचे आर.सी.सी. पाईप रोड क्रॉस बसविणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे पावसाळ्या दरम्यान शहरातील सखल भागात अतिवृष्टी झाल्यावर इमारती, औद्योगिक परिसरात पावसाचे पाणी तुंबून राहते. सदर पावसाच्या पाण्याचा वेळीच उपसा करुन नागरीकांची होणारी वित्तहानी व गैरसोय टाळणे कामी विविध क्षमतेचे सक्शन पंप भाडेतत्वावर घेणे अत्यावश्यक आहे.

महापालिका क्षेत्रातील कच्चे, पक्के नाले सफाई, खोदाईची कामे पावसाळ्यापुर्वी मुदतीत पुर्ण होण्याच्या दृष्टीने प्रभाग समिती निहाय जे.सी.बी. मशीन, पोकलन मशीन, बोटीसह पोकलन मशीन, कंत्राटी मजूर व डंपर, टोरस, विविध व्यसाचे आर.सी.सी. पाईप खरेदी करणे, विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेणे किंवा आधुनिक पध्दतीच्या यंत्रसामुग्रीमार्फत नाले सफाई करणे आवश्यक आहे.

सदरची कामे सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील वॉर्ड सफाई/ नाले सफाई या लेखाशिर्षाखालील रु. ४३ कोटी तरतुदीतून करण्यात येईल. शहरातील कच्चे, पक्के नाले सफाई करणे कामाच्या प्रस्तावास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस मान्यता असावी.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील पावसाळ्यापुर्वी नाले सफाई/खोदाई करणे कामाच्या प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेकरीता मा. महासभेस दि.१८/२/२०१२ रोजीच्या सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. सदरची सभा तहकुब झाल्याने, सदर विषयावर निर्णय झालेला नाही. पावसाळ्यापुर्वी नाले सफाई /खोदाई करणे अत्यावश्यक बाब असल्याने मा. स्थायी समितीची निविदेस मंजुरी घेऊन नाले सफाईची कामे करण्यात आलेली आहेत. सदर कामास मा. महासभेची कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा गोषवारा प्राप्त

दि. ०८/०७/२०१३

वेळ - दु. ०२=५० वा.

गोषवारा प्राप्त दि. ०८/०४/२०१३ वेळ ०२=५० वा.

~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. २

लिपीक

नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १८/४/२०१३**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक ( ०५ )** :- मिरारोड येथील मौजे पेणकरपाडा येथील विकास आराखड्यातील आरक्षण क्र. १८७, १८८,१८९, १९० संचलन व देखभाल दुरूस्ती करीता करारनाम्याचे नुतनीकरण करण्यास मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यात खालीलप्रमाणे आरक्षणे आहेत.

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | क्षेत्र | प्रयोजन |
|---|---|---|---|
| १ | १८७ | ११०००.०० चौ. मीटर | बगीचा |
| | १८८ | ७६००.०० चौ. मीटर | दफनभूमी |
| | १८९ | ४७००.०० चौ. मीटर | स्मशानभूमी |
| | १९० | ४५००.०० चौ. मीटर | दफनभूमी |
| | १९६ | १०८५०.०० चौ. मीटर | बगीचा (भागशः) |

वरील आरक्षणे स्वखर्चाने विकसित करून त्यांचे संचालन देखभाल व दुरूस्ती करण्यास प्रशासकिय ठराव क्र. ४५ दि. १९/०४/२००२ च्या निर्णयानुसार दि. १९/०४/२००२ रोजीच्या पत्रान्वये मे. अस्मिता कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना परवानगी देण्यात आलेली आहे. सदर संस्थेसोबत दि. २३/०४/२००२ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. सदर करारनामा हा ११ वर्ष मुदतीकरीता असून सदर मुदत हि दि. २२/०४/२०१३ रोजी संपत आहे. सदर करारनाम्यातील अटीनुसार सदर करारनाम्याचे नुतनीकरण सदर संस्थेच्या इच्छेवर अवलंबून राहील असे नमुद आहे. सदर आरक्षणाच्या जागेचे रू. १/- प्रति महिना या नाममात्र दराने भाडे आकारण्यात येत आहे.

मे. अस्मिता कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांनी सदर आरक्षणाचे संचलन व देखभाल दुरूस्ती पुढील कालावधी करीता करण्याबाबत कळविलेले आहे. सदर अराक्षणापैकी आरक्षण क्र. १८७, १८८,१८९ व १९० अस्मिता कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. या संस्थेमार्फत विकसित करण्यात आलेली असून त्याचा वापर सुरू आहे. आरक्षण क्र. १९६ ही जागा सीआरझेड क्षेत्राने बाधित होत असल्याने विकसित करण्यात आलेली नाही.

सदर संस्थेमार्फत आरक्षणे स्वखर्चाने विकसित केल्याने बांधकामावर होणाऱ्या महानगरपालिकेच्या निधीची बचत झालेली आहे. तरी सदर संस्थेस पुढील कालावधी सदर आरक्षणे संचलन, देखभाल व दुरूस्ती देण्याकरीता करारनाम्याचे नुतनीकरण करण्याबाबत निर्णय होण्यास शिफारस आहे.

(सही)

**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

PC1/DK/2012-13/MG5

मा. महाव्यवस्थापक नोंद रजिस्टर क्र. - ३

गोणवारा प्राप्त दि. ०४/७/२३

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०४/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ०६८ ) :-** विकास कामांना प्रशासकिय / आर्थिक मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महनगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक, तसेच विकास योजनेतील रस्त्याखालून विविध यंत्रणाच्या केबल्स, पाईप लाईन इ. टाकण्यात आलेल्या आहेत व येत आहेत. संबधित यंत्रणाकडून, नविन केबल्स टाकणे, जलवाहिनी टाकणे त्याची दुरूस्ती करणे इत्यादीसाठी आवश्यक परवानगी घेऊन व शुल्क भरून खोदण्यात येतात. सदर दुरूस्ती शुल्कातून बाधित रस्ते दुरूस्ती केले जातात. यासोबत अतीवृष्टीमुळे पडणारे खड्डे देखिल महानगरपालिकेकडे विविध यंत्रणामार्फत रस्ते दुरूस्तीसाठी जमा केलेल्या रक्कमेतून, दुरूस्ती करून घेण्यात येतात. मागील पाच वर्षात विविध यंत्रणाकडून रस्ते दुरूस्ती करण्यासाठी जमा केलेली रक्कम व प्रत्यक्षात खर्च झालेली रक्कम यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | संबंधित यंत्रणाकडून जमा रक्कम | खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २००८-२००९ | रू. ५.२० कोटी | रू. ८.५४ कोटी |
| २ | २००९-२०१० | रू. ८.१३ कोटी | रू. ९.२४ कोटी |
| ३ | २०१०-२०११ | रू. १३.२९ कोटी | रू. १३.६५ कोटी |
| ४ | २०११-१२ | रू. १४.३० कोटी | रू. १३.४४ कोटी |
| ५ | २०१२-१३ | रू. २४.४४ कोटी | रू. १६.०० कोटी |

महानगरपालिकेच्या वार्षिक अर्थसंकल्पात रस्ते दुरूस्ती करीता योग्य तरतुद करण्यात येते. सदर तरतुदीतून दरवर्षी आवश्यक रक्कमेच्या प्रभाग निहाय वार्षिक मुदतीच्या निविदा मागविण्यात येतात. सदर वार्षिक दर मा. स्थायी समिती सभेकडून मंजूर करून घेण्यात येतात व खोदाई परवानग्या दिल्यावर तसेच पावसाळ्यात पडणाऱ्या खड्डे दुरूस्तीसाठी आवश्यकते नूसार अंदाजपत्रक तयार करून त्यास सक्षम प्राधिकरणाची प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेऊन वार्षिक मंजूर दराने संबधित ठेकेदारास कार्यादेश देऊन रस्ते दुरूस्तीची कामे करून घेण्यात येतात.

सन २०१३-१४ या वर्षाकरीता रस्ते देखभाल, दुरूस्ती, पुर्नःपृष्ठीकरण या लेखाशिर्षाखाली रू. २०.०० कोटी एवढ्या रक्कमेची तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. सदर रक्कमेपैकी रू. १६.०० कोटी रक्कमेच्या वार्षिक दराच्या प्रभाग निहाय निविदा मागवून दर निश्चित करून रस्ते दुरूस्तीची करावयाची सर्व कामे आवश्यकतेनूसार अंदाजपत्रके तयार करून संबधित ठेकेदाराकडून करून घेता येतील. तसेच पावसाळ्यात पडणारे खड्डे देखिल तातडीने अंदाजपत्रके तयार करून मंजूर दराने ठेकेदाराकडून करून घेण्यात येतील. सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या सहा प्रभाग समित्या तयार करण्याचा प्रस्ताव मंजूर झालेला असून सदर प्रभाग समिती निहाय अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

(स्वाक्षरी)

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/13-14/DK/MG-2

मा. सहाय्यक अभियंता नोंद रजिस्टर-क्रं

गोषवारा प्राप्त दि.०६/०७/२०१३

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/४/२०१३

### // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ०७ )** :- भाईंदर (पूर्व) इंद्रलोक भागातील बगीचा आरक्षण क्र. २२१ चे "हिन्दू ह्रदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे उद्यान" असे नामकरण करण्याबाबतच्या विनंतीवर निर्णय होणेबाबत...

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यात भाईंदर (पूर्व) इंद्रलोक भागात आरक्षण क्र. २२१ "बगीचा" करीता आरक्षित आहे. सदर आरक्षणाचे "हिन्दू ह्रदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे उद्यान" असे नामकरण करणेबाबत लोकप्रतिनिधी कडून मागणी करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची 'ड' मधील प्रकरण क्रमांक ११ (२) (१) (अ) नूसार सदर नामकरणाबाबत उचित निर्णय होण्यास शिफारस आहे.

(स्वाक्षरी)

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC4.12-13/DK/MG/1

मा. मसलन्दी रजिष्टर क्र: ५

गोश्वारा प्राप्त मि. ०६/०७ २०७३

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १८/४/२०१३

// गोषवारा //

**प्रकरण क्र. :-** ०९ श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर (सध्या निलंबीत) यांना सेवेत पुर्नस्थापित करणे बाबत..

श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर यांना विविध प्रकरणी हलगर्जीपणा व निष्काळजीपणा कारणास्तव कार्यालयाचे आदेश जा.क्र. मनपा/आस्था/७२७/२०१०-११, दि. ३०/९/२०१० अन्वये निलंबीत करण्यात आलेले आहे. श्रीमती सिमा मिश्रा यांचे निलंबन महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७८, दि. ०१/०२/२०११ अन्वये कायम करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी श्रीमती सिमा मिश्रा यांचेवर विविध दोन प्रकारचे दोषारोप ठेवून विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती. श्रीमती सिमा मिश्रा यांचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप खालीलप्रमाणे आहेत.

१) संगणक खरेदी,

२) मालमत्ता करातील नोंदीमधील फेरफार,

विभागीय चौकशीमध्ये वरील दोन दोषारोपांपैकी अ.क्र. २ दोषारोप सिध्द होत नसल्याचे चौकशी अहवालात निष्पन्न झालेले आहे. आणि सदर दोन आरोपांबाबत चौकशी अहवालातील तपशिल विचारात घेता सदरचा चौकशी अहवाल स्विकृत करुन अ.क्र. २ चे आरोपांबाबत श्रीमती सिमा मिश्रा यांना दोषमुक्त करण्यास हरकत नाही.

तथापी वरील अ.क्र. १ चा दोषारोप सिध्द झाल्याचे विभागीय चौकशीत निष्पन्न झाले आहे व तसेच श्रीमती सिमा मिश्रा यांना संगणक खरेदीमध्ये आवश्यक ती सचोटी व कर्तव्यपारायणता न राखता जो हलगर्जीपणा व निष्काळजीपणाचा आरोप सिध्द झालेला आहे.

सबब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम ५६ अन्वये श्रीमती सिमा मिश्रा यांची एक वार्षिक वेतन वाढ कायमस्वरुपी (पुढील वेतनवाढीवर परिणामसह) रोखण्याचे शास्ती लादण्याचे वेगळे आदेश काढण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी श्रीमती सिमा मिश्रा यांची विभागीय चौकशी पुर्ण झालेली आहे आणि ज्याअर्थी विभागीय चौकशीत सिध्द झालेल्या आरोपाबाबत शास्ती लादण्याचे आदेश काढण्यात आलेले आहेत आणि ज्याअर्थी आरोपाचे स्वरुप, चौकशी अहवालातील तपशिल इत्यादी विचारात घेता श्रीमती सिमा मिश्रा यांना सेवेत पुर्नस्थापित करण्यात हरकत नाही.

आणि ज्याअर्थी श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर यांची मुळ वेतनश्रेणी रु. ९३०० - ३४८००, ग्रेड वेतन रु. ४४००. व्दितीय गटातील म्हणजे सहाय्यक आयुक्त समकक्ष श्रेणीतील किंवा त्यापेक्षा जास्त श्रेणीतील असल्यामुळे अशा श्रेणीतील निलंबीत अधिकारी/कर्मचारी यांना सेवेत पुर्नस्थापित करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकरण म्हणून महानगरपालिका सभेस आहेत.

तरी अपचारीक तथा निलंबीत श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर यांना महानगरपालिका सेवेत पुर्नस्थापित करणेकामी व तसेच दोषारोप क्र. २ बाबत दोषमुक्त करणे मान्यतेस्तव प्रस्ताव महानगरपालिका सभेस सादर करण्यात येत आहे.

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

ગોષવારા પ્રાપ્ત દિ.૦૬/૦૭/૨૦૧૩ મા.મહેકમ ગોષવારા નોંધ રજિસ્ટર :ક્ર: ૯